# अबलोन्नति.

हें पुस्तक

भगवंत अनंदराव सुळे
यांनीं लिहिलें.

मुंबई येथें
नेटिव ओपिनियन छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.

मालकांचे सर्व हक्क राखिले आहेत.

सन १९०६.

किंमत ८ आणे.

# विषयानुक्रमणिका.


| प्रकरणें. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ लें. | स्त्रीशिक्षण ... ... ... ... ... | १ |
| २ रें. | मैत्री ... ... ... ... ... | १४ |
| ३ रें. | गृहिणी ... ... ... ... ... | १७ |
| ४ थें. | घरखर्च ... ... ... ... ... | ३२ |
| ५ वें. | दांपत्य प्रेम ... ... ... ... ... | ४० |
| ६ वें. | कुलवधूनें काय करूं नये... ... ... ... | ४८ |
| ७ वें. | पतिव्रता धर्म ... ... ... ... ... | ५६ |
| ८ वें. | स्त्रियांचे अलंकार... ... ... ... ... | ७२ |
| ९ वें. | गृहकृत्यांसंबंधानें कांहीं उपयुक्त माहिती ... | ७७ |
| १० वें. | आईची योग्यता ... ... ... ... | ८१ |
| ११ वें. | बालसंगोपन ... ... ... ... ... | ८५ |
| १२ वें. | मुलांच्या आजारीपणांत लक्षांत धरावयाच्या गोष्टी | ९४ |
| १३ वें. | गोड शब्द ... ... ... ... ... | ९७ |
| १४ वें. | उद्योग ... ... ... ... ... ... | १०६ |
| १५ वें. | घरांतील चाकरमाणसें ... ... ... ... | ११२ |

"आपले हांतून जीं कांहीं बरीवाईट कृत्यें होतात, त्यांच्या प्रमाणावर आपल्या आयुष्याचें भूषण सर्वस्वीं अवलंबून असतें. आळशी मनुष्याचें जीवित केवळ मातीमोल होय. याकरितां आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा चांगल्या रीतीनें व्यय होण्याविषयीं जपा."—जॉन स्टुअर्ट ब्लॅके.

---

"निरर्थक वितंडवादाच्या योगानें कांहीं वेळ मागें पडलीं तरी जीं तत्वें सत्यास धरून असल्या कारणानें सत्याप्रमाणेंच शक्तिमान व अविनाशी अशीं आहेत, तसेंच जीं समकालीन लोकांकडून कितीही भलत्या रीतीनें समजलीं गेलीं, तरी पुढच्या अधिक शहाण्या मंडळीकडून खचित ज्यांचा गौरव होईल, अशा तत्वांच्या ठिकाणीं मी आपली निष्ठा आमरण दृढ ठेवीन."—मेकॉले.

# प्रस्तावना.

“ मुख्य विषयाला हात घालण्यापूर्वी लांबलचक प्रस्तावना करणें कंटाळ-वाणें होतें, पण न करणें हेंही बरें दिसत नाहीं. ”

—बेकन्स एसे ऑन डिस्कोर्स.

मी १९०० सालीं नोवेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस मुंबापुरींत एक जत्रा पाहण्याकरितां गेलों होतों. त्या वेळीं तेथें जमलेल्या समाजांतील कांहीं स्त्रीपुरुषांचें असभ्य वर्तन पाहून व घरगुती बाबतींत कांहीं आर्य स्त्रियांचा अडाणीपणा दिसून आल्यावरून त्यांच्या चालीरीतींत पवित्रता आणि वागणुकींत सभ्यता येण्यासारखा एखादा लेख साधल्यास लिहावा, अशी उत्कट इच्छा मला झाली. परंतु एके ठिकाणीं कविकुलश्रेष्ठ कालिदास यांनीं ह्मटलें आहे कीं, “ प्रांशुलभ्ये फले लोभादुब्दाहुरिव वामनः ” ह्मणजेः—“ ज्या झाडाचीं फळें उंच मनुष्याला प्राप्त व्हावयाचीं, तीं घेण्याविषयीं जसा एकादा वामन ( ठेंगणा ) हात वर करून अनेक प्रयत्न करितो, ” तद्वत् हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं माझा प्रयत्न आहे. कारण आपल्या महाराष्ट्र भाषेंत नांवाजलेल्या ग्रंथकारांप्रमाणें माझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं. “ अकर्णात् मंद कार्ण श्रेयः ” असा विचार करून मी हें पुस्तक लिहिण्याचें काम प्रथमच हातीं घेतलें. तों पुढील परिणामाचें चित्र माझ्या अंतःकरणांत साद्यंत उभें राहिलें कीं, अल्प ज्ञानानें लिहिलेलें पुस्तक विद्वद्वृंदाच्या आदरास कसें पात्र होईल ? ह्या

विचार तरंगानें 'पावसाळ्यांतील वादळाचे प्रारंभीं' वातावरणांत जसा भयप्रद घोंटाळा होतो तद्वत् माझ्या अंत:करणरूपीं वातावरणांत तो उत्पन्न झाला. ह्मणून उद्भवलेल्या काहुरास मनांतल्या मनांत दडपून पांच मिनिटें शांततेनें विचार करण्यांत घालविलीं. तोंच "यत्ने कृते यदि न सिद्धति कोत्र दोष:" या उक्तीचें स्मरण होऊन तदनुरोधें ही अल्प कृति जगापुढें आणण्याचें धाडस केलें आहे.

आतां विशेष पाल्हाळ न कारतां सुज्ञ वाचकांस साविनव प्रार्थना हीच कीं, प्रयत्न पहिलाच आहे. ह्मणून चुक्या राहण्याचा संभव जास्त आहे. तरी "हंसो यथा क्षीर मिवांबुमध्यात्" या न्यायानें नि:सार जल तेवढें टाकून तन्मिश्रित दुग्धाचा स्निग्ध अंश तेवढाच हंसाप्रमाणें ग्रहण करावा.

**सूचना.**—कोणतीही वस्तु, मनुष्य किंवा पुस्तक, दोषावांचून सांपडणें फारच कठीण. आतां तेच दोष विकारवश झाल्यावांचून मेहेर नजरीनें आणि सभ्यतेनें दाखविले गेले तर दोष दाखविणारांचे फार उपकार होतील. माझ्या प्रिय वाचकांनीं मला योग्य सूचना केल्या तर मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानून कदाचित् या पुस्तकाची द्वितीयावृत्ति निघाल्यास त्यांत त्या सूचनांचा योग्य विचार करण्यांत येईल.

**आभार.**—परमेश्वराच्या कृपेनें हें पुस्तक पार पडलें, याबद्दल त्या जगच्चालकाचे प्रेमळ अंत:करणानें आभार मानून व ज्या ज्या ग्रंथांचा हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं उपयोग झाला त्या त्या ग्रंथकर्त्यांचा व आर्यबंधु हरि नारायण आपटे व नृसिंह चिंतामण केळकर या विद्व-

द्दयांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून ह्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत तपासून योग्य सूचना केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

**प्रार्थना.**--शेवटीं ज्याच्या कृपेमुळें हें महत्कार्य निर्विघ्नपणें शेवटास गेलें त्या प्रभूस अनन्यभावें शरण जाऊन हा ग्रंथ लोकादरास प्राप्त होवो, अशी प्रार्थना करून हा प्रस्ताविक लेख आटोपता घेतों.

नाडसूर ता. १।२।०६ **ग्रंथकर्ता.**

# उपोद्घात.

आपल्या स्त्रीसमाजाचा प्राचीन इतिहास पाहूं गेलें असतां, प्राचीन व अर्वाचीन स्त्रियांत बहुतेक बाबतींत महदंतर दृग्गोचर होतें. पुराणांतरीं पुष्कळ पतिव्रता स्त्रियांविषयीं आपण वांचतों. सावित्री, अनुसूया, सीता, इत्यादि पुराण-प्रसिद्ध स्त्रियांची जन आजपावेतों कीर्ति गात आहेत. ह्यावरून पूर्वकालीन स्त्रिया चांगल्या सुज्ञ असून आपापलीं कर्तव्यकर्में मोठ्या दक्षतेनें व चतुराईनें करीत असत. आपला कीर्तिध्वज अजरामर फडकत ठेवण्यासारखे कांहीं विशेष अमूल्य गुण त्यांचे आंगीं वसत होते. तसे गुण आंगीं येण्यास मुख्य कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत त्यांचें पुढील प्रकरणांत यथामति विवेचन केलें आहे.

# अबलोन्नति, भाग पहिला.

## प्रकरण १ लें.

## स्त्रीशिक्षण.

'विद्या सर्वस्य भूषणम्'

शिक्षण हें चांगलेंच, व तें कोणालाही दिलें तरी चांगलेंच. शिक्षण हें जसें पुरुषांना चांगलें, तसेंच तें स्त्रियांनाही चांगलेंच. शिक्षणासंबधानें ह्या सामान्य सिद्धांताबद्दल कोणाचाही मतभेद असणें शक्य नाहीं. तरी पण हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणासंबंधानें पाहूं गेलें असतां, त्याबद्दल मतभेद दृष्टीस पडतो. हिंदुस्थान आणि इंग्लंड यांमध्यें जो फरक आहे त्याचा विचार करून हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणांतही योग्य तो फरक केला पाहिजे. यविषयीं मिसेस आनि

बिझांट ह्मणतातः—“ हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षण ही इंग्लंडमधील स्त्रीशिक्षणाची हुबेहुब नक्कल केलेली आहे, परंतु ही चूक आहे. इंग्लंडमध्यें अविवाहित स्त्रियांची संख्या अतिशय मोठी आहे! हिंदुस्थानांत, दहा बारा वर्षांपर्यंत अविवाहित मुलींचें संगोपन त्यांची मातापितरें करितात. या वयाच्या पुढें हिंदुस्थानांत अविवाहित मुली क्वचितच सांपडतात. परंतु दुर्दैवानें अशी स्थिति इंग्लंडांत नसल्यामुळें तेथें अविवाहित स्त्रियांची संख्या फार मोठी असते व त्यांना पोसण्याला नवरे नसल्यामुळें त्यांना स्वतःच्या श्रमानेंच आपलें पोट भरावें लागतें. स्वतःच्या उदरनिर्वाहासाठीं त्यांना काम मिळविण्याकरितां बाजारांत जावें लागतें, व तेथें काम करण्यांत त्यांना पुरुषांच्या बरोबर चढाओढ करावी लागते. एखाद्या स्त्रीला कारकुनीची जागा पाहिजे असल्यास, त्या जागेला जे दुसरे पुरुष उमेद्वार असतात त्यांच्यावर हिचा नंबर आला तर तिला ती जागा मिळावयाची. अशी स्थिति असल्यामुळें विलायतेंतील स्त्रियांना पुरुष ज्या विषयांचा अभ्यास करितात, त्याच विषयांचा अभ्यास करणें जरूर पडतें. हिंदुस्थानांतील स्त्रीचें शिक्षण गृहस्थिति चांगली राहण्यासाठीं पाहिजे आहे; चाकरीसाठीं नको आहे. हें लक्षांत ठेवून हिंदुस्थानांतील स्त्रियांचा शिक्षणक्रम ठरविला पाहिजे. स्त्रियांना त्यांची जी नेहमींची बोलण्याची भाषा असेल तिचें चांगलें ज्ञान असावें. ”

आमच्या शास्त्रकारांनीं आर्य स्त्रियांना कोणकोणते अधिकार दिले आहेत, याचा साधार विचार करूं:—

पतिंच तदनुज्ञाता शिष्टमन्नाद्यमात्मना ।
भुक्त्वा नयेदहःशेषं सदायव्यय चिंतया ॥—शुक्रनीति.

भावार्थः—पति आदिकरून घरांतील सर्व मंडळींस वाढून नंतर स्त्रीनें भोजन करावें. घरांत कोणता जिन्नस आहे, कोणता नाहीं, हें पाहून राहिलेला वेळ घरखर्चासंबंधीं हिशेब करण्यांत घालवावा.

अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ।
शौचे धर्मेऽन्नपङ्क्त्यांच पारिणाह्यस्यचेक्षणे ॥—मनुस्मृति.

भावार्थः—घरांतील सर्व द्रव्य पाणिग्रहण केलेल्या स्त्रीच्या स्वाधीन ठेवून खर्चही तिजकडून करवावा. त्याचप्रमाणें घराची स्वच्छता, धर्मसंबंधीं कृत्यें आणि स्वयंपाक हीं कामें तिच्याच प्रमुखत्वाखालीं करवावींत.

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया ।
सुसंस्कृतोपस्करया व्ययेचामुक्त हस्तया ॥—मनु.

भावार्थः—स्त्रीनें सर्वदा आनंदी असावें, गृहकृत्यामध्यें दक्ष असावें, घरांतील सामान नीट ठेवावें आणि काटकसरीनें खर्च करावा.

सदासर्वदा आनंदित राहण्यास धर्म व नीतिशिक्षण पाहिजे. गृहकृत्यांमध्यें कुशल असण्यास पाक निष्पत्ति वगैरे क्रिया चांगल्या आल्या पाहिजेत. काटकसरीनें खर्च करण्यास थोडेंबहुत हिशेबाचें ज्ञान पाहिजे.

नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मिहविद्यते।—भगवद्गीता ।

भावार्थः--जगांत ज्ञानासारखें उत्तम असें दुसरें कांहीं नाहीं.

श्री रामदासस्वामी ह्मणतातः- –

ज्ञानाविण जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा ।
दास ह्मणे ज्ञानाविण । प्राणी जन्मला पाषाण ॥

एके ठिकाणीं ह्मटलें आहेः–

येषां न विद्या न तपो न दानं ज्ञानं न शीलं न गुणोनधर्मः ।
ते मृत्युलोके भुविभारभूता मनुष्यरूपेण मृगाश्चरांति ॥

भावार्थः—ज्यामध्यें विद्या, तप दान, ज्ञान, सालसपणा, गुण आणि स्वधर्माचरण हीं नाहींत ते मृत्युलोकीं पृथ्वीला भारभूत असे मनुष्य रूपानें हरिणच फिरत आहेत.

“अध्यापनंच वेदानां सावित्री वचनं तथा । पिता पितृव्यो भ्राता वा नैनमध्या परेत्परः” याचा अर्थः– स्त्रियांस विद्येचें अध्ययन च अध्यापन करण्याचा अधिकार आहे. पण तें पिता, चुलता किंवा भाऊ यांच्याशिवाय दुसऱ्यानें देऊं नये. असें वचन ‘पाराशर माधवीय’ ग्रंथांत यमानें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें ‘आचार्य’ किंवा ‘उपाध्याय’ शब्दाचें स्त्रीलिंगरूप ‘आचार्यानी’ किंवा ‘उपाध्यायानी’ असें होतें. परंतु जी स्त्री स्वतः व्याख्यान देणारी किंवा शिकविणारी आहे तिला “आचार्या” किंवा “उपाध्याया” ह्मणावें असें ग्रंथांत सांगितलें आहे. लौकिकांतही स्त्रियांचें महत्व पुरुषांप्रमाणेंच असे. भगवान् बुद्धास सहाय्यकारिणी स्त्रिया असत. ‘विशाखा’ नांवाच्या स्त्रीची यज्ञाच्या वेळीं अग्रपूजा करीत असत. जनकराजाच्या यज्ञांत ‘गार्गीनें’ दाखविलेला प्रभाव सर्वश्रुत

आहेच. व्यवहारिक व त्याप्रमाणेंच धर्मसंबंधीं ज्ञानाकडे लक्ष देणाऱ्या स्त्रियांस प्राचीन काळीं ' ब्रह्मवादिनी ' ह्मणत. कपिलमुनीची माता ' देवहती ' मोठी ब्रह्मवादिनी होती. ह्या सर्व पुराव्यांवरून पौराणिक कालीं स्त्रीशिक्षण जोरानें चालत असून व्यवहारिक हिशेबाचें कामही स्त्रियांवरच सोंपविलेलें होतें हें सिद्ध होतें. आतां ऐतिहासिक कालाकडे अवलोकन करूं.

ख्रिस्ती शकाच्या ४ थ्या ते ८ व्या शतकाच्या अवधींत जे कांहीं भारतीय राजे मध्यहिंदुस्थानांत राज्य करीत होते, त्यांच्या कारकीर्दींत राजाश्रितांमध्यें जसे पुरुष तशा गुणवान् स्त्रियाही होत्या. जसे कवी ह्मणून दरबारांत पुरुष चमकत होते, तद्वत् कवियित्री ह्मणून स्त्रियाही विलसत होत्या. ' शार्ङ्गधर पद्धति ' नामक ग्रंथांत अशा कवियित्रींचीं नऊ नांवें दिलीं आहेत तीं:—

१ नागम्मा, २ फल्गुहस्तिनी, ३ मदालसा, ४ मोरिका, ५ लक्ष्मी, ६ विकटनितंबा ७ विज्जिका, ८ शिलाभट्टारिका व ९ सरस्वतीकुटुंबदुहित्री. मारुला नांवाच्या एका कवयित्रीचा उल्लेख धनदेवानें खालील श्लोकांत केलेला आहे. ( हॉलसाहेबांच्या ' वासवदत्ता ' ग्रंथांतील प्रस्तावना पान २१ पहा ) तो श्लोक असा:—

> शीला, विज्ञा, मारुला, मोरिकाद्य: । काव्यं कर्तुं संतु विज्ञा: स्त्रियोऽपि ॥
> विद्यां वेत्तुं वादिनो निर्विजेतुं । विश्वं वक्तुं य: प्रवीण: सवंद्य: ॥

वल्लभदेवानें आपल्या ' सुभाषितावली ' नामक ग्रंथांत कांहीं ग्रंथकर्त्यांची यादी दिली आहे त्यांत स्त्रियांचींही नांवें आलेलीं आहेत तीं खालीं दिल्याप्रमाणें:—

गौरिका, प्रकाशदत्ता, मुक्तापीडा, मार्णमाला, विज्जिका, सुभद्रा वगैरे. सुमारें अडीचशें तीनशें वर्षांपूर्वी जेव्हां इंग्लंडांत राणी इलिझाबेथ राज्य करीत होती, तेव्हां या देशांत चांदबिबी नांवाची एक दक्ष बेगम होती. चांदबिबी बेगमला आरबी, फारशी व दुसऱ्याही कित्येक भाषा उत्तम प्रकारें अवगत असून गायन आणि चित्रकलेमध्येंही ती बरीच प्रवीण होती. आपल्या पतीची ती उत्तम सल्लागारही होती. यावरून सरासरी १७ व्या शतकापर्यंत या देशांत स्त्रीशिक्षणाचें महत्व पूर्णपणें समजलें जात होतें. आपल्या कृतीचीं मूळ कारणें आपल्या मनांतील विचार होत. ह्मणून मनामध्यें ज्याप्रमाणें विचार उत्पन्न होतो, त्याप्रमाणें मनुष्य कृत्यें करण्यास प्रवृत्त होतो. ह्मणून आपल्या हातून घडणारीं कृत्यें हीं सर्वस्वीं आपल्या विचारावरच अवलंबून असतात. तेव्हां मनुष्यानें विचार करावयाचा तो आपल्या हातून सत्कृत्यें घडतील अशाच प्रकारचा करावा. परंतु असा सुविचार मनांत उद्भवण्यास मन सुसंस्कृत झालें पाहिजे. व मन तसें होण्यास 'विद्या' अवश्य पाहिजे. मनुष्याच्या मनावर उत्तम प्रकारें संस्कार घडवून आणणारी मुख्य देवता 'विद्या'च होय. ता. २७ एप्रिल सन १९०१ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रांत "हिंदु सामाजिक सुधारणा" या महत्वाच्या विषयावर एक विचार करण्याजोगा लेख लिहिलेला आहे त्यांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं:- "हिंदुस्थानांतील सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाचा उलगडा हिंदुस्थानांतील स्त्रीवर्गालाच करितां येण्याजोगा आहे. तो उलगडा करण्याला त्यांना सुशिक्षण मात्र मिळालें पाहिजे. सामाजिक चालीरीतींचें भांडार ह्मटलें ह्मणजे प्रत्येक देशांत स्त्रियांजवळच असावयाचें."

" देशाची सुधारणा होण्यास काय केलें पाहिजे ?" या प्रश्नास नेपोलियनानें उत्तर दिलें आहे कीं " आया सुशिक्षित करा. " ( खरोखरच स्त्रिया पुढील पिढीच्या जननी ह्या नात्यानें ह्यांचें किती महत्व आहे बरें! जर सर्व स्त्रियांस योग्य तऱ्हेनें वागविलें, त्यांस सुशिक्षणाचा लाभ दिला, त्यांच्या मानसिक व शरीरिक शक्तींची पूर्ण वाढ होऊं दिली, तरच त्यांची संतति अधिक बुद्धिवान् व चतुर अशी निपजेल.) स्पेन्सर साहेब आपल्या निबंधांत ह्मणतातः— " शरिराची जोपासना कोणत्या रीतीनें करावी, मनाशीं कोणत्या रीतीनें वागावें, आपल्या गृहकृत्यांची व्यवस्था कोणत्या रीतीनें ठेवावी, कुटुंबाची स्थिति कोणत्या रीतीनें सुधारावी, सृष्टीनें सुखाचीं जीं साधनें दिलीं आहेत त्यांचा कोणत्या रीतीनें उपयोग करावा, स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या फायद्याकरितां आपल्या सर्व तऱ्हेच्या शक्तींचा उत्तम उपयोग कसा करावा ? हेंच सर्व ' विद्या ' आपणांस सांगते. आणि ह्या सर्व गोष्टी आपण शिकणें फार महत्वाचें असल्यामुळें आपण विद्या शिकली पाहिजे. " तसेंच " सर्व धनाहुनि विद्या—धन याची योग्यता असे मोठी " असें जर आहे, तर क्वचित् स्थळीं शिक्षणापासून स्त्रिया बिघडतात, त्यांच्या सद्वर्तनास कलंक लागतो वगैरे कर्ण—कटु प्रलाप कर्णरंध्रांवर कां बरें धडकूं लागले? त्याचें कारण हेंच कीं प्रत्येक कामाला वाटाड्या चांगला लागतो. तसेंच स्त्रीशिक्षणाच्या कामांतही शिक्षक विचारी, धोरणी व दूरदर्शी असे असावे लागतात. याविषयीं जे. जी. फिच् ह्मणतातः " विद्यार्थ्यांस केवळ पुष्कळ माहिती करून देणें हा शिक्षणाचा मुख्य हेतु नाहीं; त्यांच्या बुद्धीस पूर्णता आणणें हाही शिक्षणाचा मुख्य हेतु

नव्हे. शिक्षणाचा जो मुख्य हेतु आहे, किंवा असावा तो हा कीं, विद्यार्थ्यांच्या मनांत कांहीं विशिष्ट वासना उत्पन्न व्हाव्या; त्या अशा कीं त्यांच्या द्वारें जणूं काय निरंतर ईश्वरी प्रेरणा होत जाऊन त्यांच्या वर्तनाचें जन्मभर नियमन व्हावें." विद्यार्थ्यांस अवलोकनाची, विचाराची, प्रसंगावधनाची संवय लावणें हें शिक्षकाचें मूळ कर्तव्य होय.

याचें दुसरें कारण हें आहे कीं, ज्या शिक्षणानें व शिक्षणक्रमानें पुरुषांच्या मानसिक व शारीरिक शक्तींचा ऱ्हास होत आहे तेंच शिक्षण महिलांस दिलें जातें असें समाज-धुरिणांचें मत आहे. आमच्या स्त्रीसमूहाची जी दुर्दशा झाली आहे, त्याला वास्तविक जबाबदार पुरुषच आहेत. भावी उन्नतीचा उगम स्त्रिया आहेत. करितां देशबांधवहो ! तुम्हीं स्त्रियांना जें शिक्षण द्याल तें असें असलें पाहिजे कीं, तेणेंकरून त्यांचे ठाईं सारासार विचारशक्ति, प्रौढी, गांभीर्य, सौजन्य इत्यादि सद्गुण वास करितील. नैसर्गिक मनोवृत्तींची पूर्ण वाढ होण्यास शिक्षण पाहिजे हें खरें; परंतु तें देतांना संपादित उपयुक्त ज्ञान त्यांस प्रपंचांत अधिक उपयोगीं पडेल इकडे लक्ष्य दिलें पाहिजे. आमच्या देशभगिनींना विश्वविद्यालयाच्या एकाद्या परीक्षेपर्यंत शिक्षण देण्याची जरूर आहे अशांतली कांहीं गोष्ट नाहीं; तर घरांतील हिशेब ठेवण्यापुरतें गणिताचें ज्ञान, कपडा फाटला असतां तो कसा नीटनेटका शिवावा, तशींच लहान मुलांचीं आंगडीं, परकोर चोळ्या व पोलके हेही शिकतां यावे, आपल्या मुलांबाळांची जोपासना कोणत्या रीतीनें करावी, पतीबरोबर कसें वागावें, गृहिणीवर जबाबदारी कोणती असते,

लग्नांतील मंत्रांचे अर्थ काय, तसेंच साधारण कणारांगोळी घालणें, काशिदा काढणें, निरनिराळे पदार्थ रुचिकर करणें, स्वच्छ राखणें, व धर्माचें पालण करणें, इत्यादि संबंधीं शिक्षण दिलें ह्मणजे बस्स आहे. फावल्या वेळीं पतीनें पत्नीस, बंधूनें भगिनीस, पित्यानें कन्येस, करमणुकीस्तव, अश्वपतितनया सावित्री, अनुसूया, मंदोदरी, महाभागा दमयंती, जयदेव कवीची स्त्री सती पद्मिनी सारख्या महान् पतिव्रता; जनाबाई, मुक्ताबाई, मिराबाईसारख्या धर्मपरायण; कुमारी गार्गी, व साध्वी मैत्रेयी सारख्या वेदांतविशारद; रंभा, मेनिका, रोषनार, आलेक्झांड्रा सारख्या गायनवादनपटु; अहल्याबाई, क्वुईन विक्टोरिया, कॅथेराइन, व जमनाबाईसारख्या दीनदयाळ; राणी चूडालासारख्या योगिनी; कृष्णा कुमारी व ल्युक्रेशिया सारख्या कुळाचें नांव राखण्याकरितां विषाचे पेले घेणाऱ्या धाडसी स्त्रिया; झांशीची राणी वीरांगना लक्ष्मीबाई, सावित्रीबाई किल्लेदारीण व जोन ऑफ आर्कसारख्या रणशूर स्त्रिया; पन्ना, इंदिरेसारख्या स्वामिभक्तपरायण दासी; जुन्नरकर रेवजी बापू पाडसे यांची स्त्री मंचाबाई [ अहल्याबाईंची मुलगी ], थोरले माधवराव पेशवे यांची स्त्री रमाबाई व पृथ्वीराजाची निधनवार्ता ऐकून काष्ठभक्षण करणाऱ्या राणी संयोगितेसारख्या सती; रुक्मिणी, जनाबाईसारख्या कवयत्रि; चित्रलेखेसारख्या चित्रकलापटु; सुभद्रा, प्रभावती, जीजाबाई, बळवंतराव मेंधळ्यांची अर्धांगी लक्ष्मी, पानपतच्या मैदानांतून पळून आल्याबद्दल भ्रतार मल्हारजी होळकर यांची निर्भत्सना करणारी गौतमाबाईसारख्या वीरांगना व वीरमाता, चांदबिबी व नूरजहानसारख्या मुत्सद्दी; ग्रेसदार्लिंग व परोपकाराच्या कृत्यानें क्रिमियाच्या लढाईंस

माधुर्य आणणारी फ्लॉरेन्स नाईटिंगेलसारख्या परोपकारी स्त्रिया; युक्तीनें मुसलमानावर हल्ला करून स्वपतीस बंधमुक्त करणारी धैर्यशालिनी पद्मिनी इत्यादि पुराण व इतिहासप्रसिद्ध स्त्री-रत्नांच्या मनोरम कथा सांगाव्या. तसेंच भूगोल व खगोल याविषयींही माहिती असणें फायदेशीर आहे. पुरुषांस सांगण्यास वेळ न मिळाला तर स्त्रीनें वरतीं दिग्दर्शन केलेल्या स्त्रियांचीं चरित्रें वांचणें फार चांगलें. शृंगारिक पुस्तकें व ज्यांपासून नीतिमत्तेस धोका बसण्याचा संभव जास्त अशीं पुस्तकें हातांत सुद्धां देऊं नयेत व स्त्रियांनीं घेऊं नयेत.

ग्रंथ कसा असावा याविषयीं श्री रामदासस्वामी ह्मणतात.

जो ऐकतांच गर्व गळे । कांते भ्रांतीच मावळे ।
नातरि एकसरें बोळे । मन भगवंतीं ॥ १ ॥
जेणें होय उपरती । अवगुण अवघे पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥ २ ॥
जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३ ॥

एका लॅटिन ग्रंथकाराचें असें ह्मणणें आहे कीं, "ज्याला एकदा वाचनाची अभिरुची लागली, त्याची वर्तणुक सुधारण्याचा तोच ओनामा ह्मटला पाहिजे; आणि तोच व्यासंग आपला पगडा बसवून अडाणीपणांतून त्या मनुष्यास बाहेर खेंचून अखेरीस सुशिक्षित व सुसंस्कृत बनवून सोडील."

"जो ग्रंथावर प्रेम करितो, त्यास विश्वासु मित्रांची, हितकर उपदेशाची, आनंदी संवगड्याची व शांत अंतःकरणाची कधींहिं उणीव पडावयाची नाहीं."—बॅरो.

"रोझेसच्या लढाईसंबंधानें सर्व माहिती असणें आणि इंग्लंडच्या प्रख्यात लढायांच्या तारखा माहित असणें यांचा स्त्रियांस फारसा उपयोग नाहीं. लॅटिन भाषा शिकणें, मॅट्रिकची परीक्षा देणें, हीं त्यास काय फायदेशीर आहेत? या सर्वांपेक्षां हिंदुस्थानांतील मुलींना धार्मिक भक्तींत तरबेज केल्या पाहिजेत आणि ह्या बाबतींत त्यांचें लक्ष लवकर लागण्यासारखें आहे. मराठी ग्रंथांपैकीं, धार्मिक कविता आणि शास्त्रपुराणांतील गोष्टी त्यांनीं मन लावून वाचल्या पाहिजेत; इतकेंच नव्हे तर तोंडपाठ केल्या पाहिजेत. कोणत्याहि मुलीनें भगवद्गीतेचें पूर्ण ज्ञान झाल्याशिवाय शाळा सोडतां कामा नये. हिंदुस्थानामध्यें ज्या नांवाजलेल्या स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्या गोष्टी आणि त्यांची कीर्ति होण्यास कारणीभूत झालेले गुण स्त्रियांच्या मनावर ठसविले पाहिजेत, आणि त्या स्त्रिया आपल्या आयुष्यक्रमणांत उदाहरणें घेण्याजोग्या आहेत, असें स्त्रियांस पूर्णपणें भासवून दिलें पाहिजे. याप्रमाणें जी स्त्री त्यांचे उत्तम गुण व सुस्वभाव हृत्पटावर लिहून त्याप्रमाणें वर्तनक्रम ठेवील, ती आपल्या घरांतील साक्षात् 'लक्ष्मी'च होईल. ज्या दुहितांना याप्रमाणें सुशिक्षण मिळेल त्या आपल्या गृहांस खरी शोभा आणतील. ह्मणजे—'त्या स्वतः धर्ममार्गाच्या मूर्तीच होतील.' सीता, सावित्री, सारख्यांची कोमल व निष्कपट अंतःकरणें, गार्गी सारखीचें बुद्धिप्रागल्भ्य आणि मैत्रेयी सारखींची स्वार्थत्याग करणारी, परोपकारी बुद्धि इत्यादि गतकालिक गतवैभवें पुन्हां यांच्यामध्यें दृष्टीस पडतील अशी आशा आहे."

—अवेकंड इंडिया, नंबर ११, सन १८९७.

राजा विजयकृष्ण देव ह्मणतातः---

“ स्त्रीशिक्षणामध्यें धर्माला प्राधान्य देणें जरूर वाटतें. एकादा लेक्चर हॉल ही माझ्या मतें स्त्रियांनीं आपलें कौशल्य दाखविण्याची जागा नव्हे. आपलें घर, आपलें कुटुंब ही त्यांची जागा होय असें मी मानितों. ज्या योगानें स्त्रियांच्या आंगचे गुण वाढतील अशाच विषयांचें शिक्षण त्यांना दिलें पाहिजे. सहनशीलपणा, संतोष आणि नेमस्तपणा हे गुण स्त्रियांच्या आंगांत मुख्यत्वेंकरून वृद्धिंगत झाले पाहिजेत. ”

प्रत्येक गृहिणीला गृहशिक्षण व धर्मज्ञान असणें अवश्यक आहे. त्याशिवाय नैतिक प्रकाश कधींही पडणार नाहीं. त्यांनीं अशा प्रकारचा अभ्यास केला पाहिजे कीं, ज्याचे योगानें विचार करण्याची, तुलना करण्याची संवय होईल. ज्यापासून त्यांची तारतम्यशक्ति इतकी प्रखर होईल कीं आंत कांहीं राम नसतां बाहेरून झळक्या मारणाऱ्या गोष्टींचा सर्वस्वी त्याग करण्याचें धैर्य त्यांना येईल. सारांश ज्या ज्ञानाच्या योगानें संसार सुरळीत चालेल अशाच ज्ञानाचा संग्रह केला पाहिजे. एका पाश्चात्य विदुषीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं:---

“ आयुष्याच्या पहिल्या भागांत ह्मणजे ज्या वेळेस ज्ञान प्राप्त होण्याचा व बरे वाईट गुण जडण्याचा विशेष संभव असतो, अशा वेळेस माता, पिता, आणि गुरु यांच्याशीं संबंध फार असतो ह्मणून तीं ज्ञानसंपन्न व सदाचारी असणें अवश्य आहे. ” जसें ‘ धान्याच्या एका दाण्यापासून असंख्य दाणे तयार होतात, तसें आया सुशिक्षित झाल्यानें त्यांची मुलेंही परंपरेनें चांगली निपजतात. ’ प्रिय-

भगिनींनें ! एके ठिकाणीं बेकन ह्मणतो:- 'सद्गुण हा उत्तम कोंदणांत बसविलेल्या मोठ्या मौल्यवान् हिऱ्यासारखा आहे.' सारांश स्वकर्त्तव्याचें ज्ञान होण्यास विद्येसारखें दुसरें साधन नाहीं. विद्येच्या ज्ञानानें पुरुषांस काय, किंवा स्त्रियांस काय, कोणती गोष्ट अशक्य आहे ? विद्येच्या योगानें बुद्धि विकास पावून मन प्रगल्भ होतें, नानाविध चांगल्या पुस्तकांतील अमोलिक उपदेशांचा ठसा मनावर ठसून आचरण शुद्ध होतें; आपल्या आंगचे दोष निघून जातात. निरनिराळ्या विषयांचें ज्ञान होतें, आंगीं बहुश्रतपणा येतो, ज्ञानाच्या बळानें पूर्वीं आपल्या देशांतील स्त्रिया सर्व जगास कशा पूज्य होऊन गेल्या. तसेंच हल्लीं अमेरिकेंतील व युरोपांतील ज्या स्त्रिया विद्यासंपन्न होऊन, आपल्या देशासच केवळ नव्हे तर सर्व स्त्रीजातीस विभूषित करीत आहेत, त्यांचीं चरित्रें अवलोकन कराल तर स्त्रियांच्या आंगीं केवढें सामर्थ्य आहे हें तुमच्या ध्यानांत येईल. प्रिय भगिनींनो, 'कोंदणावांचून हिरा जसा शोभत नाहीं', तशी विद्याहीं सत्वशीलपणा, साधेपणा, ममताळुपणा, सभ्य, चालचलणूक, मनोहर भाषण, कार्यदक्षता, इत्यादि मौल्यवान गुण असल्यावांचून शोभत नाहीं. विद्येविषयीं एकेठिकाणीं ह्मटलें आहे.

मातेव रक्षति पितेव हिते नियुंक्ते ॥
कांतेव चाभिरमय यपवनोय खेदम् ॥
लक्ष्मीं तनोति वितनोतिच दिक्षु कीर्तिम् ॥
किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ? ॥



## प्रकरण २ रें.

# मैत्री.

तन्मित्रमापदि सुखेच समक्रियं यत्

किंवा

सन्मित्र जें करी हित। कोणाच्यानेही तें न करवेल।

मैत्री सर्वांशीं असणें चांगलें. 'भल्याचा स्नेह सुवर्णाच्या डागिन्याप्रमाणें आहे,' ह्मणजे तो लवकर मोडत नाहीं; आणि दुर्जनांचा स्नेह 'मातीचे भांड्यासारखा आहे,' ह्मणजे तो लवकर मोडतो. कोणाही नाण्याची बाहेरच्या झोंकावरून खरी परीक्षा होत नाहीं. पूर्ण पारख झाल्याशिवाय आश्रय अथवा संगति धरली तर हानि होते. याविषयीं इंग्लिश भाषेंत ह्मण आहे. "चकाकतें ते सर्वच सोनें नसतें." सोनपितळ आपल्या रंगानें व चकाकीनें मूर्ख मनुष्याला क्षण-

भर चकविते, हें खरें; पण खरें सोनें आणि सोनापितळ हीं तराजूंत टाकून तोलून पाहिलीं ह्मणजे अधिक वजन कोणाचें हें लागलेंच दिसून येईल. ह्मणून तुम्हांला ज्यांच्याशीं दळणवळण ठेवणें असेल त्यांचें मत कसें आहे? त्यांची चालचलणुक कशी आहे? लोकांचें त्यांच्याविषयीं काय मत आहे? या सर्व गोष्टींचा पूर्ण अनुभव घेऊन नंतर त्याशीं मैत्री संपादन करावी. सत्संगतीचा महिमा भर्तृहरीनें पुढील सुरस श्लोकांत वर्णन केला आहे.

जाड्यं धियो हरति सिंचति वाचि सत्यं।
मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति॥
चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं।
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम्॥

भावार्थः—संत्सगामुळें बुद्धीचें जाड्य नष्ट होतें, सत्य भाषण करण्याची प्रवृत्ति होते, स्वाभिमान उत्पन्न होतो, पाप नाहींसें होतें, चित्त प्रसन्न होतें, सर्वतोमुखीं आपली कीर्ति होते.

त्याचप्रमाणें महाराष्ट्र कवींनींही आपल्या काव्यांत सत्संगाचा महिमा फार सुरेख रीतीने वर्णिला आहे. "नलगे मुक्ति, धन संपदा; संतसंग देई सदा." आतां मनुष्य सज्जन किंवा दुर्जन आहे, हें ओळखण्यास काय शिकलें पाहिजे याचा विचार करूं:—

मनुष्याचें ऐहिक आणि पारलौकिक कल्याण होण्यास जीं अनेक साधनें साधु पुरुषांनीं सांगितलीं आहेत, त्यांत 'आत्मपरीक्षण' हें मुख्य होय. ह्या शब्दाच्या अर्थाचा चमत्कार असा आहे कीं ह्या-

हून अन्य परीक्षणाचाही यांत समावेश होतो, ऐहिक व्यवहारामध्यें आपणास काय करितां येतें? आणि ज्याशीं वागावयाचें आहे त्यांच्या योग्यतेच्या मानानें आपलें हित साधण्यास आपणास काय करितां आलें पाहिजे, हें कळणें अवश्य आहे. हजारों लोकांशीं आपणांस नित्यशः प्रसंग येतात. त्यांपैकीं कोणच्या बाबतींत कोणावर किती भरंवसा ठेवावा, याचा शहाणपणानें उलगडा लावणें हें काम लहान-सहान नव्हे. तसेंच ज्यांच्या समागमें आपणांस कामधंदा करावयाचा असतो, अशा लोकांची योग्य निवड करणें किती बरें महत्वाचें आहे? शिवाजी महाराज हे आत्मपरीक्षणाची केवळ मूर्तीच होती असें म्ह-टलें तरी चालेल. त्यांच्या विषयींची जीं अनेक उदाहरणें आहेत, त्यांतील एकच सांगतों म्हणजे खात्री होईल. अफजुलखान आपणा-वर आला आहे, हा कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे, हें पूर्णपणें जा-णून महाराजांनीं त्याशीं वागण्याचा संकल्प केला, आणि त्यास मारून आपला प्राण वांचविला.” म्हणून आपणास आत्मपरीक्षण चांगलें करितां आलें पाहिजे. त्यांत भ्रम असतो तो जाणतां आला पाहिजे. जे मित्र म्हणून म्हणवितात, ते खरोखरच मित्र असतात कीं शत्रू असतात, या सर्व गोष्टीचें परीक्षण आधीं करितां आलें पा-हिजे. एकादे वेळीं असाही अनुभव येतो कीं, ‘वस्तुन्य वस्त्वारोपः’ म्हणजे ‘मनुष्याला जें खरें आहेसें वाटतें तें वस्तुतः तसें नसतें’ म्ह-णून आत्मपरीक्षण करण्यास सर्वांनीं शिकलें पाहिजे. ‘मनुष्याची पारख संगातिवरून होते’ मनुष्य कितीही सुशील, पापभीरू, सदाच-रणी असला आणि दुर्दैवानें जर त्याला दुष्टांची संगाति जडली तर ‘संगातिः संगदोषेण साधुर्भवति पातकी’ किंवा ‘ढेंकणाच्या संगें

हिरा तो भंगला, कुसंगें नाडला साधू जैसा.' दुर्जनांचा सहवास क्षणभर देखील करूं नये. दुर्जनांची संगति धरली तर त्याचें फळ असें मिळतें कीं, 'चोर गेला आणि संन्याशाला सुळी दिला.' याविषयीं जनाबाईची उक्ति मोठी संस्मरणीय आहे.

चोरा संगतीनें गेला । वाटे जाता नागावला ॥
अग्नि सवें खेळे । न जळला तरी पोळे ॥

तसेंच 'पयोऽपि शौंडिकी हस्ते वारुणी त्यभिधीयते' म्हणजे 'कलालाच्या हातांत दूध असलें तरी लोक तें मद्य आहे असें समजतात.' वाईट संगतीनें मनुष्यें बिघडतात, आणि स्त्रिया तर तत्काळ बिघडतात. सर्व सुधारणा विद्येवर अवलंबून असते, विद्या शिक्षणावर अवलंबून असते आणि सर्व शिक्षण शिक्षकांवर अवलंबून असतें. म्हणून मुलींना शाळेंत घालण्यापूर्वी शिक्षण किंवा शिक्षकिणी व त्यांच्या मैत्रिणी चांगल्या कुळांतील, सुशील, सभ्य व अनुभवी अशा असाव्यात. स्नेहांत अंतर पडण्यास खालील गोष्टी कारणीभूत होतात म्हणून त्या आपल्या हातून न घडण्याविषयीं प्रत्येकानें काळजी घेतली पाहिजे.

[ ओव्या ]

बहुत काळींचा मित्र संबंधु । तोडी एक वोखटा शब्दु ।
जैसा कांजाचा स्वल्प बंधु । घरचो नाशी दुग्धाचा ॥ १ ॥
नाना तपाचिया जाडी । स्वल्प कामना नासता काडी ।
परगृहीं पड्सांची गाडी । दवडी एक हेळणा ॥ २ ॥
ज्वर वन्ही ग्रीष्मताप । यांचा उमा अत्यंत स्वल्प ।

त्याहूनि बोलाचा संताप । आगळा ऐसा मजवाटे ॥ ३ ॥
हृदयीं तप्त लोहाचे स.ळ । साहों येईल चिरकाळ ।
परी दुष्ट शब्दांची जळजळ । मरणांतींही शमेना ॥ ४ ॥
सोनें अथवा हस्तचरण । मोडिल्या सांधिती विचक्षण ।
फुटलें मोती तुटलें मन । सांधूं न शके विधाता ॥ ५ ॥

आदिपर्व—**मुक्तेश्वर.**

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, दुर्जनांची संगति सोडून 'जगीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें' आणि 'जगीं वंद्य तें सर्व भावें करावें.' तसेंच 'सद्भिरेव सहासीत सद्भिः कुर्वीत संगतिम् । सद्भिर्विवादं मैत्रिंच नासद्भिः किंचिदाचरेत्'॥



## प्रकरण ३ रें.

# गृहिणी.

गृहिणी सचिवः सखी मिथः । प्रियशिष्याललिते कला विधौ ॥

—रघु सर्ग ८–६७.

संसार किंवा प्रपंच ह्मणजे काय हें कोणाही प्रापंचिक मनुष्यास सांगावयास पाहिजे असें नाहीं. पण तो सर्वांस बहुधा सुखप्रद होतो, असें ह्मणतां येत नाहीं. ह्याचें कारण पाहूं गेलें असतां हेंच दिसून येईल कीं, संसारांत ज्या नानाविध विषयांची किंवा गोष्टींची प्रत्येक मनुष्यास माहिती असणें जरूर आहे, त्या त्या विषयांसंबंधीं व गोष्टींसंबंधीं अज्ञान हेंच होय. ह्या जगांत सर्व तऱ्हेची माणसें पाहण्यांत येतात, परंतु त्या सर्वांविषयीं लिहिण्याची येथें अवश्यकता तर ज्या रथाचें दांपत्य-प्रेम हेंच बंधन

आहे, विचार–ऐक्य हा अक्ष आहे, व पति आणि पत्नी हीं चक्रें आहेत, अशा ह्या संसाररूपी शकटाच्या दोन चाकांपैकीं ' गृहिणी ' चक्राविषयीं विचार करूं. ' गृहपति ' ह्मणजे गृहाचा स्वामी, आणि ' गृहिणी ' या शब्दाचा अर्थ गृहाची स्वामिणी असा आहे. प्रिय भगिनींनो! या गृहराज्यांतील सर्व व्यवस्था पाहणें, त्यांत तुमच्या ज्ञानाप्रमाणें फेरफार करणें व सुधारणा करणें हें सर्वस्वी तुमच्याच हातीं आहे. तुमच्या गृहराज्यांतील प्रत्येक मनुष्याचें गृहसौख्य पूर्णपणें तुमच्यावरच अवलंबून असतें. ' शान्ति पर्वांत ' एके ठिकाणीं ह्मटलें आहे, कीं

नास्ति भार्या समो बंधु । नास्ति भार्या समागतिः ।
नास्ति भार्या समो लोके । सत्वार्यो धर्मसंग्रहे ॥

भावार्थः–' भार्येसारखा अन्य बंधु ह्मणजे मित्र नाहीं, भार्येखेरीज पुरुषास शेवट नाहीं, आणि या कलियुगांत धर्माचा संग्रह करण्यास भार्येसारखें साधन नाहीं. '

' सत्यभाषणी, सरळ प्रकृतीची आणि अंतःकरणापासून प्रेम करणाऱ्या सुशील भार्येहून पुरुषाला शोभविणारा अन्य कोणता सुंदर हार आहे? '

—चाइल्डस्

'संसाररूपी धर्मयुद्धामध्यें पत्नि ही किल्ल्यासारखी आहे, ह्मणून तिचा आश्रय जरूर करावा. '

—कर्दम मुनी.

‘ स्त्रियांच्या डोळ्यापासून मी धडा घेतो कीं, त्याच स्वतः ग्रंथ आहेत, कलाकौशल्यें आहेत, विद्यावृद्धि करण्याच्या शाळा आहेत, आणि जगाला पूर्णपणें पुष्टि येण्यास त्यांच्याशिवाय दुसरा सर्वोत्कृष्ट मार्ग नाहीं.’ —‘ लव्हज् लेबर लॉस्ट ’ ॲक्ट ४.

भार्या सकल श्रमातें हर्ती । भार्या सकल सुखातें कर्ती ॥
भार्या पवित्र वंश धर्ती । यशकीर्ति स्त्रीसंगें ॥ १ ॥
स्त्रीसंगें धर्मनिर्दोष । कुमार्गीं नपवे भ्रंश ॥
भार्या नसतां महादोष । कामादिक पीडिती ॥ २ ॥

—मुक्तेश्वर.

या वरून गृहिणीपदाची योग्यता व जबाबदारी किती आहे हें तुमच्या ध्यानीं येईलच. पतीनें सारा दिवस श्रम करून यथाशक्ति जें काय संपादन करून आणिलें असेल, त्यांत सर्व कुटुंबांतील मनुष्यांच्या गरजा भागविणें, पदार्थ जागच्या जागीं व्यवस्थित ठेवणें, काटकसरीनें खर्च करणें, कोणास कांहीं उणें पडूं न देणें, हीं गृहिणीची कामें होत. गृहिणीचें मुख नेहमीं उल्हासित आणि हास्ययुक्त असें असावें. तिच्या तोंडाकडे पाहिलें असतां ह्या माउलीला दुःख कधीं जन्मांत देखील ठाऊक नाहीं असें पाहणारांस वाटावें. ‘ मनाचें चांचल्य हें मोहाचें उगमस्थान असें समजावें.’ ज्याप्रमाणें एकादि नांव सुकाणु शिवाय वादळामध्यें लाटाबरोबर स्वैरगतीनें वहात जाते, त्याप्रमाणें चंचल मनाचा मनुष्य संसारार्णवांत उत्पन्न होणाऱ्या वादळांतील प्रत्येक मोहरूपी लहरीबरोबर सैरावैरा वहात जाऊन त्याचें चित्त भ्रांत हो-

ऊन तो कोणीकडच्या कोणीकडे बहकून जातो. ‘ मनाची प्रफुल्लता हीं आरोग्यास मुख्य कारणीभूत होय. ’ नानाप्रकारचीं सुखें व सर्व गोष्टी अनुकूल असल्या तथापि मन जर स्थिर नाहीं, तर त्यापासून काडी इतकेंही सुख मिळणार नाहीं. ‘ सदा संतुष्ट मनसाः सर्वाः सुखमया दिशा. ’ वृक्षाचें मूळ कुजलें ह्मणजे ज्याप्रमाणें सगळा वृक्ष कोमेजून जातो, त्याप्रमाणें घरांतील मालकीण त्रासदायक, दुःखी असली ह्मणजे त्याचा परिणाम सर्व घरावर होतो, हें लक्षांत वागवून या बाबतींत प्रत्येक स्त्रीनें आपला वर्तनक्रम ठेवावा. स्त्रीच्या आनंदी स्वभावामुळें सहवासांत असणाऱ्या माणसांचें औदासिन्य नाश पावतें. ‘ केतकी गंधमाघ्राय स्वयं गच्छति षट्पदः ’ ह्मणजे ‘ केतकि आदिकरून पुष्पांच्या सुगंधानेंच त्यांकडे भ्रमर जातात. ’ तसेंच प्रियभागिनींनो ! तुमच्या आयुष्यरूपी उद्यानांत पातिव्रत्य, दया, सहनशीलता, नम्रता व नेमस्तपणा इत्यादि रूपी आमोददायी व मनोहर सुमनांची झाडें लावून जर त्यांचें मनःपूर्वक संगोपन कराल, तरच तुमच्या कुटुंबांतील मनुष्यें तुमच्या अंकित होऊन त्यांचीं अंतःकरणें आनंदानें भरून येतील, व तुह्मींही सर्वतोमुखीं वाखाणल्या जाल. महादेवशास्त्री कोलटकर ह्मणतातः—‘ सत्कृत्याची पुष्पें तोडीतची जावें । सुवासा सोडावें चोंहींकडें ॥ ’ कुलीन स्त्रीनें तीन वस्तूंप्रमाणें नेहमीं वागलें पाहिजे, परंतु त्यांत योग्य तो फेरफार केला पाहिजे.

१. गोगलगाईप्रमाणें स्त्रीनें आपलें घर सांभाळून वागलें पाहिजे. परंतु गोगलगाईप्रमाणें आपलें सर्वस्व पाठीवर घेऊन मिरवित जातां कामा नये.

२. मृदंगाप्रमाणें कोणी बोलावयास लावील तेव्हां स्त्रीनें प्रसंगोचित व मित भाषण करावें. परंतु मृदंगाच्या जलद् 'टाकी' प्रमाणें धांदली आणि गडबडी स्वभाव मात्र बाळगतां कामा नये.

३. मनोऱ्याच्या घड्याळाप्रमाणें स्त्रीनें नियमित आपलें काम केलें पाहिजे. परंतु त्या ठोक्याप्रमाणें सारा गांव ऐकेल एवढ्या मोठ्यानें मात्र बोलतां कामा नये.

—शेक्सपियर.

'हे साध्वी! घरांतील तुझें दिवसाचें सारें कामकाज आटपून जिकडे तिकडे स्वच्छता केल्यावर तुझा पति किती वाजतां घरीं परत यावयाचा आहे, या गोष्टीचें तूं स्मरण ठेव. अति श्रमानें चूर होऊन आणि संसारांतील नानाविध काळज्यांनीं निराश व दुःखी होऊन पूर्ण आराम मिळण्यासाठींच मोठ्या उत्सुकतेनें जेव्हां तुझा पति घरीं येतो, तेव्हां तूं दाराच्या बाहेर त्याला सामोरी जाऊन त्याला घरांत घेऊन जा आणि तुझ्या प्रीति-युक्त अंतःकरणानें व कोमल करानें त्याच्या मस्तकावरील घर्मबिंदु पुसून काढ.'

—वाशिंग्टन्.

एक इंग्लिश ग्रंथकर्ता ह्मणतो:—'शौर्य, राजकारण, कौशल्य किंवा विद्वत्ता त्यांत नांवाजलेल्या स्त्रिया, स्त्रीजातीचीं कर्तव्यें सोडून, आमच्या ( पुरुषांच्या ) हक्कांवर घाला घालितात. स्त्रियांसारखा नटवेपणा करणें पुरुषास जितकें अक्षम्य आहे, तितकेंच पुरुषांचीं कामें स्त्रियांनीं करणें क्षमेस अपात्र आहे. आपल्या नेत्रकटाक्षांनीं

पुरुष जातीचीं अंतःकरणें भेदून टाकणाऱ्या, ज्या स्त्रियांचीं वर्णनें कादंबऱ्यांत केलेलीं आढळतात, त्यांच्यापेक्षां जी स्त्री आपल्या नवऱ्यास व मुलांस सन्मार्गाचें वळण लाविते, तिची योग्यता खरोखरच फार मोठी होय.'

## पत्नीचीं कर्तव्यें.

लेडी बर्टन नामक एका सुप्रसिद्ध आंग्ल विदुषीनें या विषयावर आपले विचार प्रदर्शित केले आहेत, ते प्रत्येक स्त्रीनें ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत, ह्मणून खालीं देत आहे.

१. अगदीं पहिली गोष्ट ह्मटली ह्मणजे तुह्मी पतीच्या जोडिदार होण्यास आणि पतीला सल्लामसलत देण्यास योग्य व विश्वासु आहांत असें त्याच्या प्रत्ययास आणून देऊन त्याला घरीं कसलीही उणीव भासूं देऊं नका.

२. घर पतीला सुखावह होईल असें करा. घर जरी कितीही लहान आणि गरिबीचें असलें तरी तें स्वतःचें घर आहे, हें विसरूं नका.

३. प्रत्येक बाबतींत तुह्मी आपली स्वतःची सुधारणा करा आणि प्रत्येक चांगल्या गोष्टींची माहिती करून घ्या.

४. पतीचा अपमान होण्यासारखें भाषण तुमच्या समक्ष कोणालाही बोलूं देऊं नका, आणि जर कोणी नच ऐकेल तर तुह्मीं तेथून उठून जावें.

५. पति जेव्हां तुमचे दोष तुह्माला दाखवील तेव्हां प्रत्युत्तर न देतां शांत मनानें ऐकून ते सुधारण्याविषयीं काळजी घ्या.

६. तुह्मां उभयतांमध्यें कांहीं कारणावरून वितुष्ट आल्यास सो-लींतल्या खोलींत टेवा. बाहेर कोणालाही त्याचा सुगावा लागूं देऊं नका.

कवी कुलगुरु कालिदास आपल्या शाकुंतल नाटकांतील चौथ्या अंकांत ह्मणतातः–

शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखी वृत्तिं सपत्नी जने ॥
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मास्मप्रतीपं गमः ॥
भूयिष्टं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी ॥
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयाः ॥ १ ॥

याच श्लोकाचें कै. परशुरामपंत गोडबोले यांनीं पुढील सुरस भाषांतर केलें आहे

शुश्रूषा पतिची करी, सवतिशी स्नेहप्रवृत्ती धरी ॥
केलें यद्यपि अप्रिय स्वपतीनें कोपूं नको अंतरीं ॥
राही सावध फार, गर्व न धरी दासी करावी दया ॥
येणें पावति थोर मान युवती, होती दुजा अप्रिया ॥ १ ॥

तसेंच या कविश्रेष्ठ कालिदासानें आपल्या स्वाभाविक चातुर्यानें स्त्री आणि पुरुष यांचें ‘नवमल्लिकेशीं’ आणि ‘सहकाराशीं’ सादृश्य दाखविलें आहे तें किती सुंदर आणि यथार्थ आहे हें पहा:– मल्लिका ही आपलें कोमल लतात्मक शरीर आम्रवृक्षासभोंतीं पसरते. आपल्या नूतन पल्लवांनीं जणुं त्यास वारा घालित, सुवासयुक्त पुष्पांच्या गुच्छांनीं त्याची सन्मानपूर्वक पूजा करिते, आणि त्याचेच आश्रयानें स्वतःस हितकर अशा सौर प्रतापाचा उपभोग घेते. हा नित्याच्या सुखाचा प्रकार झाला. आतां दुःखाच्या वेळचा सहचरि-

धर्म पहा. जेव्हां प्रचंड वारा सुटतो आणि सहकाराच्या खांद्या वगैरे मोडण्यास आरंभ होतो, तेव्हां तीच मल्लिका सभोंती गुरफाटलेल्या आपल्या वेलांवरून त्यास पडूं न देतां सांवरून धरण्यास साह्यभूत होते. त्याचप्रमाणें सम वर्तन जर आमचा भगिनीवर्ग आपल्यां पतीशीं ठेवील तर त्यांत उभयतांचें किती बरें कल्याण होईल? एका आंग्ल ग्रंथकर्त्यानें ह्मटलें आहे कीं, स्त्री ही प्रायः गृहकृत्याला, आणि पुरुष हे घराबाहेरच्या कृत्यांना योग्य असावेत. तेव्हां गृहिणीनें गृहकृत्यांत निपुण होण्यास व जगाकडून चांगलें ह्मणवून घेण्यास खालील गोष्टी ध्यानांत ठेवून किंवा समजावून घेऊन त्याप्रमाणें वागण्याचें करावें.

पातिव्रत्य हेंच स्त्रीचें आदिभूषण आहे.

सत्य आणि मित भाषण करणारी, सहनशील आणि उत्साह पूर्वक आपलें काम करणारी स्त्री सर्वांच्या आदराला प्राप्त होते.

पति, सासू, सासरा, दीर, जावा, नणंदा, इत्यादि कुटुंबांतील माणसांशीं व अन्य जनांशीं प्रेमानें वागून त्यांचें मन प्रसन्न राखण्यास झटणें हें सुस्त्रीचें लक्षण आहे.

स्त्रीच्या आचरणावरून तिच्या आईबापाच्या आणि सासरच्या कुळांची लोक परिक्षा करितात. याकरितां प्रत्येक स्त्रीनें सदाचारी होण्यास झटावें.

मातृपदाला पोंचण्यापूर्वी मातेचीं कर्तव्यें काय आहेत तीं नीट समजावून घेण्याचा प्रयत्न करावा.

मुलांच्या शिक्षणावर व त्यांच्या वर्तनक्रमावर मातेनें नेहमीं नजर ठेवावी.

एकाद्या मातृहीन मुलाची आई होण्याची वेळ आली तर त्याला स्वतःच्या मुलाप्रमाणें जपा. त्याजवर निर्मल प्रेम ठेवा.

प्रत्येक मुलीला लग्नाचे पूर्वी गृहव्यवस्थेसंबंधीं शिक्षण मिळालें पाहिजे.

स्नान करणें, लुगडें नेसणें, चोळी घालणें, हीं कामें पुरुषांच्या नजरे आड करावींत.

परपुरुषांबरोबर वारंवार भाषण करणें, त्याची थट्टा करणें, हास्यादि विनोद करणें, यापासून क्वचित् प्रसंगीं नवऱ्याचे मनांत विकल्प येऊन अनेक अनर्थ ओढवतात. याकरितां प्रत्येक स्त्रीनें असले प्रसंग टाळतां येतील तेवढे टाळावेत. पुरुषाच्या कित्येक गोष्टी गुह्य असतात त्या समजावून घेण्याचा प्रयत्न करूं नये.

आमच्या हिंदु समाजांतील बहुतेक स्त्रिया स्वतःला कांहीं दुखणेबाणें आलें असतां होतां होईतों लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं देत नाहींत. आंगावरच तें रेटतात. तर असें करूं नये. त्यास वेळींच जपावें. अशा वागण्यानें खर्च व इजा कमी होते. प्रकृति सुस्थितींत असणें ह्मणजे शरीराचे व्यापार यथास्थित रीतीनें चालणें; त्याचेंच नांव आरोग्य. ते कसें ठेवावयाचें हें माहीत असणें फार महत्वाचें आहे ह्मणून त्याची माहिती करून घेऊन किरकोळ लागणाऱ्या घरगुति औषधांचीही माहिती असावी, ह्मणजे लहानसान दुखण्यांत वैद्य बोलविण्याची जरूर पडणार नाहीं.

## सर्वसाधारण नियम.

१. सुशीलता, स्वच्छता, नम्रता आणि संतुष्ट वृत्ति हे गुण मनुष्याच्या कीर्तीचे आधारस्तंभ होत.

२. क्रोध, लोभ, मोह, मत्सर, निर्लज्जता आणि अति हास्य हे मनुष्याच्या कीर्तिरूप चंद्रास ग्रासून टाकण्यास टपून बसलेले राहूच आहेत.

३. कोणाही मनुष्याविषयीं बरें बोलतां येण्यासारखें असतां त्या विषयीं कधींही वाईट बोलूं नये; दुसऱ्याबद्दल बरें बोलावें इतकेंच नव्हे, तर त्यांच्याविषयीं चांगली बुद्धि बाळगावी.

४. एकाद्यानें तुमची निंदा केली तर रागावूं नका. प्रथम तुमच्यांत निंदास्पद असा कांहीं दोष आहे कीं नाहीं, याचा विचार करून पहा. जर तुमच्यांत दोष असतील तर ते घालविण्याचा यत्न करा; आणि कदाचित् नसला तर वाईट वाटूं न देतां तुमच्या निंदकाशीं प्रसन्नमुद्रेनें गोड बोला. अशानें ते लाजून कृतकर्माबद्दल पश्चात्ताप पावून तुमच्याशीं चांगुलपणानें वागतील.

५. चाकरमाणसांवर व मुलांबाळांवर वारंवार रागावूं नये, व त्यांस कठोर शब्दांनीं दुखवूं नये. अपराधाप्रमाणें लहान मोठें शासन करावें.

६. सर्व गोष्टी विचारानें कराव्या आणि अडचणीचे प्रसंगीं धैर्य देण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करावी.

७. आपणांवर व दुसऱ्यांवर जीं संकटें येतात, त्यांपासून कांहीं तरी बोध घेत असावें म्हणजे दुसरीं संकटें आपणास टाळतां येतील.

८. साधुसंत व विद्वान् यांनीं जें कांहीं म्हटलें आहे त्याचा आनंदानें शोध करावा व त्यांच्या म्हणण्याचें शांतपणानें मनन करावें. कारण त्यांनीं तें कांहीं कारणाशिवाय म्हटलें असेल असें नाहीं. तरी पण सर्वच लेखांवर भरंवसा ठेऊन त्याप्रमाणें वागूं नये, तर 'क्षीर नीर' न्याय जागृत ठेवावा. कवि कुलगरु कालिदास यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं:—

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यं ।
सन्तः परिक्षान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेय बुद्धिः ॥

भावार्थ:—'जुनें म्हणून सर्व चांगलें म्हणतां येत नाहीं. शहाणे लोक परीक्षा करून कोणतेंही ग्रहण करीतात. मूर्ख लोक दुसऱ्याच्या सांगीप्रमाणें चालतात.'

९. 'अपात्रेभ्यस्तु दत्तानि दानानिच बहून्यापि वृथा भवंति'

'अपात्रीं दान सर्व निष्फळ होतें.' ह्मणून शक्त्यनुसार गरिबांस ह्मणजे अंध, पंगू, वृद्ध, रोगग्रस्त, सारांश खरोखरच जे परावलंबी असतात त्यांसच दानधर्म करावा. आणि तेंच 'सत्पात्रीं दान.' धट्टेकट्टे लोकांस मूठभर तांदूळ सुद्धां घालूं नयेत. अशा लोकांस धर्म केल्यास त्यांस उद्योगाची संवय न लागतां आळशी बनविल्याचा दोष आपल्या मस्तकीं बसतो.'

दूरवर दृष्टि, स्वार्थत्याग ऊर्फ स्वतास अडचण सोसण्याची किंवा स्वतःच्या हिताची पर्वा न करण्याची संवय, सहनशीलता, उद्योग, मनाचा उदारपणा, व्यवहारांत दक्षता, दुसऱ्याची मर्जी

संपादण्याची व आपला बोज राखून घेण्याची चतुराई वगैरे अनेक महत्वाचे गुण गृहसंसार चालविणाऱ्या गृहिणीस अत्यंत अवश्य व उपयोगी आहेत. संसारकाम सुरळीत चालविण्यास व संततीची योग्य जोपासना करण्यास ईश्वरानें स्त्रिया निर्माण केल्या आहेत. पुरुष आपापलीं कामें करित राहिले, आणि स्त्रिया घरदारासंबंधीं काळजी सोडून व फाजील शहाण्या होऊन जर खुशाल चकाट्या पिटित बसल्या आणि आपापल्या नवऱ्यांना आम्हाला अमूक पाहिजे, तमूक खायला पाहिजे, तमकं ल्यायला पाहिजे, स्वयंपाकाला आचारी पाहिजे वगैरे निरर्गल चोचले व बाष्कळपणा त्या करतील तर त्यांचा यांत काय बरें मोठेपणा राहील ? अशा रीतीनें स्वतः स्वतंत्र बनून गृहसौख्यांत बिघाड आणणें आणि आपल्या वर्तनाचा कित्ता आपल्या मुलाबाळांपुढें ठेवून त्यांच्याहि द्वारें आपल्या जांवयाव्याह्यांचीं घरें बिघडविण्याची जर स्त्रियांनीं सुरवात केली तर त्याचा भयंकर परिणाम परंपरेनें त्यांच्या संततीस भोगावा लागेल. गृहिणीनें आळसास अंगांत जागा दिली नाहीं, तर तिच्या मनाप्रमाणें तिला पुष्कळ घरांतलें काम करितां येईल. कामाचा कंटाळा व दुर्लक्ष करीत गेलें तर कुबेराला देखील दारिद्र्य येण्यास उशीर लागणार नाहीं. पण चोहोंकडे बारीक दृष्टि, उद्योगीपणा व संसाराची आस्था असली तर गरिबाचा संसार देखील सुखदायक होईल. मेहनतीनें ‘ कोंड्याचा मांडा करीतां येतो. ’ कावले असें ह्मणतो कीं, ज्या गृहाभोंवतीं सुंदर बाग व आंत ग्रंथसंग्रह आहे, त्या गृहाची थोरवी अवर्णनीय होय;

आणि अशा गृहांत जर पतिव्रता स्त्री असली तर त्या गृहसुखास पारावारच नाहीं.

सती चतुर गेहिनी वसत ज्या गृहीं सद्गुणी,
अखंड सुख सोहळा, नय, विवेक तेथें गणी;
सुहास्य वदनां तिच्या गमाति रम्य पुष्पें नवीं,
मनीं विविध पुस्तकग्रथित सुबोध ती सांठवी. ॥ १ ॥

—कावळे.

आमच्या विद्वान् पूर्वजांनीं स्त्रियांना ‘ गृहलक्ष्मी ’ असें सन्मानाचें पद दिलें आहे. या नांवाला साजेल असें वर्तन जर स्त्रियांनीं ठेविलें तर मूर्तिमंत ‘ लक्ष्मीच ’ त्यांच्या घरांत सदोदित वास करील. ‘ भार्याच षाड्गुण्यवतीह दुर्लभा. ’



## प्रकरण ४ थें.

# घरखर्च.

न विषं विषमित्याहुर्ब्रह्मस्वं विषमुच्यते ।
विषमेकाकिनं हन्ति ब्रह्मस्वं पुत्रपौत्रिकम् ॥—सुभाषित.

जे लोक आपलें द्रव्य पाहिजे तसें उधळून टाकीत नाहींत, व व्यवस्थेनें खर्चितात, त्यांस प्रतिष्ठा व सुख या दोन गोष्टींचा लाभ होतो. संसारांत पुष्कळ पदार्थांची जरूर लागते. म्हणून त्या गरजा भागविण्याकरितां आपणास मितव्ययी होण्यास शिकलें पाहिजे. उत्पन्न जितकें कमी तितकी मितव्यय करण्याची गरज अधिक असते. सर्वांची स्थिति व खर्च सारखा नसल्यामुळें अमुकच खर्च करीत जावा, असा नियम करितां येत नाहीं. तथापि कांहीं ठोकळ सूचना करतां येतील असें वाटल्यावरून त्या पुढें दिल्या आहेत.

खालीं दिलेलीं कोष्टकें सर्वांस उपयोगीं पडतीलच असें नाहीं. कोष्टकांत गृहिणीनें आपल्या रोजच्या खर्चाची अटकळ बांधून दर-महा रक्कम अमूक असें ठरवून आंकडे भरून ठेवावे. त्या आंकड्यांचा मासअखेर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाशीं कितपत मेळ बसतो तें पहावें, व पुढील महिन्यांत जरूर तेथें फेरफार करून घ्यावा.

| | महिन्यांचीं नांवें. | घर भाडें. | धान्य खातें. | तूप,तेल(वगैरे)किराण खातें | कापडलत्ते खरेदि खातें. | लांकुड व कोळसाखातें. | दिवाबत्ती तेलवगैरेखातें. | कपडे धुणावळखातें. | मुलांच्या विद्याभ्यास फीवगैरे | दानधर्मखातें. | चाकर पगार खातें. | गुरें घोडा वगैरे खातें. | डाक्टर शिंपी वगैरे खातें. | पाहुणचार सणवगैरेखातें. | दरमहा खर्च एकूण. | मासिक शिल्लक. | कमजास्त खर्चाचें कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | |
| १ | जाने | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | फेब्रु | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | मार्च | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | एप्रिल | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | मे | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | जून | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | जुलै | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | अ.गष्ट | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | सपटेंबर | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | अक्टों. | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | नवेंबर | | | | | | | | | | | | | | | | |
| १२ | डिसेंबर | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

वरील कोष्टकांपैकीं, कांहीं अशीं आहेत कीं, त्यांतील रकमा दरमहा खर्च होण्याचा संभव नाहीं. उदाहरणार्थ–कपडा, शिंपी, पाहुणचार, सणवार हे खर्च दरमहा करावे लागतात असा नेम नाहीं. ह्मणून दरमहा त्या त्या कारणासाठीं थोडथोडी रक्कम सांचवून ठेवून जरूर पडेल तेव्हां खर्च करावी. अशानें खर्चाचा बोजा एकदम अंगावर पडत नाहीं हें एक. व दुसरें चांगला माल कोठें आकस्मिक आढळल्यास " काय करूं बाई, घ्यावसं वाटतं, पुनः असं मिळायचं नाहीं, पण, हातांत पैसे नाहींत " असें ह्मणण्याची पाळी सहसा यावयाची नाहीं व मनालाही वाईट वाटणार नाहीं. एक पाश्चिमात्य विदुषी ह्मणतेः—" शहाणी स्त्री आपल्या प्राप्तीच्या मानानें खर्चाचा बेत ठेवीत असते. तिचें उत्पन्न मोठें असो किंवा लहान असो, ती उत्पन्नापेक्षां खर्च कमी करते, मोठें उत्पन्न असलें ह्मणून ती चैनींत पैसा उधळीत नाहीं. कोणत्या कामास किती खर्च करणें योग्य आहे हें तिला समजत असतें आणि हें समजणें गृहव्यवस्था–उत्तम रीतीनें चालण्यास अवश्यक आहे. खर्चाच्या योग्यायोग्यतेवरून जशी गृहिणीच्या तारतम्य शक्तीची पारख होते, तशी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवरून होणार नाहीं. प्रत्येक बाबतींत काटकसर कशी करावी हें हलक्या बुद्धीच्या किंवा अशिक्षित माणसांस समजण्याचा संभव नसतो. परंतु काटकसर कशी करावी ह्याविषयीं ज्ञान संपादणें आणि त्याप्रमाणें व्यवहारांत वर्तन ठेवण्याचा यत्न करणें हें कोणाही स्त्रीस मग ती कितीही बुद्धिमती असो हें भूषणप्रद आहे. "

काटकसर करूं इच्छिणारांनीं पुढील गोष्टी नीट ध्यानांत ठेवाव्यात.

१. एकंदर खर्चाची रक्कम प्राप्तीच्या बाहेर जातां कामा नये.

दरमहा कांहीं तरी शिलकेस टाकावें.

माल घ्यावयाचा तो चोख घेऊन रोखीनें व्यवहार करावा.

अगदीं अवश्य लागणाऱ्या वस्तु खरेदी कराव्या, चैनीचे पदार्थ ऐपत असली तरच विकत घ्यावे व तेही फार थोडे घ्यावे.

पैन पै जपून खर्चावी, क्षुल्लक ह्मणून काना-डोळा करूं नये. यःकश्चित् रकमाच मोठ्या रकमा होतात.

खर्च झाला असेल तो सर्व टिपून ठेवावा.

वापरण्यासाठीं जें कापड घ्यावयाचें तें घेतांना शोभेपेक्षां उपयोगाकडेच जास्त लक्ष दिलें पाहिजे.

पुढें ज्या वस्तूंची गरज लागणार तिची अगोदर तरतूद करून ठेवावी. कोणाबरोबर पैशाचा अथवा देण्याचा व्यवहार करतांना मनुष्यें जरी भलीं दिसत असलीं, तरी समयास तीं बदललीं तर कसा परिणाम होईल हें मनांत आणून वडील मनुष्यांस किंवा स्वतंत्र असेल तर पतीस विचारून व्यवहार करावा.

कोणताही पदार्थ दुसऱ्यास देण्यापूर्वीं आपल्या स्वतःच्या गरजा पुरून शिल्लक राहिल कीं काय? याचा पूर्ण विचार करावा.

राथ्स चाइल्ड ह्मणून एक नामांकित व्यापारी होऊन गेला तो ह्मणतोः—"संपत्तिवान् होण्यास धीटपणा पुष्कळ पाहिजे. तसेंच मनुष्यानें सावधगिरीही जास्त ठेविली पाहिजे. ह्मणजे प्रत्येक गोष्टीचा पूर्वीं सारासार विचार केला पाहिजे. व हे दोन आंगीं आले ह्मणजे ते राखण्यास दसपट शहाणपण किंवा चातुर्य पाहिजे. पैची काळजी घ्या, ह्मणजे रुपये आपले आपण काळजी घेतील."

ऋण काढून सण करूं नये. पाप करावें, कर्ज काढावें, ह्यांत मनुष्यांस सुख वाटतें, पण त्याचा परिणाम फार गहन आहे. तो मोठमोठ्यांचा नाश करितो.

याविषयीं डाक्टर जानसन ह्मणतो:—

"कर्जानें नुसती गैरसोय होते इतकेंच समजू नका, तर तें एक मोठें संकट आहे असा तुह्माला अनुभव येईल. गरिबाला परोपकार करण्याचे पुष्कळ मार्ग असून नसल्यासारखें होतात. सृष्टिक्रमाविरुद्ध व नीतिविरुद्ध गोष्टी आचरण्याला बरेच वेळां गरीबी कारण होते. तेव्हां पहिली ही गोष्ट ध्यानांत धरा कीं, कोणाचें ऋणको ह्मणून व्हावयाचें नाहीं. तसेंच गरीबी घालविण्याविषयीं निश्चय करा. दारिद्र्य हें मनुष्याच्या सुखाचा शत्रु व स्वातंत्र्याचें विघातक आहे. दरिद्री मनुष्याचे सद्गुण निरर्थक असतात. मित व्यय हा सुखशांतिचा पाया आहे. ज्याला स्वतःला मदत पाहिजे आहे तो दुसऱ्याला कसली मदत करणार ! ! कर्जाच्या योगानें मनुष्य स्वाभिमानशून्य बनतो. धनको व त्यांचे नोकर यांचा तो बंदागुलाम होतो. धनकोच्या दारावरून जातांना त्याला तोंड झांकून घ्यावें लागतें. कर्जबाजारी मनुष्य वेळ मारून नेण्याकरितां किती वेळां तरी खोटें बोलतो. म्हणून प्रामाणिकपणानें व सचोटीनें वागण्यास काटकसरीनें राहणें किती अगत्याचें आहे बरें ?" बेंजामिन फ्रांक्लीन यानें छापलेल्या 'अलमनाकां'तील "संपत्ति मिळविण्याचे उपाय" या विषयासंबंधीं युनैटेड स्टेटस् मधील लोकांस एक प्रसिद्ध लिलावाच्या ठिकाणीं जो त्यानें सदुपदेश केला आहे त्याचा सारांशः—"खर्चवेंच

बेतबातानें आणि काटकसरीनें करा. आपल्या उत्पन्नांतून कांहीं रक्कम मग ती कितीही थोडी कां असेना शिलकेंत टाकीत जा. खाणेंपिणें, नाचतमाशे, गाणेंबजावणें, ह्यांत व्यर्थ पैसा जाऊं देऊं नये. एखादा दुर्गुण ह्मणा, किंवा एखादें व्यसन ह्मणा, मनुष्यास जडलें कीं त्या व्यसनाला लागून असणारे दुर्गुण किंवा दुर्व्यसनें सहकुटुंब–सहपरिवार त्याच्या पाठीमागें आलींच म्हणून समजा. एखादे वेळीं करमणुकी-साठीं ह्मणून थोडासा खर्च जास्त केला ह्मणून काय होणार आहे? असें ज्याचें मत असेल त्यांनीं 'राईचा पर्वत" होतो हें मात्र पक्कें ध्यानांत ठेवावें. एवढें मोठें जहाज असतें ना, पण त्याला एकदां एवढेंसें छिद्र पडलें आणि तें वेळींच बंद न केलें तर कांहीं वेळानें त्या जहाजाला तें तळीं घेऊन जातें. ज्याच्या जिव्हेला खाण्यापिण्याची विशेष चटक असते त्याला तें दारिद्र्यसूचक कुलक्षणच आहे. मद्देश बांधव व भगिनीनों! तुह्मी ह्या ठिकाणीं लेलावांतून एकादि चांगलिशी जिन्नस मिळाल्यास घ्यावी ह्या उद्देशानें जमलां आहांत. कारण लेलावांत माल स्वस्त मिळतो असा तुमचा साधारण समज आहे. पण ज्याची वस्तुतः मुळींच गरज नाहीं असा पदार्थ विकत घेण्याची मुळींच गरज नाहीं. असा पदार्थ विकत घेण्याची संवय जडली ह्मणजे कधीं कधीं असे प्रसंग येतात कीं, ज्यांची आपणांस बहुत जरूर आहे असे जिन्नस विकावे लागतात. अशा निष्कारण खर्चीमुळें पुष्कळांवर दारिद्र्याचा घाला पडून ज्यास त्याचें कधींसुद्धां दर्शन झालें नसेल अशा मनुष्यापुढें जाऊन कर्ज काढण्याकरितां तोंड वेंगाडावें लागतें. त्याकरितां गरिबांनीं मोठ्यांचें अनुकरण कधीं करूं नये. 'फुगून फुगून मी बैलाएवढा मोठा होईन' हें जसें

बेडकाचें बोलणें व्यर्थ, तसेंच सधन लोक करितात त्याप्रमाणें जर एकादा गरिब मनुष्य मी करीन ह्मणेल, तर बेडकाप्रमाणें पोट फुगून मरून मात्र जावयाचा!! ह्याकरितां स्त्रीपुरुषहो! अशी विनाकारण पैशाची उधळपट्टी करण्याच्या दुष्ट संवयी सोडून द्या."

'कॉबेट' ह्मणतो:—

"तुह्मी स्वतःच काटकसरीनें वागा, नाहीं तर दारिद्र्य तुह्मांस तसें वागण्यास भाग पाडील."

पहिल्यानें कर्ज काढण्याला मनुष्यास जीं कारणें होतात, त्यापैकीं कांहीं कांहीं ठोकळ कारणें सांगतों.

१ उद्याचा विचार न करीतां खाण्यापिण्याची चैन करणें.

२ ईश्वरी क्षोभ. [ आग लागणें, दरोडा पडणें, वगैरे ]

३ दुर्व्यसन. [ वेश्यागमन, मादक पदार्थांचेंसेवन करणें, किमयेच्या नादि लागणें वगैरे. ]

४ जामिनगिरी. ५ जुगार. ६ अलंकारांची आति तृष्णा.

७ लग्नादि कार्यांत उधळेपणानें होणारे खर्च. यांपैकीं ईश्वरी क्षोभ मात्र मनुष्याच्या स्वाधीनचा नाहीं. बाकी सर्व कारणें आपल्या हातचीं आहेत. अलंकारांची तृष्णा, कार्यांतील उधळेपणानें होणारे खर्च व खाण्यापिण्याची चैन हीं सर्व स्त्रियांवरच अवलंबून असतात. मनुष्याच्या इच्छा जितक्या वाढवाव्या तितक्या वाढतात व त्या सर्व

तृप्त करण्याकरतां अनेक पदार्थ घेऊं लागलों तर परिणामीं त्यापासून हानीच उत्पन्न होते. ह्मणून प्रियभागिनींनों ? ' आंथरुण पाहून पाय पसरावे ' ह्या ह्मणीकडे चांगलें लक्ष देऊन निरर्थक हौस न धरितां आपल्या ऐपतीप्रमाणें खर्च करा. परंतु हौस पुरविण्याकारितां दोन पैसे कोणाचे कर्ज मात्र काढूं नका कारण-- आगमे सुखसंप्राप्ति, निर्गमे प्राण संकटम्."

## प्रकरण ५ वें.

# दांपत्यप्रेम.

स्नेहा नाहुः किमपि विरहेध्वांसिनस्तेव भोगात् ।
इष्ट वस्तु न्युपचितरसाः प्रेमराशी भवंती ॥

—मेघदूत

प्रेम हा अपूर्व पदार्थ आहे. आता प्रेम ह्मणजे काय ? असें जर कोणी विचारिलें तर त्याचें उत्तम लक्षण किंवा वास्तविक स्वरूप आमच्यानें व्यक्त करून दाखवितां येणार नाहीं. मातेची पुत्राविषयीं किंवा दयिताची दयितेविषयीं जी ममत्वबुद्धि असते तेंच प्रेमाचें स्वरूप आहे. ह्मणून, उदाहरणावरूनच त्याचें स्वरूप जाणलें पाहिजे. नारदानींही ५१ पासून ५५ सूत्रांपर्यंत हींच गोष्ट सांगितली आहे. ते ह्मणतात:—“ प्रेमाचें स्वरूप अनिर्वचनीय आहे. मुक्या मनुष्यास

पदार्थांचा स्वाद जसा सांगता येत नाहीं, त्याच प्रकारें, कामनांनीं रहित, प्रतिक्षणीं अधिकाधिक वाढणारें, अत्यंत सूक्ष्म आणि केवळ अनुभवस्वरूप असें आहे. ”

पवित्र प्रेमानें आत्मा उन्नत होतो, मन पवित्र होतें, अंतःकरण भक्तिभावानें उचंबळूं लागतें. प्रेमाशिवाय भक्ति कधींही जडणार नाहीं. केवळ प्रेम ह्मणजेच कांहीं भक्ति नव्हे. तर प्रेमाबरोबर भक्ति नेहमीं असतेच. अर्थात प्रेम असेल तर भक्ति आणि भक्ति असेल तरच मुक्ति. तेव्हां अशा या अद्वितीय ‘प्रेमा’ बद्दल प्रत्येकाला शिक्षण मिळणें अत्यंत इष्ट आहे. मनुष्य प्रथमतः प्रेमाचा धडा आपल्या आईजवळ शिकतो. ह्मणूनच बालकाच्या त्या चिमुकल्या हृदयांतील चिमुकलें प्रेम पहिल्यानें आपल्या आईकडे धांव घेतें. मातृप्रेमांतच बालकांना प्रेमाचें शिक्षण मिळत असतें आणि हेंच पुढें यौवनदशेंत मूर्तिमान दांपत्य प्रेमाचें स्वरूप धारण करितें. ज्याप्रमाणें आई आपल्या मुलांबाळांवर प्राणापेक्षांही अधिक प्रीति करिते, त्याप्रमाणें पतिपत्नींनीं परस्परांवर प्रेम करून प्रीति संपादन करावी. विवाह होतांच पतिपत्नीचा चिरसंबंध सुरू होतो. याविवाहासंबंधीं एके ठिकाणीं वाल्टर यानें ह्मटलें आहे कीं: “ लग्न हें खरोखरच जनसमाजाच्या, देशाच्या, व जगाच्या कल्याणाचें साधन आहे. जगांत जेवढीं दांपत्यें जास्त, तेवढें गुन्ह्याचें प्रमाण कमी. असा सर्वत्र अनुभव आहे. लग्नापासून मनुष्याला नीति आणि शहाणपण प्राप्त होतें. एकटा मनुष्य अपुरा आहे, ह्मणून लग्न झाल्यावर तो पूर्ण होतो. आणि यावरूनच विवाहित स्त्रीस ‘अर्धांगी’ अशी महा भूषणावह पदवी मिळाली आहे. ” तसेंच आ-

मच्या धर्मग्रंथांतही वचन आहे कीं "स्त्रियेविणें जो नर। तयासी न साधे कर्माचार"

पत्नीमूलं गृहं पुंसां यदिछंदानुवर्तिनी ॥
तया धर्मार्थ कामानां त्रिवर्गफलमश्नुते ॥ १ ॥ द. सं.

पुरुषाला गृहस्थाश्रम स्त्रीमूलक आहे. स्त्रीच्या सहाय्यानें तिचा पति, धर्म, अर्थ, काम या तिन्हींचे फळांचा फळांचा उपभोग घेतो.

अनुकूलानवाग्दुष्टा दक्षासाध्वी प्रियंवदा ॥
आत्मगुप्ता स्वामिभक्ता देवतासा न मानुषी ॥ २ ॥ द. सं.

"जी स्त्री पतीला अनुकूळ, दुष्ट भाषण न करणारी, दक्ष ( प्रपंचांत हुषारीनें वागणारी ), साध्वी ( पातिव्रत्य लळणानें युक्त ) पतीला प्रिय तेंच बोलणारी, पातिव्रत्याचें रक्षण करणारी, आणि पतीची अनन्यभावानें भक्ती करणारी अशी जी स्त्री, ती मनुष्य नसून देवतासमान होय.

अनुकूलकलत्रोयः तस्यस्वर्गइहैवहि ॥
स्वर्गोपि दुर्लभंह्येतदनुरागः परस्परम् ॥
एभिरेव गुणैर्युक्ता श्रीरेवस्त्री न संशयः ॥ ३ ॥ द. शं.

"ज्या पुरुषास त्याची स्त्री अनुकूल आहे त्यास स्वर्गलोकचें सुख येथेंच मिळतें. स्त्रीपुरुषांची एकमेकांवर प्रीति असणें हें स्वर्गीही दुर्लभ आहे आणि अशा गुणांनीं युक्त जी स्त्री ती स्त्री नसून साक्षात् लक्ष्मीच आहे हें निःसंशय होय."

'समुद्र मंथन केलें असतां' ज्याप्रमाणें कांहीं बरें वाईट पदार्थ

सांपडतात. त्याचप्रमाणें या जगांत अवलोकन केलें असतां त्यांतही आपणांस सुगुणी दांपत्यें व दुर्गुणी दांपत्यें आढळून येतात; व तदनुरोधानें या पवित्र प्रेमांतही दोन प्रकार आढळतात.

१ ला. अहेतुक ह्मणजे शुद्ध व प्रेमाकरितांच केवळ स्वाभाविक रीतीनें प्रेम ठेवणें. कोणत्याही स्थितींत कालक्रमण करण्याचा प्रसंग आला, तरी सदा निर्मळ मनानें व अकलुषित अंतःकरणानें आपल्या पतीच्या ठायीं शुद्ध प्रेम ठेवून आनंदांत पतिसुख घेतात त्या साध्वी या प्रतीच्या होत.

२ रा. स्त्रियांचें पुरुषांच्या ठिकाणीं जें प्रेम असतें, त्यांत कांहीं हेतू किंवा कारण प्राधान्य असतें. ह्मणजे कांहीं बायकांस दागिन्यांची व कपड्यालत्याची फार हांव असते. तसेंच त्यांचीं मनेंही तऱ्हेवाईक बनलेलीं असतात. खऱ्या सुखाचें ज्ञान त्यांस बिलकुल नसतें. प्रत्येक गोष्ट त्यांच्या मनासारखी झाली तरच आनंद ! नाहीं तर त्या विचाऱ्या नवऱ्यास, रुसूनफुगून, त्रासदायक बोलून, प्राण नकोसा करितात. कधीं सुखाचा शब्द मिळेल अशी आशा नकोच अर्धांगीच्या भोंवयावर शैवदीक्षा दर्शक चिन्ह जें त्रिशूळ तें डागल्याप्रमाणें नेमहीं असावयाचेंच !! प्रिय वाचकहो ! “ समान शीले व्यसनेषु सख्यं ” ह्मणजे—सारख्या स्वभावाच्या, सारख्या शीलाच्या किंवा ज्यांचे आचार विचार, प्रवृत्ति झोंक एकच आहेत. सारांश वास्तविक जे एकरूप झालेले असतात, अशा दोन व्यक्तींमध्येंच सख्य वास करूं शकेल, असा सर्वसाधारण नियम आहे. मित्रांचे परस्पर मनोगत जुळल्याशिवाय दोघांचा निकट सहवास राहणें शक्यच नाहीं.

ही साधारण मित्राची स्थिति झाली. मग ज्या परस्पर व्यक्तींवर परस्परांचें सुखदुःख अवलंबून असतें अशा इष्ट व्यक्तींमध्येंच जर फाटाफूट असेल तर त्या ठिकाणीं सुभाषितकारानें ह्मटल्याप्रमाणें "धिग् धिग् गृहस्था श्रमम्" असेंच वाटावयाचें !! अरेरे अशा दुष्ट भार्येशी ज्या हतभाग्याची गांठ पडली असेल, त्याची स्थिति किती शोचनीय असेल बरें ? बिचाऱ्यास जर सुशील आणि सुशिक्षित स्त्रीचा समागम झाला असता, तर संसारांतील नानाविध अडचणींमुळें क्षुब्ध झालेल्या त्याच्या मनोवृत्ती शांत होऊन दुसऱ्या दिवशीं तो पूर्व दिवसापेक्षां विशेष उत्साहानें आणि हिमतीनें या संसारार्णवांतील विघ्नरूपी तुफानाच्या जबरदस्त लाटाशीं टक्कर देण्यास मोठ्या नेटानें व उमेदीनें पुढें सरसावला असता. परंतु संसारशकट चालविण्याच्या काळजीनें व अश्रांत श्रमानें ज्याचें अंतःकरण व्यग्र झालें आहे असा संसारी मनुष्य आराम मिळण्याच्या आशेनें घरीं येताच, आपल्या दुष्ट व नीच पत्नीचा असंतोष, कुशब्दांचा वर्षाव, त्रासदायक बडबड आणि वाघिणीसारखी क्रुद्ध मुद्रा जर त्यानें पाहिली तर त्यास काय वाटेल बरें ? माझ्या मतें तरी असें वाटतें कीं ज्या दांपत्यांचीं मनें एकमेकांविषयीं शुद्ध नाहींत, ज्यांच्या ठिकाणीं प्रेमाचा गंध नाहीं अशींच दांपत्यें कुमार्ग स्वीकारतात. प्रिय भगिनींनो ! तुमच्या भर्त्यांस सुखी किंवा दुःखी करणें सर्वस्वी तुमच्या हातांत आहे. तुह्मां दांपत्यांची मनें जर एक जमलीं एकदिलानें व एकमतानें जर तुह्मीं वागूं लागलात, तर एकास दुःख झालें असतां दुसऱ्यास वेदना येऊन अश्रूपूर्ण नेत्र झाल्याशिवाय राहणें शक्यच नाहीं. अशी स्थिति ज्या ठिकाणीं

असेल तेंच आनंदाचें माहेरघर व लक्ष्मीचें आखंड वास्तव्यस्थान! मनास रमविणारें रम्योद्यान. हेतुर्नैसर्गिकः कोऽपि प्रीतेर्यद्धिविवर्तते। मालती मधुरास्तीति मधुपः केन शिक्ष्यते॥ सारांश—प्रेमबद्ध स्त्रीपुरुषें कांहीं कारणानें एकमेकांपासून दूर झालीं, मध्यें शेंकडों कोसांचें अंतर असलें, किंवा डोंगर, नद्या व महासागर मध्यें असले तरी त्यांच्या प्रेमांत अंतर पडत नाहीं. तें कमी न होतां उलटें अधिकच होतें.

दुर्वास ऋषीसारख्या शीघ्रकोपी नवऱ्याच्या सहवासांतून निभावून पतीच्या घरांत जन्मपर्यंत सुखासमाधानानें संसार करून नांदणें, अग्नी सारख्या जाज्वल्य पतीची प्रीति संपादन करून राहाणें हा आर्य स्त्रीचारित्र्यांतील प्रेमाचा केवढा प्रभाव आहे बरें? प्रेमाच्या योगानें अद्भूतपूर्व व नूतन जीवन अनुभावितो. प्रेम, हृदयाच्या सर्व कामना केन्द्रिभूत करून मनुष्याच्या कर्तव्यबुद्धीला नूतन बलानें सबल करितो. प्रेमामुळेंच स्त्रिया किंवा पुरुष आपल्या प्रिय माणसांकरितां मरण्यास देखील तयार होतात! आलेस्टिज हें सर्व ग्रीस देशांत एक महान स्त्री-रत्न होऊन गेलें. ही स्त्री आपल्या नवऱ्याकरितां प्राण देण्यास तयार झाली.

**प्रेम.**

तिन्ही अवस्थामांजी साचें। झालें अद्वैत सुखदुःखाचें
एक रूप उभयतांचे। जें स्नेहाशीं अनुरूप॥ १॥
जें हृदया विश्रांतिस्थान। जेथे प्रेमरसाचें मान
कधा होइना न्युन। वयोभेद झाला तरी॥ २॥
मध्यें आलिया आवरण। कालें करून त्याचें निवारण
होतां पाहिल्या परिपूर्ण। स्नेह सत्वीं जे राहिलें॥ ३॥

—उत्तर रामचरित.

स्त्रीजातीला धन्य करणाऱ्या व त्यांच्या सद्गुणाला शोभा आणणाऱ्या ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांपासून मिळणाऱ्या खऱ्या सुखाचा अनुभव प्रीति या शब्दांतच आहे. स्त्रियांपासून मिळणाऱ्या सर्व सुखाचें आदिकारण प्रीति होय. प्रीति—देवतेची आज्ञा उल्लंघन करणें ह्मणजे दुःखावस्थेचें स्वागतच करणें होय. स्त्रियांमध्यें बसणारी जी प्रीति तिचें महत्व फारच अवर्णनीय आहे. त्याच्या योगानें स्त्री ही पुरुषाचें केवळ विश्रांतिस्थळच होऊन राहतें. स्त्रियांचे अंतःकरणभूमिकेंत वास्तव्य करणाऱ्या प्रीतिदेवतेचें तेज कधींही लपून राहत नाहीं. त्याचेंमध्यें वास्तव्य करणारें खरें प्रेम त्यांनीं आपल्या पतीला पाहिल्याबरोबर त्यांच्या नेत्रद्वारें व स्मितवदनानें सूचित होत असतें.

तथा नित्यं यतेयातां स्त्रीपुसौंतु कृतक्रियौ ।
यथा नाभिचेरतां तौ वियुक्तावितेरतरम् ॥

"परस्परांची फुटाफूट होऊन उभयतांस त्रास होणार नाहीं अशा विवाहित स्त्रीपुरुषांनीं सर्वदा यत्न करावा."

विवाहित स्त्रीपुरुषांची अत्यत प्रीति असल्यावांचून विलक्षण सामर्थ्याची संतति होणें नाहीं. सीतारामाचें उदाहरण प्रीतिभावाचें द्योतक आहे. त्यांचे पुत्र जे लवकुश त्यांचें सामर्थ्य पित्यापेक्षांही मोठें व त्यास विस्मयांत घालणारें होतें. सुभद्रेच्या व अर्जुनाच्या निष्कपट प्रेमाचें उदाहरण अभिमन्यू. ह्याच्या अल्पकाळांतील पराक्रम जग विश्रुत आहेच. भीमसेनाचा पुत्र घटोत्कच हेडंबीपासून झाला. [ द्रौपदीपासून झाला नाहीं ] या सर्वांचें कारण प्रेम हेंच होय

ज्या स्त्रिया छानछोकी करून पुरुषाचें चित्त आपल्याकडे आकर्षण करून घेण्याचा प्रयत्न करितात. त्यांच्याविषयीं एक ग्रंथकार ह्मणतो:—"ज्या तरुण स्त्रिया आपल्या छानछोकीनें पुरुषांचीं मनें आकर्षण करण्याचा प्रयत्न करितात, त्यांनी ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, हे गुण स्त्रियांच्या अंगीं पाहून जरी त्यांच्या मनांत मोह पडला तरी त्यामुळें त्या स्त्रियांवर त्यांचें प्रेम कधींही बसणार नाहीं. स्त्रीस शोभण्यासखा स्वभाव, तसेंच योग्य असें साधे, निष्कपट व अकृत्रिम अंतःकरण जिचें आहे, अशा स्त्रीवर मात्र पुरुषाची प्रीति नसते." सारांश आपलें हृदय दुसऱ्याला दिल्यावांचून दुसऱ्याचें हृदय आपल्या स्वाधीन होत नाहीं. याकरितां जो पुरुष आपण स्वतः आपल्या पत्नीवर प्रीति न करितां तिनें मात्र आपल्यावर करावी असें इच्छितो त्याची फजिती होते. त्याचप्रमाणें जी स्त्री पतीच्या हृदयाशीं, आपल्या हृदयाचें तादात्म्य करूं शकत नाहीं. जी सर्वतोपरी पतीच्या आधीन होत नाहीं, तीही शांतिसुखाची अधिकारीण होत नाहीं. ज्याप्रमाणें जाया आणि पति हे दोन शब्द एकत्र होऊन 'दंपति' हा शब्द झाला आहे. त्याचप्रमाणें पतिपत्नीचा भिन्नभाव, भिन्न रीति, भिन्न कार्यक्रम, दूर होऊन परस्परांमध्यें पूर्ण ऐक्यता स्थापन झाली ह्मणजेच दांपत्यमेलन अथवा परिपूर्ण विवाहाची सांगता होते. याविषयीं एक असें ह्मटलें आहे कीं, "प्रेमापरी बंधन नाहीं लोकीं। प्रेमेंच सारें प्रिय वाटतें कीं॥ प्रेमेंच दोषांस गुणत्व येतें। प्रेमें करावें वश गे पतीतें॥ १॥



## प्रकरण ६ वें.

# कुलवधूनें काय करूं नये.

"अति सर्वत्र वर्जयेत्."

कुलवधूनें पंक्ति प्रपंच करूं नये, चोरून खाऊं नये, नेहमीं गोड गोड पदार्थ खाण्याची संवय लावून घेऊं नये, एकदा कां जिभेस चांगल्या पदार्थांची चटक लागली ह्मणजे आद्यापेक्षा खर्च जास्त होतो. खर्च जास्त झाला ह्मणजे कर्ज करावें लागतें. प्रसंग विशेषीं चोरीही करावीशी वाटतें, इतकेंच नव्हे तर–या दुष्ट संवयींत सांपडलेल्या बऱ्याच स्त्रिया कुकर्मासही प्रवृत्त झालेल्या आढळतील. अती नखरा किंवा ऐट करूं नये, कारण एखादी अति नखरेबाज स्त्री अप्रबुद्ध पुरुषाचें दृष्टीस पडतांच त्याचें लक्ष तिकडे वेधतें व त्यायोगानें जरी ती

सुगुणी असली तरी ती त्यास प्रथम दर्शनीं दुर्गुणी भासते. मोठ्या गर्दीच्या उत्सवांत किंवा जत्रेंत ह्मणजे परपुरुष व परस्त्रिया यांस एके ठिकाणीं मिसळण्याचे प्रसंग येतात. असे प्रसंग होतां होईल तितके टाळावे. कारण अशा ठिकाणीं निरनिराळ्या तऱ्हेचीं स्त्री-पुरुषें जमतात व "व्यक्ति तितक्या प्रकृति" या नियमानुरोधें प्रत्येकाचे विचार निरनिराळ्या तऱ्हेचे असतात; अर्थात् ज्याप्रमाणें विचार उद्भवतील त्याप्रमाणेंच हातून करणी घडावयाची. ज्या बायकांस कधीं परपुरुषास पाहण्याचासुद्धां प्रसंग नसतो, त्यांस अशा वेळीं परपुरुषांच्या धक्काबुक्क्या सोसणें भाग पडतें. अलंकार चोरीस जाण्याची भीति असते. अशा समाजांत एखादे वेळीं, दुष्कृत्यें करणारे कांहीं नरपशूही आढळून येतात. हे नराधम यत्किंचित् कचर न खातां बिचारी निष्कलंक साध्वी असली तरी वाईट हेतु मनांत धरून तिचीसुद्धां कुचाळी काढण्यास प्रवृत्त होतात. आतां हें खरें कीं, हौस ही पुरुषांना तेवढी आहे व बायकांना नाहीं असें मुळींच नाहीं. तर ती सर्वांना सारखीच. तेव्हां स्त्रियांनीं उत्सव किंवा जत्रा पाहण्याकरितां गर्दीच्या वेळीं न जातां मध्यंतरींच आपल्या कुटुंबापैकीं लहानमोठें मनुष्य बरोबर घेऊन जावें. निदान मैत्रिण तरी बरोबर असावी. परंतु एकटें जाऊं नये. कुटुंबांतील कोणीही मनुष्याबरोबर भांडण तंटा करूं नये; पुरुषांकरितां ह्मणून जी स्वतंत्र बैठकीची जागा ठरवून ठेवलेली असते अशा जागीं तेथें परपुरुष असो वा नसो, होतां होईल तों जाऊं नये; हात, पाय, डोळा यांत चंचलता असूं नये; तुमच्यासमोर कोणी परकें उभें अगर बसलें असल्यास मोठ्यानें खांकरूं नये. तशीच जरूर लागल्यास

जरा बाजूस जावें, कोणासमोर आंग पिरगळूं नये, बोटें मोडूं नयेत, मोठ्यानें जांभई देऊं नये. वडिल माणसासमोर किंवा कोणाही परक्या मनुष्यासमोर पाय पसरून किंवा अन्य असभ्य रीतीनें बसूं नये; रस्त्यांतुन चालतांना दोहों बाजूस किंवा वरतीं पहात, हात फलकावित, धांवत अगर मोठ्यानें पाय वाजवित असें चालूं नये; रस्त्यांतून चालतां चालतां विनाकारण मध्येंच थांबूं नये. नवरा वश व्हावा, मुलें व्हावीं, इत्यादि कामना मनांत धरून मंत्रि–तंत्रि, बोवा–गोसावी यांच्या नादीं लागूं नये व त्यांवर विश्वास ठेऊं नये. औदुंबर, पिंपळ, वड वगैरे झाडांस प्रदक्षणा घालण्याकरितां गांवाबाहेर जाऊं नये; आपल्या घरांतील व्यंग दुसऱ्यास कळूं देऊं नये; नासधूस, सांडलवंड करूं नये. वेणीफणी करणें, लुगडें नेसणें, हें रहदारीच्या जाग्यावर व सहज लोकांस दिसेल अशा जागीं करूं नये. हसुं येण्याजोगें एकादें कारण घडल्यास मानवी स्वभावास अनुसरून हसुं येणें स्वाभाविक आहे. परंतु अशा वेळीं स्मित वदनानेंच परपुरुषाकडे पाहूं नये; लग्नादि कार्यांत विशेषतः बालिकांना व योषितांना नवऱ्या मुलाची थट्टा करण्याची हौस फार असते. प्रसंगविशेषीं त्यांचें बोलणें मर्यादेच्या बाहेर जातें. अशा प्रकारच्या वेळा म्हणजे लग्नांतील वधुवरांचें ‘विड्या तोडणें’ व स्नान करणें ह्या होत. त्या थट्टा करणारांनीं ती करितांना आपल्या सभ्यतेला विसरतां कामा नये. ज्या मुलीस यौवनपद प्राप्ति झालेली असते अशा त्या नूतन दांपत्याच्या प्रथम परिचयाला जी रात्र नेमस्त केलेली असते, त्या रात्रीं विनयशील तरुणी अनन्वित थट्टामस्करी करण्यास प्रवृत्त होतात. आपल्या या फाजील वर्तणुकीचा तेथें मौज

पाहण्याकरितां जमलेल्या लहान मुलांवर काय परिणाम होईल हा विचार थोडा तरी त्यांच्या डोक्यांत येतो काय? छे! मुळींच नाहीं. तेव्हां असा अविचार करूं नये; शृंगारिक पद्यें ह्मणूं नयेत. विनाकारण पर पुरुषाची चौकशी करूं नये; ओल्या वस्त्रानें पुरुषांच्या दृष्टीस पडूं नये; कपडे धुण्याची जागा ज्या ठिकाणीं पुरुषांचें येणें जाणें फार आहे अशा ठिकाणीं नसावी.

कांहीं सासुरवासिनींना कांहीं तरी कामानिमित्त रस्त्यासमोरील दरवाजापाशीं किंवा मोठ्या खिडकीशीं ह्मणजे—जेणेंकरून रस्त्यांतील गडबड सहजीं पाहण्यास मिळेल अशा ठिकाणीं बसण्याची संवई असते. परंतु अशा ठिकाणीं बसल्यानें कामाकडे मन लागत नाहीं. पाहाणें एकीकडे व काम भलतीकडे असें होतें. असें झालें ह्मणजे हातीं घेतलेलें काम जलद व व्यवस्थेशीर होत नाहीं. काम व्यवस्थित न झालें तर वडील मनुष्यांचा बोल सोसावा लागतो. ह्मणून कामकाजाच्या वेळीं अशा ठिकाणीं बसूं नये. नाटक हा विषय फार गहन व अति उत्तम आहे. पण तो कोणाला ? तर त्यापासून तत्व घेणाराला. समजा, आपण ‘ किर्लो-सकर ’ कंपनीचा ‘ शारदा ’ खेळ पाहवयास गेलों, तर त्यापासून बोध काय घ्यावयाचा ? कीं, भद्रेश्वर दिक्षितांसारखे स्वतःच्या पोटावर निखारे ओढण्याकरीतां अत्यंत नीच कर्म करणारे अधम जगतांत असतात, त्यांवर विश्वास ठेऊं नये, त्यांच्या मायाजालास फसूं नये. चंचल लक्ष्मीच्या क्षणिक झकाकीस भुलून ‘ श्रीमंतां ’ सारख्या वयोवृद्ध खाटिकास विकून तिला बळेंच बळी देऊन तिच्या जन्माचें मातेरें करूं नये वगैरे. तसेंच आपण ‘शाहुनगरवासी’ कंपनीचा ‘ झुंझार-

राव ' पहावयांस गेलों तर त्यांत काय घ्यावयाचें? झुंझाररावासारख्या निर्मल व भोळसर मनाच्या मनुष्यास जाधवरावासारख्या कावेबाज कपटपटूनें कसें अखेरीस धुळीस मिळविलें. कमळेसारखी दृढ निश्चयी व सुस्वरूप मुलगी रूपास, पैशास कीं गुणास भुलली; ह्या साऱ्या गोष्टी मनांत वागवून वेळ पडेल त्या वेळीं ह्या तत्वांचा उपयोग करून त्याप्रमाणें संसारांत वर्तनक्रम ठेवावा. सारांश, चांगलें वाईट निवडण्याचें ज्ञान, सारासार विचारशक्ति, शान्ति व मनाचें पूर्ण स्वास्थ्य ज्या स्त्रियांचे आंगीं असेल त्यांनीं ऐपतीप्रमाणें मधून मधून जावें. परंतु जाण्याचे अगोदर नाटकाची मनाशीं निवड करावी आणि तें जर सामाजिक किंवा नैतिक असेल तर जावें. परंतु नाटकाशिवाय चैनच पडत नाहीं असें व्यसन मात्र जडवून घेऊं नये. ज्यांचें मन स्वतःच्या स्वाधीन नाहीं अशा अज्ञ आणि आशिक्षित स्त्रियांनीं जाऊं नये. कारण अशा प्रतींतील कित्येक स्त्रियांनीं माहेरच्या व सासरच्या कुळास मुकून अविचारानें नाटकांत शिरून स्वतःच्या जन्माचें सर्वस्वीं मातेरें करून उभय कुलांस कालिमा लाविली आहे. तसेंच अलीकडे रस्त्यानें जातां येतां क्वचित् स्थळीं " हं मदंगा " " याचा वदन शशी " " कर टाकि सखेगे " इत्यादि घाणेरडीं पद्यें स्त्रियांच्या तोंडून ऐकूं येतात. याप्रमाणें सर्व लक्ष पद्यांत व नटांचे अभिनयांत गुंतल्यामुळें प्रसंगविशेषीं हीच इच्छा बलवत्तर होऊन नीतिमत्तेस धोका बसण्याचा संभव असतो. ह्मणून कुविचारास व घाणेरड्या विषयांस आपल्या मनांत जागा देऊं नये.

स्वयें नर्तन गायन । गीत नृत्य अबलोकन ॥
शृंगार कामशास्त्र श्रवण । हें कुलक्षण कुलवंते ॥ १ ॥
परघर अटण परघर वस्ती । जार जारिणीचीं संगती ॥
एकट शय्या एकट पंथीं । हें कुलक्षण कुलवंते ॥ २ ॥
क्षण क्षणा चंचलपणें । चीर निरिया सरसावणें ॥
कच्छ फेडणें घालणें । हें कुलक्षण कुलवंते ॥ ३ ॥
हृदय दाउनी घेई पदर । पुरुष देखुनी वाढवी हार ॥
परकियांसी एकांतीं विचार । हें कुलक्षण कुलवंते ॥ ४
बहू हांसणें बहू बोलणें । सदा हांसत गोष्टी करणें ॥
परत परतोनी निरखणें । हें कुलक्षण कुलवंते ॥ ५ ॥
सुंदर, प्रौढ, समर्थ वनिता । चिरकाल पतिगृहीं वसतां ॥
लोकनिंदेचा अवचिता । पाषाण पडे मस्तकीं ॥ ६ ॥
हो कां उत्तमाची कुमरी । बहुकाळ वर्ततां माहेरी ॥
उद्धत होय विहिताचारीं । तोही शब्द वडिलांतें ॥ ७ ॥
माता पितरीं स्नेह कळवळा । बहु काळ समीप ठेवितां बाळा ॥
काजळ लावी पितयाच्या भाळा । होय अपकीर्ति लौकिकीं ॥ ८ ॥
आणिका वर्णी, निंदी भर्ता । पति त्यागुनि धांवे तीर्था ॥
पुरुष अव्हेरूनी देवता । भजतां कुलक्षण कुलवंते ॥ ९ ॥

**मुक्तेश्वर.**

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको ॥
वर्म काढुनी शर्मायाला उणें कोणाला बोलूं नको ॥ १ ॥
मी मोठा शहाणा धनाढ्यही गर्वभार हा वाहूं नको ॥
एकाहुनी एक जगामधीं थोरपणाला मिरवूं नको ॥ २ ॥
अंगीं नम्रत्ता सदा असावी राग कुणावर धरूं नको ॥
नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणा घेऊं नको ॥ ३ ॥

हिमायतीच्या बळें गारिबगुरिबाला तूं गुरकावुं नको ॥
दो दिवसाची जाईल सत्ता अपेश माथा घेऊं नको ॥ ४ ॥
उगीच निंदा स्तुति कुणाची स्वहितासाठीं करूं नको ॥
बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको ॥ ५ ॥
कष्टाची बरी भाजिभाकरी तुप साखरेची चोरि नको ॥
आल्या अतिथी मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको ॥ ६ ॥

**—अनंत फंदी.**

॥ बालया वा युवाया वा वृद्धया वापि योषिता ॥
॥ न स्वातंत्र्येण कर्तव्यं किंचित् कार्यं गृहेष्वपि ॥

**मनुस्मृति** ५।१४७

भावार्थ—" स्त्रिया, बालिका ह्मणजे मुली असोत, किंवा तरुण असोत, वा वृद्ध असोत, त्यांनीं घरांतील कोणचीहीं कामें स्वतंत्रतेनें करूं नयेत. "

॥ बाल्ये पितुर्वशे तिष्ठत् पाणिग्राहस्य यौवने ॥
॥ पुत्राणां भर्तरि प्रेते न भजेत् स्त्री स्वतंत्रताम् ॥

**मनुस्मृति** ५।१४८

भावार्थः—" स्त्रियांनीं बालपणीं बापाचें स्वाधीन, तरुणपणीं पतीचे स्वाधीन आणि पति मृत पावल्यानंतर मुलाचे स्वाधीन राहिलें पाहिजे. परंतु त्यांनीं स्वतंत्रतेनें कधींही वागतां कामा नये."



# अबलोन्नति, भाग दुसरा.

## प्रकरण ७ वें.

## पतिव्रताधर्म.

"कोकिलानां स्वरोरूपं रूपं स्त्रीणां पतिव्रतम्"

स्त्रियांना पति शिवाय दुसरें दैवत नाहीं. "पति दैवत आद्य असे, तोचि असे स्त्रीस आत्म जन्म हित" पतिशिवाय दुसरी गति नाहीं, पातिव्रत्याहून दुसरें कोणतेंही उत्तम व्रत नाहीं. अखंड मोहपाशांतून महद्धैर्यानें पातिव्रत्याचें रक्षण करणाऱ्या स्त्रीला ज्ञाते ह्मणतात कीं पतिव्रतेस स्वर्ग करतलामलवत् आहे. पतिव्रतेस पतिदर्शनापुढें सर्व इतर सुखें तुच्छ वाटतात.

पतीचा किंचित् विरह सुद्धां त्यांस दुःसह होतो. पतीचें जें सौख्य तेंच पत्नीचें सौख्य आणि पतिसेवा हाच प्रपंचांतील ऐषआराम.

पतीचे आज्ञेशिवाय दुसऱ्याच्या घरीं जाणें ह्मणजे सर्पाच्या फणेवर पाय दिल्यासारखें जीस वाटतें, जिचें बोलणें, हांसणें, एखाद्या धनलोभ्याच्या द्रव्यासारखें दुसऱ्या कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं, आणि "न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा" तीच खरी साध्वी. पातिव्रत्यभंगानें दूषित झालेल्या स्त्रीनें जरी अनेक सत्कर्मे केलीं तरी तीं फुकट जातात. 'गीतेंत' भगवान् श्रीकृष्ण ह्मणतातः—'' अर्जुना? निपुत्रिक मनुष्याचें जिणें व्यर्थ आहे" हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला कीं, हे दिनानाथ! पुत्रहीन मनुष्याला कोणाच्या हातून तर्पण पोंहोंचेल! त्यावर श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना! निपुत्रिक मनुष्याची स्त्री सुशिल असून तिनें खऱ्या प्रीतिभावानें तर्पण किंवा श्राद्ध केलें तर तें तिच्या पतीला पोंहचतें आणि अशा पुनीत स्त्रीच्या सुकर्मेंकरून सात कुळें व तिचा पति वैकुंठवास भोगील. " ज्ञानेश्वर महाराजांनीं ह्मटलें आहेः—

पह्राया अनुराग भजे । जे प्रियोत्तमें मानिजे
ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता ॥

भावार्थ.—" प्रीतीनें पतीची सेवा करते, पतीही जिला मान देतो, अशा पतिव्रतेचें वर्णन करावयास नको काय?" पतिव्रतांना देवसुद्धां भिऊन असतात. 'आगस्त्य' ऋषीचें ऐश्वर्य ह्मटलें ह्मणजे, पळसाच्या लांकडाचा दंड, कमंडलु, झाडांचीं वल्कलें

आणि पर्णकुटि, एवढेंच काय तें! परंतु साध्वी ‘लोपामुद्रेनें त्यांच्या बरोबर विवाह होतांच आपल्या बापानें आंदण दिलेले राजपोषाख, अमोलिक मणिभूषणें वगैरे सर्व अलंकाराचा त्याग करून आपल्या पतीच्या स्थितीस अनुरूप अशा वल्कलांचे पोषाख आपल्या आंगावर घातले, आणि सर्व राजवैभवापासून पराङ्मुख होऊन त्याच्या पाठोपाठ सिंह-व्याघ्रादि भयंकर पशूंनीं गजबजलेल्या अरण्यांत राहण्यास गेली. स्वपातिव्रत्य प्रभावानें सती सावित्रीनें आपला मृतपति जिवंत केला. चंद्रामतीनें इतरांस न कळूं देतां स्वमांगल्याचें रक्षण केलें. प्रियपति नलराजाबरोबर वनवासांतील खडतर दुःख महाभागा दमयंतीनें सोसून स्वपातिव्रत्याचें भंग करण्यास तयार झालेल्या दुष्ट किराताला, क्षणार्धांत नाहींसा करून टाकला. जिला प्रसवून भरतभूनें ‘रत्नगर्भा’ असें नांव मिळविलें, ती सर्वांग-सुंदर अति कोमल जनककन्यका आपल्या प्रिय रामचंद्राबरोबर मोठ्या आनंदानें वनवासास गेली. तसेंच सीतादेवी लंकेमध्यें अशोक-वनांत असतां तिला वश करण्याकारितां रावणानें अनेक उपाय करून अखेर मंदोदरीचीही या कामीं योजना केली, त्यावरून मंदोदरीनें वेदांताच्या धर्तीवर राम आणि रावण अभेद मानून वश होण्याविषयीं उपदेश केला. त्या वेळीं सीतादेवी वेदांतास अनुसरूनच ह्मणाली कीं, “ राम रावणच फक्त अभेद दृष्टीनें पाहणें हें मतलबापुरतें पाहणें झालें. वेदांतांत समदृष्टीनें सर्वत्र पाहणें हेंच अभेद व खरें पहाणें होय. मंदोदरी! तूंच पहा बरें, सर्वांघटीं एक परब्रह्म रामच संचरला आहे असें दिसेल; आणि मग या निरनिराळ्या असंख्य व नाशिवंत घटाची मातबरी ती काय राहिली बरें? हा सर्व पसारा अशाश्वत अर्थात् मिथ्या

होय. मग त्यांत रावण कोठचा आणलास! मंदोदरी काय झाली आणि मीही कोठें राहिलें? याप्रमाणें त्या पातिव्रतेनें बाणेदार समर्पक उत्तर दिल्यावर बिचारी मंदोदरी निरुत्तर झाली. इतकेंच नव्हे, तर ती लज्जायमान होऊन परतली. अशा साध्वीच्या अभिलाषामुळेंच लंकाधिपति रसातळास गेला. रानांवनांतूत, हाल अपेष्टेनें, पतिबरोबर दिवस काढण्याचे प्रसंग द्रौपदीला आले तरी तिनें ते आनंदानें काढिले. अत्रिऋषीची स्त्री महान् पतिव्रता अनुसूया हिनें स्वपातिव्रत्यप्रभावानें ब्रह्मा, विष्णु, महेश यांस बालरूपें दिलीं. निमिषार्धांत अरुंधीतीनें वाळूचा भात बनविला. अरुंधतीचा जन्म जरी हलक्या कुळांत झाला, तरी पतिव्रतामहात्मेंकरून, "आर्या" अशी श्रेष्ठ पदवी व सप्तर्षींतील श्रेष्ठ जे वसिष्ठ त्यांचेजवळ तिला जागा मिळाली. "ईशानः सर्व भूतानामीश्वरः" अशी ज्याची त्रिभुवनांत ख्याति, त्या महेश्वराला ब्रह्महत्येपासून मुक्त करण्यास "लक्ष्मीच" कारणीभूत झाली.

आतां स्वतःचे चतुराईनें व धीरानें ज्या जगमान्य स्त्रियांनीं ऐन विकट प्रसंगीं सुद्धां आपल्या पातिव्रत्याचें एकनिष्ठतेनें रक्षण केलें, अशा अनुकरणीय व इतिहासप्रसिद्ध स्त्रीरत्नांचीं चरित्रें थोडक्यांत पाहूं:—

१ जसमा नांवाची ओड जातींत एक अत्यंत लावण्यवती स्त्री आहे, असें गुजराथचा राजा सिंहराज ह्यास समजतांच त्याचें मन तिच्या प्राप्तीविषयीं आतुर झालें. ह्याच सुमारास जयासिंगानें 'सहस्रलिंग' नांवाचा तलाव खोदण्याचें काम सुरू केलें होतें. संधि चांगली आहे असें पाहून त्यानें माळव्यांतून "ओड'

जातीच्या सर्व लोकांना, तलावाचें काम करण्याच्या निमित्तानें पाटण येथें बोलावून आणिलें. या मंडळींत जसमाही आपल्या प्रिय पतिबरोबर आली होती. जसमेला राजानें आपली राणी करण्याची इच्छा दर्शविली; परंतु तिनें ही गोष्ट साफ नाकारली. हें राजास न रुचल्यामुळें त्यानें तिला अडकवून ठेवण्याचा घाट घातला. परंतु जसमा फार धूर्त होती. तिनें राजाचा दुष्ट हेतु ओळखून मजुरीचे वगैरे पैसे न मागतां आपल्या घराची वाट धरली. राजास ही बातमी लागतांच तिचा पाठलाग करण्याकारितां त्यानें सैन्य पाठविलें. राजाच्या सैन्याची चाहूल लांबून लागतांच एक चिता रचून ती पेटवून ' जसमानें " आपल्या बिनमोल देहाची आहुती दिली.

२ जुनागडापासून चार कोसांवर मनवेडी नांवाचें गांव आहे. तेथील एका कुंभाराचे घरीं राणकदेवी नांवाची एक लावण्यवती कन्या होती. तिचा विवाह राजा जयसिंग ह्याजबरोबर व्हावयाचा ठरला असतां गीरनारचा राजा खेंगार ह्यानें तिला बलात्कारानें नेऊन तिच्याशीं लग्न लाविलें. खेंगार राजाच्या ह्या कृत्यामुळें जयसिंगास फार क्रोध येऊन त्यानें खेंगार राजावर स्वारी केली. त्या स्वारींत खेंगार राजा मारला गेला. तेव्हां अर्थात् राणकदेवी जयसिंगाच्या हातीं सांपडली. नंतर वढवान शहरीं आल्यावर जयसिंगानें राणकदेवीस विचारालें "तुझी काय इच्छा आहे?" ती मोठी पतिव्रता असल्यामुळें ती ह्मणाली," "तूं माझे इच्छेप्रमाणें कबूल करशील तर सांगतें." राजानें 'होय' ह्मटल्यावर ती म्हणाली, "माझा नवरा मेला" मुळें मेलीं; आतां माझी इच्छा इतकीच आहे कीं, नवऱ्याच्या अस्थि मजजवळ आहेत, त्यांसह सती जावें.

राजा ह्मणाला "ठीक आहे."

याप्रमाणें ती सती वढवान येथें भोगावा नदीवर जयसिंगासमक्ष नवऱ्याच्या अस्थीबरोबर सती गेली.

३ अकबर राजाचे कारकीर्दींत खुशरोज नांवाची जत्रा भरत असे. ह्या जत्रेची उत्पत्ति बादशहाच्या अधम विषयवासनेच्या तृप्तिकरतांच होती. त्या दिवशीं दिल्ली शहरांतील सरदार व श्रीमान् लोकांच्या स्त्रिया, इतकेंच नव्हे तर खुद्द बादशाही जनानखाना सुद्धां या उत्सवाच्या ठिकाणीं नानातऱ्हेच्या वस्तु विकण्याकरितां अगर विकत घेण्याकरितां मौजेनें जमत. याप्रमाणें अलीकडे मुंबापुरीसारख्या मोठमोठ्या शहरांत बाजार भरूं लागले आहेत. त्यास 'फॉनसीफेट' असें ह्मणतात. फरक इतकाच कीं, 'फॉनसीफेट' बाजारांत कोणालाही जाण्याला मनाई नसते, आणि खुषरोजच्या उत्सवांत फक्त बायकांनाच जाण्याला परवानगी असे. या बाजाराचे दिवशीं अकबर हा स्त्रीवेष घेऊन बायकांच्या समाजांत मिसळत असे. आणि त्यांतील सुंदर स्त्रियांवर डोळा ठेवून त्यास आपल्या हस्तकांकरवीं अडचणींत आणून विषयवासना फार हलकट रीतीनें तृप्त करून घेत असे. अशा या विलासबाजारांत एके प्रसंगीं पृथ्वीराज राठोडची सुस्वरूपसंपन्न स्त्री संयोगिता इतर सरदार स्त्रियांबरोबर आली होती. ही पवित्र शिसोदिया कुळांतील असून त्यांतील सुक्तावत नांवाच्या शाखेतील मूळ पुरुषाची कन्या होती. अकबर बादशहा बायकोचा वेश घेऊन त्या स्त्रीसमाजांत फिरत असतां ही पृथ्वीराजाची स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. तिच्या स्वरूपास मोहित होऊन या विषयांध बादशहानें

तिजवर झडप घालण्याचा प्रयत्न केला. आपल्या हस्तकांकरवीं फुसलावून तिला फार अडचणीच्या जागीं आणून सोडिलें. या ठिकाणीं अकबर हा तिचेपुढें एकदम उभा राहिला. तेव्हां या प्रसंगावधानी तरुण रजपूत स्त्रीनें कमरेची कट्यार त्याच्या छातीवर ठेऊन ह्मटलें कीं, "खबरदार, पुढें पाऊल घालशील तर छातीच फोडून काढीन." अडचणींत सांपडलेला बादशहा फार गर्भगळित झाला. त्याला कांहींच करितां येईना. कांहीं थोडी गडबड करावी तर बायकांचा समाज भोंवतालीं जमला असून, अशा स्त्रीवेशांत आपली फजिती होईल, किंवा ही ती तीक्ष्ण कट्यार आपल्या मनोराज्याचा–आशेचा व उमेदीचा एका क्षणांत नाश करून टाकील, हा विचार मनांत येऊन अकबर तिची क्षमा मागूं लागला. तेव्हां त्या तेजस्वी रजपूत स्त्रियेनें पुन्हां कोणत्याही स्त्रियेची अब्रू घेणार नाहीं, असें त्यापासून वचन घेऊन आपली कट्यावर त्याच्या छातीवरून दूर केली.

एके वेळीं सत्यभामा द्रौपदीस ह्मणतेः—

**आर्या.**

सत्या[१] कृष्णेसी ह्मणे "वदत्यें तें तूं खरेंच मान सये ॥
लोक ह्मणोत परि पळहि माझ्या हातीं न कांत–मानस ये ॥ १ ॥

---

१ सत्या ह्मणजे सत्यभामा, कृष्णेला ह्मणजे द्रौपदीला म्हणते:–

"मी जें तुला सांगत्यें तें तूं खरेंच मान. लोक म्हणत असल्यास म्हणोत, परंतु माझ्या हातांत एकपळभरही नवऱ्याचें मन येत नाहीं. अर्थात् माझ्यानें कृष्णास वश करवत नाहीं.

[२]त्वां हे पांच पति कसे वश केलें? भजति सर्व एकीनें ॥
थोडें याहुनि पाहुनि नटती कां(अ) दबिनींस के(आ)कीत ॥ २ ॥
[३]सांग वशीकरण कसें केलें? त्वां देवि ! कोणत्या मंत्रें? ॥
कीं दिव्यौषधिमुळें किंवा वात्स्यायनोदितें यंत्रें ? ३ ॥
[४]कृष्णा हांसोनि ह्मणे ‘भामे’ ! मोहावयासि पतिला जे ॥
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहु मदीय मति लाजे ॥ ४ ॥
प्रेमें[५] पतिचरणांसि न देउनि दे हात तायिताला जे ॥
ते स्त्री न रुचे पतिला कीं तीतें आततायिता लाजे ॥ ६ ॥

---

२ आणि तुझें पाहत्यें तो हे धर्मभीमादि, पांच पति तुला एकटीला भजतात म्हणजे तुला अत्यंत वश आहेत. त्वां हे असे कसे वश केले? आतां ते कसे वश होऊन गेले आहेत हे कवि पुढल्या सरस दृष्टांतानें सांगतात—के(आ)की म्हणजे मोर का(अ)दंबिनीस म्हणजे मेघांच्या पंक्तीस पाहून नटती—नाचतात, तेंही याहून थोडे. म्हणजे मेघांच्या पंक्तीस पाहून मोर नाचतात, इतका मोरांचा तिजवर प्रेम आहे, तेंही या धर्मादिकांचें तुझ्या ठायीं जें प्रेम आहे त्याहून थोडें.

३ सत्यभामा म्हणतेः—“हे देवी द्रौपदीबाई! त्वां कोणत्या मंत्रें कसें वशीकरण केलें तें सांग. दिव्यौषधीचें मूल, मंत्र, किंवा वा(इ)त्स्यायन ऋषीनें सांगितलेल्या यंत्राच्या योगानें वश केले तें सांग.

४ या प्रश्नाचें उत्तर द्रौपदी हांसून देते “हे सत्यभामे! जे पतिला मोह पाडण्यास त्वां मंत्रादि उपाय करणें सांगितलें तें ऐकून माझें मन फार लाजतें.”

५ आणखी द्रौपदी म्हणतेः—( अन्वय ) जे स्त्रीप्रेमें पतिंचरणाशीं हात न देउनि तायिताला दे, ते स्त्री पतिला न रुचे, कीं तीतें आततायिता लाजे

जाणें वशीकरण हें करित्यें जेणें कधीं न कोपाति ते ॥
सखि ! तूंहि असोंचि करीं मद मत्सर दाखवूं नको पतितें ॥ ६ ॥

पतिपरमेश्वरचरणा जी तत्सेवार्थ न नवशी करणें ॥
ती मुग्धा कैशी गे वळ्वील स्वामिमन वशी करणें ॥ ७ ॥

पतिचे प्रसाद देती ज्या सद्गतितें नयोग सव तीतें ॥
वाहे पहा शिरीं शिवदेहार्थमता शिवा स्वसवतीते ॥ ८ ॥

नीतिखेरीज प्रपंचांत सुख नाहीं, हा तर सिद्धांत आहेच. परंतु अलीकडे पहावें तर नीतियुक्त प्रपंच चालत आहे अशीं फारच थोडीं घरें दृष्टीस पडतात. स्त्रीस काय व पुरुषास काय, जर खरें परस्पर आपलें काय नातें आहे, कशा अधिकाराचें आहे, कसें वागलें पाहिजे, पापपुण्य ह्मणजे काय, परस्परांच्या गांठीं पडल्या आहेत, त्या किती महत्वाच्या आहेत, परस्परांत द्विज, अग्नि, सूर्य इत्यादि देवतांच्या साक्षीनें काय करार झाले आहेत, इत्यादि गोष्टी जर खरोखर रीतीनें समजून नीतींचें ज्ञान होईल, तर

---

म्हणजे:- स्त्रीनें आपला हात प्रीतीनें पतीच्या पायास लावावा. तो न लावतां जी स्त्री ताइताला लाविते, अशी स्त्री नवऱ्यास आवडत नाहीं. किंबहुना अशा स्त्रीस अतितायिता म्हणजे त्रागा करणारी सुद्धां लाजते.

६ पतीची प्रसन्नता पतिव्रतेला सद्गति देते. तशी 'न योग' म्हणजे योगदी देत नाहीं. आणि 'सव' म्हणजे यज्ञही देणार नाहींत. यास पुढील सरस दृष्टांत पहा–'शिवदेहार्थमता' म्हणजे पार्वती 'स्वसवतीनें' म्हणजे आपल्या सवतीला अर्थात गंगेला आपल्या शिरीं वाहे.

पुरुषाकडून किंवा स्त्रीकडून सहसा वांकडें पाऊल पडणार नाहीं. " सप्तपदी " चे वेळीं वधुवरांचा जो संवाद होतो त्यांतील स्त्रियांना समजण्याकरितां त्यांचेच करार पुढें देतोंः—

सुखदुःखानिसर्वाणि भोक्ष्येहंचत्व यासह
यत्रत्वंतत्रचैवाहंकन्याचैकपदे ब्रवीत् ॥ –**मुक्तावली.**

भावार्थः–मी तुझ्याबरोबर सुखदुःख भोगीन, जेथें तूं तेथें मी राहीन. एक गिरि उल्लंघन करावा.

कुटुंबं पालयिष्यामि त्वद्बुध्या जीविताावधि ॥
अस्ति नास्ति च संतुष्टा द्वितीये सा पदे ब्रवीत् ॥ **मुक्तावली,**

भावार्थः–मी जिवंत आहे तोंपर्यंत तूं सांगशील त्याप्रमाणें कुटुंबाचें पालन करीन. घरामध्यें कांहीं असो वा नसो संतुष्ट राहीन. दुसरा गिरी उल्लंघन करावा.

तव भक्ति परा नित्यं सदैव प्रियवादिनी ।
भविष्यामि पदे चैव तृतीये सा ब्रवीदिदं ॥ **मुक्तावली.**

भावार्थः–मी नित्य तुझ्या भक्तीमध्यें तत्पर राहीन. सर्वकाळ तुझ्याशीं मधुर भाषण करीत जाईन. तिसरा गिरि उल्लंघन करावा.

त्वसुखे सुखसंयुक्ता त्वदुःखे दुखितां गता ।
त्वद्विपत्ति गमिष्यामि कन्यातुर्य पदे ब्रवीत ॥ **मुक्तावली.**

भावार्थः–तुला जर सुख प्राप्त होईल तर मी सुख भोगीन. तुला जर दुःख प्राप्त होईल तर मी दुःख भोगीन. तुला जर विपत्ति प्राप्त होईल तर त्या विपत्तीला मी पुढें होईन. चौथा गिरि उल्लंघन करावा.

ऋतुकाले शुचिः स्नाता क्रीडयामि त्वया सह ।
नाहं परनरं गच्छे पंचमे सापदे ब्रवीत् ॥ **मुक्तावली.**

भावार्थः—ऋतुकालीं शुचि, स्नात होऊन तुझ्याशींच रममाण होईन. परपुरुषाप्रत गमन करणार नाहीं. पांचवा गिरि उल्लंघन करावा.

इहार्थे साक्षिणो विष्णुरग्निरीशो द्विजस्तथा ।
उभयोः प्रीतिसंभूता कन्या षष्ठे पदे ब्रवीत् ॥ **मुक्तावली.**

भावार्थः—दोघांचा जो संबंध झाला त्याविषयीं विष्णु, अग्नि, शंकर आणि ब्राह्मण हे साक्षी आहेत असें प्रीतियुक्त कन्या बोलली. सहावा गिरि उल्लंघन करावा.

होमयज्ञादि कार्येषु भविष्यामि सहायिनी ।
धर्मार्थकाममोक्षाणां सप्तमे सापदे ब्रवीत् ॥ **मुक्तावली.**

भावार्थः—यज्ञकर्मविषयीं आणि धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष इत्यादि विषयीं मी साहाय्य करीन. सातवा गिरि उल्लंघन करावा.

## सौभाग्यवती स्त्रियांचें वर्तन.

पतिः साक्षाच्छङ्करो हि मन्तव्यःसततं स्त्रिया ॥
इह लोके सुखं भुक्त्वा सैववैकुण्ठ प्राप्नुयात् ॥ १ ॥
कृतनिद्रे सुखं पत्यौ पूर्वमुत्थाय सत्वरम् ॥
गेहसंमार्ग प्रभृति कृत्यं कुर्याच्च मंगलम् ॥ २ ॥
पूजापात्राणि देवस्य प्रक्षाल्य तदनन्तरम् ॥
गन्धाक्षतापुष्पवर्ति रंगमालादि निर्मयेत् ॥ ३ ॥

अनुष्ठानाय सदनमागच्छति सति प्रिये ।।
सज्जतां सत्वरं कुर्याद्भर्तृचित्तानुसारिणी ।। ४ ।।

भर्तुभोजनतःपश्चाद्भुक्तिर्मुख्या स्त्रियाःस्मृता ।।
या प्रियं प्रीणयेत्प्रीता त्रिलोकी प्रीणिता तया ।। ५ ।।

आगच्छन्तं बहिर्देशात्पतिं दृष्ट्वा च तत्क्षणम् ।।
संत्यज्य सर्व कार्याणि संमुखं प्राप्नुयात्सति ।। ६ ।।

पत्युर्मनःप्रियं वस्त्रं भूषणं विभृयात्प्रिया ।।
वेषादिकं न वै कुर्यादुःखिते सति भर्तरि ।। ७ ।।

पत्युर्विभूत्यादिकस्य लाभे संतुष्ट मानसा ।।
समर्थमितरं दृष्ट्वा नव्याकांक्षेच्छेपन्नतम् ।। ८ ।।

धवे गृहे विद्यमाने आकल्पो ह्याति हर्षतः ।।
ग्रामान्तरे प्रसवति नात्मानं शोभयेद्वधूः ।। ९ ।।

सर्व स्त्रीणामयं धर्मो भावेन पति सेवनम् ।।
पत्युः सेवां न कुर्वाणा रौरवे नरके पतेत् ।। १० ।।

पतितः सर्पशिरासि पादो भीतिं यथा दिशेत् ।।
तथा यस्या बहिर्यानं सैव कुलवधूः स्मृता ।। ११ ।।

पतिसेवामृते यस्या धर्माचरणमप्रियम् ।।
तीर्थरनःनोपवासादींरतन्नियोगात्करोति या ।। १२ ।।

भर्तुर्वियोगे दुःखं स्यादागमे हर्षनिर्भर ।।
प्रेम्णा पत्युर्वचः कुर्यात्सास्त्री कुलवधूः स्मृता ।। १३ ।।

रजोवती त्रिरात्रं तु स्वमुखं नैव दर्शयेत् ।।
स्ववाक्यं श्रावयेन्नापि यावत्स्नाता न शुद्ध्यति ।। १४ ।।

सुस्नाता भर्तृवदनमीक्षेन्नान्यस्य कस्यचित् ॥
अथवा मनासि ध्यात्वा पतिं भानुं विलोकयेत् ॥ १५ ॥

हरिद्रा कुंकुमं चैव सिंदुरं कज्जलं तथा ॥
कूर्पासकं च तांबूलं मांगल्याभरणं शुभम् ॥ १६ ॥

केशसंस्कार कबरी करकर्णविभूषणम् ॥
भर्तुरायुष्यमिच्छन्ती दूरयेन्नक्कचित्सती ॥ १७ ॥

साध्वीसंगेन लभ्यन्ते पुरुषार्थाश्चतुर्विधाः ॥
पतिव्रतः स्त्रियः पुण्यैः प्राप्यंते भाग्य भाजनैः ॥ १८ ॥

भागीरथी समा ज्ञेया पावत्यः पतिदेवताः ॥
तद्भर्तारः शिवसमा अतः पूज्या द्वये नरैः ॥ १९ ॥

भूमिदेवी वदंत्येवं पूतपादा पतिव्रता ॥
ममोपरि चलेत्किंचित्पूताहं सकला तदा ॥ २० ॥

चंद्रसूर्यौ विति सदावाच्छ तो नौकराबालिः ॥
पतिव्रतां यदा गच्छेत तदा पूतौ भवेव हि ॥ २१ ॥

अर्थ.—आपला पति साक्षात् शंकर समजावा. तरच स्त्रियांना इहलोकीं सर्व सौख्याची प्राप्ति होऊन अंतीं शिव आणि विष्णुलोकाची प्राप्ति होते. पति निजून उठण्यापूर्वी स्त्रियांनीं उठून सडासंमार्जनादि गृहकृत्य ह्मणजे घरांतील कामें करावीं. तसेंच पूजापात्रादि देवांची उपकर्णीं घांसणें आणि गंधाक्षत पुष्पादि पूजेच्या साहित्याची तयारी करणें आणि देवापुढें रांगोळ्या वगैरे काढणें हें काम करावें. स्नान, संध्या, पूजादि अनुष्ठान समयीं पतीच्या सेवेंत हजर राहून त्याच्या इच्छेनुरूप त्यास मदत करावी. पतीचें भोजन झाल्यावर आपण

जेवावें. जी स्त्री पतीस सदाचरणानें नित्य संतुष्ट करील तिनें सर्वत्र त्रैलोक्य संतुष्ट केलें असें होतें. पति बाहेरून येतांच हातांतील सर्व काम बाजूस ठेवून पतीच्या सन्मुख आदरयुक्त आणि मोठ्या आनंदानें जावें. पतीच्या इच्छेनुरूप त्यास आवडेल अशींच वस्त्रें आणि अलंकार घालावे. पति दुःखित असल्यास अलंकारादि घालूं नयेत. पतीला जें अनुकूल असेल त्यांतच संतुष्ट असावें. इतर समर्थ पाहून तशी इच्छा आणि पतिनिंदा करूं नये. घरीं पति असल्यास अलंकारादि घालावे आणि आनंदांत असावें. पति बाहेर गांवीं गेल्यास परत येईपर्यंत अलंकारादि आत्मशोभा करूं नये. सर्व स्त्रियांचें मुख्य धर्माचरण ह्मणजे भक्तिपूर्वक पतीची सेवा करणें हें आहे. आणि जर याप्रमाणें त्या न करतील तर अंतीं रौरव नरकांत पडतील. सर्पाचे फणीवर पाय पडतांना जसें अंतकरणास भय प्राप्त होतें, तसें पतिव्रता स्त्रियांना विनाकारण बाहेर जाण्यास भय वाटतें. जिला पतिसेवेवांचून अन्यधर्मच आवडत नाहीं आणि पती आज्ञेनें तीर्थव्रतदानादिक करते, तसेंच पतिवियोगांत दुःखी व त्याच्या समागमांत सुखी आणि प्रेमेंकरून त्याची आज्ञा सतत मानते अशी स्त्री उत्तम पतिव्रता होय. पतिव्रता स्त्रियांनीं रजस्वला झाल्यावर त्रिरात्रपर्यंत पतीच्या दृष्टीस पडूं नये व आपलें भाषणही त्यास ऐकवूं नये. चौथ्या दिवशीं स्नान करून शुद्ध झाल्यावर पतीचें मुख पहावें, दुसऱ्या कोणाचेंही पाहूं नये. यदाकदाचित् तो जवळ नसल्यास मनांत पतीचें रूप चिंतून सूर्याचें दर्शन करावें. मंगलकारक आभरणें अवश्य घालीत जावें. पतिव्रता स्त्रीच्या संगतीनेंच पुरुषास चतुर्विध पुरुषार्थ ह्मणजे--धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची प्राप्ती होते.

आणि अशी स्त्री पुण्य व भाग्यानेंच प्राप्त होते. जितक्या पतिव्रता स्त्रिया त्या प्रत्यक्ष भागीरथी समान होत, आणि त्यांचे पुरुष शंकरा प्रमाणें समजून दोघांचीही पूजा करावी. भूमिदेवी ह्मणत्ये कीं पतिव्रतेच्या पवित्र आचरणानें मी पूनीत होईन. तसेच चंद्र सूर्य हे ह्मणतात कीं आपलें किरण पतिव्रतेवर पडले असतां आपण पावन होऊं. असें हें वर्तन स्त्रियांना अत्यंत श्रेष्ठ आणि धन्य करणारे होय.

## स्त्रियांचीं पातिव्रत्य लक्षणें.

वश्यभावेनसुमना: सुव्रतासुसमाहिता ॥
अनन्यचित्तासुमुखी भर्तृः साधर्मचारिणी ॥ ६ ॥

भावार्थः—जी स्त्री पतीच्या आज्ञेंत वागते. पातिव्रत्य पाळिते, शांतवृत्तीनें राहते, पतीविषयीं ऐक्यचित्त ठेविते, आणि नेहमीं प्रसन्नमुख असते, तीच आपल्या पतीची धर्मपत्नी होय.

नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषणम् ॥
पतिं शुश्रूषते येन तेन स्वर्गेमहीयते ॥ २ ॥

स्त्रियांस निराळा यज्ञ करण्याची जरूर नाहीं, व्रतांची अवश्यकता नाहीं, अथवा उपोषणही करावयास नको, केवळ उक्त प्रकारच्या पतिसेवेनेंच त्यांस स्वर्गप्राप्ति होते.

सा भार्या या गृहे दक्षा सा भार्या या प्रजावती ॥
सा भार्या या पतिप्राणा साभार्या या पतिव्रता ॥ ३ ॥

"जी गृहकृत्यांत दक्ष, जिला संतती आहे, जिचा पति हा केवळ प्राण आहे व जी पातिव्रता आहे तीच भार्या या पदास योग्य होय."

पाति प्रियहिते युक्ता स्वाचारा संयतेन्द्रिया ॥
इह कीर्तिमवाप्नोति प्रेत्य चानुपमं सुखम् ॥ ४ ॥

" पतीच्या हितार्थ झटणारी, सदाचारी, इंद्रियनिग्रही अशी स्त्री लोकीं सत्कीर्ति पावते, आणि परलोकीं तिला अनुपमेय सुखाचा लाभ होतो. "

नेक्षेत् पतिं क्रूरदृष्ट्या श्रावयेन्नैव दुर्वचः ॥
नाप्रियं मनसा वापि चरेत्पत्युः पतिव्रता ॥ ५ ॥

" पतिव्रतेनें पतीकडे क्रूर दृष्टीनें पाहूं नये, किंवा त्याजपाशीं दुष्ट भाषण करूं नये. त्याला ज्या आचरणापासून वाईट वाटेल तें मनांत सुद्धां आणूं नये. "

पतिं या नाभिचरति मनो वाग्देहसंयता ॥
साभर्तृलोकमाप्नोति सद्भिःसाध्वीतिचोच्यते ॥ ६ ॥

" जी स्त्री मन, वाणी, आणि शरीर यांहीकरून आपल्या पतीचे ठायीं एकनिष्ट प्रीति ठेविते तीस पतिलोक प्राप्त होतो व अशा स्त्रीस साधुलोक साध्वी ह्मणतात. "

अनेन नारिवृत्तेन मनोवाग्देहसंयता ॥
इहग्र्यां कीर्तिमाप्नोति पतिलोकं परत्रच ॥ ७ ॥

जी स्त्री काया, वाचा, मनेंकरून पतीवर अनन्यभाव ठेविते, तिची इहलोकीं मोठी कीर्ति होऊन ती अंतीं पतिलोकाप्रत जाते.

पतिसेवा तीन प्रकारच्या आहेत. १ कायिक; २ वाचिक; आणि ३ मानसिक.

१ कायिकः—सदासर्वदा पतीचे आज्ञेंत वागणें. प्राण गेला

तरी पातिव्रत्याचें उल्लंघन न करणें. आस्ट्रिया देशांत सर्व स्त्रिया आपल्या पतीची आज्ञा घेतल्यावांचून घरांतून कोठें बाहेर पाऊल टाकीत नाहींत. व त्या देशांत इतर सर्व स्त्रीव्रतांत हें व्रत मुख्य गणिलें जातें.

२ वाचिकः—स्त्रियेनें सर्वदा पतीचें हिताविषयीं विचार करणें; सत्य, नम्र, आणि मधुर भाषण करणें. उपदेशपर पुस्तकें वाचून व कधीं कधीं नीतिपर मंजूळ गाऊन पतीचें मनोरंजन करणें.

३ मानसिकः—पतीचे ठायीं दृढ प्रेम ठेवणें, आणि त्याच्या सुखसंतोषाविषयीं सदासर्वदा दक्ष असणें. धर्मराजानें द्रौपदीची अशी महती गाइली आहे कीं:—

[1]शरदुत्पल पत्राक्षी, [2]शरदुत्पल पुण्य गंध समगंधा ॥
अस्खलित चालवी गृहधर्मी मज यष्टि पथिं जशी अंधा ॥ १ ॥
आधीं जिणें उठावें, पाहुनि निजलों असें, मग निजावें ॥
[3]रागेजणे सुदुर्मिळ तेंहि जिचें ज्वाळसें गगनिं जावें ॥ २ ॥
धौ[4]म्यापासुनि गो[5]पोपर्यंत जिणें स्वयें समाचार ।
घ्यावा श्रि[6]ततापहर, श्री गंगेचा तिचा स[7]माचार ॥ ३ ॥


---

१ शरत + उत्पल शरदृतूंतील कमलपत्रासारखे नेत्र आहेत जिचे अशी.

२ शरदृतूंतील जें कमल त्याच्या सुगंधाशीं तुल जिचा पुष्पगंध अशी.

३ ती आधीं कधीं रागावावयाची नाहीं. रागावलीच तर तिचा राग अग्निज्वाळे प्रमाणें आकाशांत [ वरच्यावर तत्काळ निघून जातो. म्हणजे त्यापासून कोणास पीडा होत नाहीं. ] हें तात्पर्य.

४ पांडवाच्या उपाध्यायापासून. ५ गवळ्यापर्यंत. ६ अश्रितांचा ताप हरणारा. ७ सारखें आचरण.



## प्रकरण. ८ वें.

# स्त्रियाचें अलंकार.

जनयंत्यर्जने दुःखं तापयंति विपत्तिषु,
मोहयंति समृद्धौच कथमर्थाः सुखावहाः ॥ सुभाषित.

तरुण वयांत स्त्रियांचा दागिन्याकडे ओढा फार असतो. त्यांतून अशिक्षित स्त्रियांस तर दागिन्यांतच आपलें सर्व वैभव आहे असें वाटत असतें. जिच्या अंगावर दागिनें जास्त जास्त, जिचे कपडेलत्ते भपकेदार ती खरी सुखी. अशी भ्रामक समजूत किती तरी स्त्रियांची असते. दागिना ह्मणजे शरीराला भूषित करणारा धातूचा पदार्थ आहे. दागिना ह्मणजे एक प्रकारचें द्रव्यच. आणि हें द्रव्य भांडणाचा मूळ पाया आहे. यापासून बरींच इतिहासप्रसिद्ध घराणीं धुळीस मिळालीं आहेत. "जाऊबाईनां शेराची सरी केली, मला आठ तो-

ळ्यांची सुद्धां नाहीं" या प्रकारें अनेक तऱ्हेचे कलह स्त्रियांत माजतात. याविषयीं एका साधूची उक्ति अशी आहे कीं, "पैसा आहे तंट्याचें मूळ। ऐसें वदति साधुसंत सकळ" ही उक्ति सर्वांनीं अवश्य लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शिकंदर बादशहा आणि महंमद हे फार धनवान होते. तरी ते अखेरीस रडले. आणि साक्रेतीस व साधु तुकाराम बोवा हे लोकांचे नानाप्रकारचे छळ सोसून, दारिद्र्यांत जन्म घालवून आनंदानें मरण पावले. हल्लीं जगामध्यें शिकंदर बादशहा आणि महंमुद ह्यांस जाणणाऱ्यापेक्षां साक्रेतीस व तुकाराम ह्यांस जाणणारे पुष्कळ निघतील. तेव्हां श्रेष्ठ कोण बरें? आणि सुखाचें खरें साधन कोणास प्राप्त झालें होतें?

**अभंग.**

रावणा सारिखी कोणाची संपत्ति। तोहि गेला अंतीं एकलाची ॥ १ ॥
एकसरें गेले एकामागें एक। हरिश्चंद्रादिक पुण्यश्लोका ॥ २ ॥
पुण्यश्लोक गेले कीर्ती ठेवूनीयां। पापी गेले वायां अधोगती ॥ ३ ॥

**तुकाराम.**

जेथें बळ गुण तो गुरु शूर बळा मानिती न कुलशीला।
गुणहीन शाल्मली वृथा लघु न ह्मणति भजति साधु तुळशीला ॥ १ ॥

**मोरोपंत.**

यावरून जगांत पैशापेक्षां गुणालाच मान जास्त आहे हें उघडच होत आहे. असो! अलंकारादि भूषणें शरिराला शोभादायक आहेत खरी. पण तीं बेताबातानें ज्याच्या त्याच्या सामर्थ्यानुरूप असलीं तर बरीं. नाहीं तर बायकांच्या हौशीसाठीं दुसऱ्याचें कर्ज काढून दागिने करणें त्यासारखें दुसरें मूर्खत्व नाहीं. बरें, या रीती

केलेले दागिने जन्मभर राहतात असेंही नाहीं. तर थोड्या दिवसांतच त्यांस परत सावकाराच्या पेढीची वाट धरावी लागते. प्रिय भगिनींनों एका आधुनिक कवीनें तुमचे अलंकार तुह्मांस दिले आहेत ते जसेच्या तसेच तुह्मां पुढें ठेवितों:-

### स्त्रियांचे अलंकार. [ श्लोक ]

ज्ञान आपुलें आरसा बरा । आपणापुढें नित्य तो धरा ॥
दोष दिसती त्यांमधीं जरी । पुसुनियां करा कांति गोजिरी ॥ १ ॥

देव-भक्तिची मूद मस्तकीं । पावती भयें सर्व अस्त कीं ।
तिलक तृप्तिचा भाळिं लावुनि । वदन तेज तें शोभवा जनीं ॥ २॥

सत्य वाणिचा मुखिं विडा धरा । गंध रंग तो दे मुखा बरा ।
लोचनीं दया-कज्जलासि ल्या । त्या गुणें जगीं दृष्टि शोभल्या ॥ ३ ॥

वडिल सांगती तेंच ऐकणें । शोभती स्त्रियां कर्ण-भूषणें ।
सद्विचार ह्या नथिस घालितां । प्रौढता मुखा येइ तत्वता ॥ ४ ॥

कार्यदक्षता, उद्यमीं मती । कंकणें पहा फार शोभतीं ।
धैर्य मेखला कटिस घालुनी । सज्ज व्हा सदा धर्म साधनीं ॥ ५ ॥

ईश-भीतिचा कंठिं ताइत । घालितां पळे भूत अनृत ।
प्रेम पदक तें हृदयिं लेउनी । पात्र प्रीतितें व्हा सदा जनीं ॥ ६ ॥

नम्रता पदीं पैंजणें बरीं । चाल त्यामुळें शोभते खरी ।
शाल सभ्यता नित्य पांघरा । येई तीमुळें मान्यता घरा ॥ ७ ॥

प्रिय भगिनींनों ! तुह्मीं वरील अलंकार जर स्वीकाराल तर धातूच्या अलंकाराची तुह्मांला इच्छाच होणार नाहीं. तसेंच अर्भकांवर व स्त्रियांवर ह्या दागिन्यापायीं अनेक अनर्थ गुदरले आहेत. ह्मणून दागिने वापरतांना फार सावधगिरी ठेवावी. संसारांतील

उच्चनीच स्थितीचा विचार न करितां जो ईश्वरानें दिलेल्या स्थितींतच मनाशीं रमून राहतो तोच खरा सुखी. सारांश, कर्ज न काढतां, सुखासमाधानानें संसारांत राहून जर दोन दागिने मिळाले तर घालावे, परंतु त्यांची नेहमीं काळजी वाहणें किंवा, हांव बाळगणें हें मात्र चांगलें नाहीं.

## दागिने वापरतांना लक्षांत ठेवावयाच्या कांहीं गोष्टी.

१ कांहीं स्त्रियांना अशी एक दुष्ट खोड असते कीं, त्यांचे दागिने निजावयाच्या गादीखालींच पडलेले असावयाचे. परंतु ह्यामुळें अनायासेंच चाकर माणसांस चोरी करण्यास उत्तम संधि सांपडते. कदाचित् खरोखरीच एखादा दागिना हरवला असला तरी ह्या दुष्ट संवयीमुळें तो वृथा आरोप बिचाऱ्या चाकरमाणसांवरच येतो. वेळेपुरतेच दागिने घालून गरज संपतांच नीट व्यवस्थेशीर कुलुपाच्या पेटींत ठेवावे.

२ नाकांत किंवा कानांत घालावयाचे दागिने फार वजनदार असूं नयेत; कारण त्यापासून प्रसंगी नाक कान भारानें तुटल्याचीं उदाहरणें सांपडतात.

## दागिने साफ करावयाच्या कृति.

मोत्यें उजळणें:--गव्हाचा कोंडा, किंचित् तुरटी घालून तो पाण्यांत उकळवावा. त्या पाण्यानें मळकट मोत्यें चोळून धुवावीं. मग स्वच्छ पाण्यानें धुऊन पुसून घ्यावीं व अंधारांत वाळवावीं.

चांदीच्या भांड्यांना पडलेले डागः--नवसागर पाण्यांत टाकून तें पाणी उकळवावें व नंतर तीं भांडीं त्यांत धुवावी.

सोन्याचा दागिना उजळणें:—गोमूत्रांत थोडासा नवसागर टाकून त्यांत जो दागिना स्वच्छ करणें असेल तो टाकून कढवावा व नंतर पुसून घ्यावा. सारांश, मर्यादेनें, नीतीनें, व सभ्यतेनें जगांत वागावें.

हस्तस्य भूषणं दानं । सत्यं कंठस्य भूषणं ॥
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं । भूषणैः किं प्रयोजनं ॥



## प्रकरण ९ वें.

# गृहकृत्यासंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती.

चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर ॥
दोहों मध्यें कोण सार । बरें पहा ॥ बोधामृतसार.

आह्मांला आमच्या पूर्वजांचा आणि प्राचीन शूर नरवरांनीं केलेल्या कृत्यांचा अभिमान वाळगिला पाहिजे, कारण कुटुंब लौकिक हा सर्व आभावाचा भोंपळा आहे. तेव्हां आह्मास—आमच्या देशास—उच्चपदाप्रत पोंचविणें हाच व्यक्तिमात्राच्या आंगचा खरा सग्दुण होय. ”

—डॉनियल डीफो.

आमचें राष्ट्र दिवसेंदिवस रसातळास कां जात चाललें? तर आह्मां भरतखंडवासी लोकांस आमच्या पूर्वजांचा अभिमान मुळींच नाहीं. यामुळें आमच्या कलाकौशल्यांत, व्यापारधंद्यांत, हरएक गोष्टींत आमचें पाऊल मागें मागेंच पडत चाललें. यामुळें दिवसेंदिवस आमच्या देशास अधिकच दारिद्र्यावस्था येत चालली आहे.

ह्मणून आपलें व आपल्या देशबांधवांचें कल्याण करण्यास प्रत्येक आर्यानें झटलें पाहिजे, हें उघड आहे. प्रिय भगिनींनों! तुह्मीं जर मनावर घ्याल तर तुह्मांसही सहज आपल्या देशाचें कल्याण करितां येईल. पहा कीं,–अलीकडे बरेच लोकांस परदेशांत तयार होणारीं वस्त्रें फार आवडूं लागलीं आहेत. यामुळें स्वदेशी कारखाने बुडत जाऊन देश कंगाल स्थितींत आला. करितां तुह्मीं सर्वांनीं जर स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय केला तर तुमचें वळण पाहून तुमचीं मुलेंही परंपरेनें कित्ता गिरवतील. आणि असें झाल्यानें तुह्मीं आपल्या देशाचा केवढा फायदा करूं शकाल बरें? दुःखार्णवांत बुडालेल्या आपल्या आर्यभूस वरतीं काढल्याचें श्रेय तुह्मांस अंशतः तरी येईल. आपल्या देशांत चांगलें कापड तयार होत नाहीं काय? पहा–काश्मिरी शाली, येवल्याची पैठणी, नागपुरी धोतरजोडा, चंदेरि बत्ती, शहापुरी खण व लुगडीं, डाकाची मलमल; काशीचे कद इत्यादि शहरें कपड्याकरितां सुप्रसिद्ध असतां मग 'म्यानचेस्टर'-कडेच कां धांव घ्यावयाची? ह्या अभिमानशून्यत्वामुळें आमच्या साऱ्या हिंदुस्थानांतील बहुतेक लोक निःसत्व व परावलंबी होत चालले.

॥ वृषभ नासिकीं घालूनि वेसणी । वश्य करोनि सदा फिरवी धनी ॥

ह्या सद्यःस्थितिदर्शक व संस्मरणीय अशा वामन पंडितकृत चरणाप्रमाणें आह्मी हुबेहुब वेसणीचे बैल होऊन बसलों. पूर्वजांच्या अभिमानाविषयीं, प्रसिद्ध पुरुष बर्क व मेकॉले काय ह्मणतात तें पहा:– "ज्या लोकांना आपल्या वाडवडिलांच्या कृत्याविषयीं अभिमान वाटत नाहीं, त्यांच्या मुलांच्या हातून वाखाणण्यासारखें कांहींच हो-

णार नाहीं." ह्मणून प्रिय भगिनींनो! जी चीजवस्त घ्यावयाची असेल ती होतां होईतों स्वदेशीच घेण्याचा निश्चय करा.

## कपडा कसा वापरावा?

१ कपड्यानें मनुष्यास शोभा येते ह्मणून यामध्यें ऐपतीबाहेर पैसा खर्चूं नये. ह्मणजे अगदीं भिकार व गलिच्छ वस्त्रें वापरावीं असें माझें ह्मणणें मुळींच नाहीं, तर स्वच्छ व आपापल्या योग्यतेनुरूप कपडा वापरावा.

पावसाळ्यांत लोंकरीचीं वस्त्रें वापरावींत, आणि उन्हाळ्यांत कापशीचीं मृदु वस्त्रें वापरावींत. दिवसां आपण जे कपडे आंगांत घालितों तेच रात्रीं घालूं नयेत. अंगाचा घाम ज्या कपड्यांस लागला असेल तो याप्रमाणें वाळूं दिला पाहिजे. स्त्रियांचा लज्जास्पद व परपुरुषास दिसतांच कामा नये असा भाग ह्मटला त्यांचें हृदय हा होय. तसेंच आरोग्यमार्गदृष्ट्या पोट व छाति यांवर आच्छादन असणें अवश्य आहे. ह्मणून लज्जेचें व शरीराचें संरक्षण होण्यास स्त्रियांनीं आंगांत बंडी घालणें हितकारक आहे. शाल आंगावर घेतांना शोभेपेक्षां शरीरसंरक्षणाकडे व सभ्यतेकडे विशेष लक्ष पोंचवावें.

## कपडे स्वच्छ करण्याच्या कांहीं रीती.

१ लोंकरीचें कापड स्वच्छ करणें:—जो कपडा करावयाचा असेल, तो एका स्वच्छ रुंद तोंडाच्या भांड्यांत ठेवून त्यावर कडक-डीत उन्ह पाण्याची धार धरावी, व दुसऱ्या भांड्यांत साधारण ताप-लेल्या पाण्यांत साबूचा फेंस तयार करून त्यांत तो कपडा घालून धुवावा.

कपडे वेळच्या वेळीं स्वच्छ केल्यानें व जपल्यानें बरेच दिवस टिकतात. तसेंच उंची कापड प्रसंगीं वापरून काम होतांच घडी करून ठिकाणीं ठेवावें. ठेवणुकीची वस्त्रें मधून मधून हवा देऊन उन्हांत टाकून पोटीं कापूर, तुरटी व 'सोडा' वगैरे पदार्थ कसरीचा त्रास होऊं नये ह्मणून बांधून ठेवावीं. फार मळूं दिल्यानें कपडे लवकर फाटतात. फाटलेला कपडा वेळींच शिवला तर अडल्या वेळीं फार उपयोगीं पडतो. थोड्या शिवण्यानें काम होत असूनही जर केवळ आळसानें तें न शिवलें तर मग तो कपडा कोणाच्याच उपयोगी पडण्यासारखा रहात नाहीं फाटके कपडे शिवणें हें भिकाऱ्याचें काम असें जर कांहीं स्त्रियांस वाटत असेल तर तो त्यांचा वेडेपणा होय. खरोखरच ज्यांची योग्यता जुना कपडा शिवून पुनः वापरण्याची नसेल त्यांनीं थोडासा फाटलेला कपडा लागलाच शिवून तो गरिबांस द्यावा. त्या गरिबास तो नव्याच्या ठिकाणीं होईल व देणारांस पुण्य लागेल. हवा जशी बदलेल त्याप्रमाणें कपडेही बदलले पाहिजेत. हिवाळ्यांत फ्लॉनेल, कॉश्मीर वगैरे गरम कपडे वापरावेत.

**शालजोडी किंवा पितांबर यांजवर पडलेले डाग काढणें.**

तेल अगर तुपाचा डाग पडलेल्या वस्त्राखालीं पान धरून जेथें डाग पडला असेल तेथें तुरीच्या डाळीचें घट्ट वरण दोन्हीं बाजूस बरेंच चोपडून सुकवावें व नंतर वस्त्र धुवावें. कपड्यावर शाईचा डाग पडल्यास डाग पडलेल्या जागीं आंबट लिंबाचा रस अगर 'विनाग्री' लावून थोड्या वेळानें कपडा धुवावा. किंवा गोंद लावून तो वाळल्यानंतर कपडा धुवावा.

**वस्त्रावर पानसुपारीचा डाग पडल्यास.**

दोन्हीं बाजूंनीं चुना लावून वस्त्र सुकूं द्यावें, आणि नंतर धुवावें



## प्रकरण १० वें.

# आईची योग्यता.

न मातुः परदैवतं ।

प्रत्येक राष्ट्राची उन्नति किंवा अवनति त्यांतील व्यक्तींवर अवलंबून असते. ह्या व्यक्तींमध्यें पुरुषांचा व निःसंशय स्त्रियांचाही समावेश झालाच पाहिजे. नुसता समावेश नव्हे तर पुरुषांपेक्षा कांहीं अंशांनीं स्त्रियांचेंच महत्व जास्त समजलें पाहिजे. ‘ शिक्षेंत ’ आचार्यांच्या शिष्याला आज्ञा आहेत, त्यांत ‘ मातृदेवोभव । पितृदेवोभव । आचार्यदेवोभव ।’ याप्रमाणें पायऱ्या आहेत. ह्मणून आदिदैवत ‘ आई ’ हें होय. बालक जन्मल्यापासून तें सुमारें ७।८ वर्षे वयाचें होईपर्यंत त्याला मुख्य सहवास त्याच्या मातेचा असतो. आपल्या अंतःकरणाचा अंश ती त्याला जन्मतःच देते; आणि बाकीचा तिच्या निकट सहवासानें, तिच्या उदाहरणानें व तिच्या वागणुकीच्या वळ-

णानेंच त्याला प्राप्त होतो. आईचें मुलावर इतकें कांहीं विलक्षण प्रेम असतें, कीं त्याचें शब्दांनीं वर्णन करणें देखील अशक्य आहे. एकदां एका बाईचें मूल पाण्यांत पडलें. हें कळतांच आपणास पोहतां येत नाहीं ह्या गोष्टीचें भान तीस न राहून मूल काढण्याकरितां तिनें पाण्यांत उडी टाकली. आतां पहा कीं, त्या शुद्ध व सात्विक प्रेमाचें वर्णन कसें करावें? आईच्या प्रेमाविषयीं तुकाराम महाराजांनीं एका अभंगांत ह्मटलें आहे. ‘पक्षी घेतसे गगन। पिलापाशीं त्याचें मन॥’ कविवर्य मोरोपंत यांनीं आपल्या केकावली नामक ग्रंथांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे, कीं ‘पिता जरि विटे विटो न जननीं कुपुत्रीं विटे.’ बाप मुलावर विटेल पण ‘न जननी कुपुत्रीं विटे.’ पुत्राचें मुख पाहून रामचंद्र देखील ह्मणाले, कीं, ननुपुनरिवतन्मेगोचरीभूतमक्ष्णोः। अभिनवशतपत्रश्रीमदास्यंप्रियायाः॥ बाळपणचें सीता. देवीचेंच मुखकमळ माझे दृष्टीस पडलेसें मला वाटतें.

उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम्॥—**मनुः**

‘संतति उत्पन्न करणें, व उत्पन्न झालेल्यांचें पालन करणें हीं कामें स्त्रियांचीं आहेत’ ह्मणून प्रत्येक गृहिणीनें मातृपदावर विराजमान होण्यापूर्वीं पुढील कर्तव्यकर्में काय आहेत, तीं पूर्णपणें समजावून घेतलीं पाहिजेत. या विषयीं एक प्रख्यात इंग्लिश डाक्तर ह्मणतो[1]:—“केवळ आईबापांच्या स्वभावरच त्यांच्या संततीचें हिताहित अवलंबून असतें; एवढेंच नव्हें, तर मातेच्या उदरीं मुलाचा जीवनसंचार होतो, त्या वेळीं त्या आईबापांच्या मनाची स्थिति जशी असेल त्याला अनुसरूनच त्या मुलाचा स्वभाव होतो.”

---

१ कारपेंटरकृत मनुष्यविज्ञानशास्त्र पृ० ९०५.

लहानपणापासून मुलाचे डोळ्यापुढें जसें चित्र आपण ठेवूं तसें त्याच्या अंतःकरणरूपी आदर्शावर प्रतिबिंब उठून त्याप्रमाणें तो भला किंवा बुरा होईल. जीं आईबापें धर्मनिष्ठ, सदाचारी आणि सुशील असतात तीं आपल्या सदाचरणानें सुसंतानरूपी उत्तम फळ मिळवितात. बालतरूला तो तरू कोंवळा असतांना हवा तसा लवविणें, वांकलेला सरळ करणें हें सर्व मातेच्या हातीं असतें. माताही बालकाची प्राथमिक शिक्षकीण आहे.

परमेश्वराची भक्ति, सत्य, प्रीति, नम्रता, विनय वगैरे अनेक सद्गुणांचें बीजारोपण मनुष्याच्या बालवयांतच उत्तम रीतीनें होतें, आणि नंतर ते पुढें विकास पावतात. एक पाश्चिमात्य विद्वान् ह्मणतोः—“ शिशुशिक्षणाचें काम मुल पाळण्यांत असतें त्या वेळींच आरंभिलें पाहिजे. लहानपणचें शिक्षण ह्मणजे ज्ञानरूपीं महावृक्षाचा बुंधा आहे व तदनंतर मिळविलेलें ज्ञान हें त्या बुंध्याच्या शाखा, प्रतिशाखा, पानें, फुलें, व फळें होऊन त्या बुंध्याला शोभा मात्र आणितात. ” आमच्या देशांतील माउल्यांनीं सुमित्रा, विदुला, कुंती-प्रभृति स्त्रियांचा कित्ता वळवून, त्यांनीं जसें आपल्या मुलांस लहानपणापासून सुशिक्षण देऊन नांवारूपाला आणिलें होतें. कुंती पांडवांची माता. हिचे स्वतःचे तीन व सवतीचे दोन मिळून पांच पुत्र होते. ते लहानपणापासून कुंतीचे देखरेखीखालीं असल्यामुळें त्यांचें परस्पराचर प्रेम दृढ व्हावें अशा सद्व्यवहारानें स्व-पर-ज्ञान सोडून त्या सर्वांस तिनें सुशिक्षण दिलें होतें. त्यामुळें त्या परस्पर बंधूंत कधींही वैमनस्य आलें नाहीं. सवतीचा मुलगा राम वनवासास चालला असतां,

आपल्या एकुलत्या एक मुलास सुमित्रेनें सदुपदेश करून रामाबरोबर जाण्यास सांगितलें. ती ह्मणाली:—“ रामास दशरथाच्या ठिकाणीं सीतेस माझ्या ठिकाणीं आणि अरण्यास अयोध्येच्या ठिकाणीं समज; आणि हे माझ्या बाळा! तूं सुखानें रामाबरोबर जा.” अहाहा! काय हा सदुपदेश, काय हें कर्तव्यज्ञान! अशा प्रकारच्या सन्मार्गदर्शक आया ज्या मुलांच्या असतील, त्यापेक्षां त्यांस दुसरें अधिक सुख कोणतें? ह्या पुराणप्रसिद्ध गोष्टी झाल्या. आतां इतिहास प्रसिद्ध उदाहरणें पाहूं:—वीरमाता जिजाबाईनें आपल्या आवेशयुक्त भाषणानेंच श्री शिवाजी महाराजांचे अंगांत वीरश्री उत्पन्न केली. जार्ज वाशिंग्टनच्या मातेनेंच आपल्या सद्गुणांचें आणि सत्यप्रीतीचें बीज आपल्या बालकाच्या हृदयांत लाविलें; ह्मणूनच अगदीं बालवयांत असतांना देखील ‘बाबा मला खोटें बोलवत नाहीं; तें झाड मीं तोडिलें,’ असें वदून बापाकडून काय शिक्षा होते, हें ऐकण्याकरितां धैर्यानें उभा राहिलेल्या सुपुत्राची माता केवढी धन्य? लांगस्तेन नांवाच्या बेटावरील दिवा लावणारी ग्रेस दार्लींग, हिनें अगदीं लहानपणांतच ‘बाबा आपण त्या गरिबांस वांचविण्यास जाऊं’ असें सांगितलें. बापानें मोडा घातला तरी त्याची पायधरणी करून संमती घेऊन तिनें भर तुफानांत होडी लोटली आणि ‘फोरफार शायर’ नांवाच्या बोटीवरचे लोक वांचविले. तेव्हां या धैर्यशालीनीची माता केवढी धन्य! स्पार्टन मुलगा लढाईला जावयाला निघाला ह्मणजे त्याची आई त्याला उपदेश करीत असे कीं, तूं जय मिळवून घरीं ये किंवा धारातीर्थीं देह ठेवून कीर्ति मिळवून घरीं ये; परंतु लढाईतून पळून घरीं येऊं नकोस.

तसेंच नरवीर बापू गोखले यांच्या हातून ‘ धोंडीवाघ ’ मारण्यास त्यांची चुलतीच कारणीभूत झाली. आपल्या प्रचारामध्यें ही ह्मण पडली आहे कीं ‘ यथा बीजस्तथांकुरः। ’ ह्मणून प्रत्येक गृहिणीनें ज्ञान मिळविणें व आपलें वर्तन शुद्ध ठेवणें किती महत्वाचें आहे बरें ? माता बालकाला जें वळण लाविते, त्याचें दृढीकरण तिनें आपल्या वर्तनानें केलें पाहिजे. आईचें वर्तन असें असावें कीं, पुत्राला मोटेपणीं तिची आठवण होते वेळीं, केवळ प्रेमाश्रूनेंच त्याचे डोळे भरून येऊं नयेत, तर तिच्याविषयीं, आदर आणि सन्मान नेहेमीं त्याचे मनांत जागृत आसावा. ‘ तुका ह्मणे मायबापें। अवघीं देवाचीं स्वरूपें. ’ पंत ह्मणतात कीं, ‘ ह्मणोनि ह्मणती भले। न ऋण जन्मदेचें फिटे ’ हें वाक्य तिच्या ठिकाणीं खरें झालें पाहिजे. बाबु केशव चंद्रसेन आपल्या आईच्या मरणसमयीं तिची पायधूळ डोकीवर घेऊन ह्मणतोः--‘ आई! तुझ्यासारखी माता सर्वांसच प्राप्त होणार नाहीं. तुझ्या सद्गुण प्रसादानेंच मी या स्थितीस पोंचलों आहे. ’ फ्रान्सचा बादशहा नेपोलियन बोनापार्ट एके ठिकाणीं ह्मणतो कीं ‘ बालकांचें भावी ’ चांगलें किंवा वाईट होणें हें सर्व मातेवर अवलंबून आहे. मी आपल्या जीवनांत उन्नति, उत्साह, उद्योगीपणा आणि आत्मसंयमन वगैरे जे गुण मिळविले, ते मिळविण्याचे कामीं माझे मातेनें मला जी मदत केली, ती अवर्णनीय आहे. ’ अमेरिकन निवासी थियडोर पार्कर या थोर पुरुषाचें नांव सर्व भूमंडळावर अक्षय्य राहण्यास त्याची माताच कारण झाली. जार्ज हर्बर्ट ह्मणून एक चांगला विद्वान पुरुष होऊन गेला. त्याचें ह्मणणें असें आहे, कीं ‘ मुलांस सुशिक्षण देण्यास

एक सुशिक्षित आई जितकी चांगली उपयोगी पडते तितके शंभर चांगलें शिक्षक उपयोगीं पडणार नाहींत.' सारांश एका मातेच्या ताब्यांत दहा बारा बालकांचीं कोमल हृदयें असतात.ती प्रयत्न करील तर ह्या कोमल तरूंचे मोठे प्रचंड आणि विस्तीर्ण वृक्ष होऊन आपल्या आर्यभूचे ते आधारस्तंभ होऊन राहतील. प्रिय भगिनींनो! ह्या बाबतींत तुम्हांवर किती मोठी जबाबदारी आहे. परमेश्वराचें व नंतर आपल्या स्वदेशजननीचें आपण जें ऋण घेतलें आहे, तें यथाशक्ति फेडणें ह्मणजे तुम्हीं आपल्या बालकांना उच्च शिक्षण देण्यांत आपला बराच वेळ घालविणें. हें तुमच्या कर्तव्यांपैकीं एक जबाबदारीचें व अति महत्वाचें कर्तव्य आहे.



# प्रकरण ११ वें.

## बालसंगोपन.

स्त्रीपुरुषांस मातापिता अशी बहुमानाची पदवी प्राप्त झाली असतां एक प्रकारचा अभिमान व मोठा आनंद होतो परंतु हा आनंद सर्वांचाच सारखा टिकतो असें नाहीं. कारण कांहीं थोडी मुलें चांगलीं निरोगी व सशक्त असतात, पण बरींच मुलें नेहमीं रोगी व अशक्त अशीं दृष्टीस पडतात. ह्यामुळें मातापितरांच्या मनास रात्रंदिवस काळजी लागते. आतां मुलांच्या अशक्ततेचें कारण पाहूं गेलें असतां, हेंच दिसून येईल, कीं मुलांची सुश्रुषा कशी करावी हें पुष्कळांस कळत नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, लहान मुलांच्या सहवासानें संसारांत जें एक प्रकारचें सौख्य असतें तें मुलें नेहमीं आजारी असलीं म्हणजे कमी होतें. मुलांच्या जन्मापासून तीं पांच वर्षांचीं होईं तोंपर्यंत त्यांच्या शरीराची व शक्तीची वाढ फार जोरानें होत असते.

वरील दुधावर वाढलेल्या मुलांपेक्षां आईचे दुधानें वाढलेलीं मुलें सशक्त व मजबूत असतात. आईचे दुधाची बरोबरी करणारें दूध नाहीं.

लहान मुलांनां अत्यावश्य ज्या गोष्टी आहेत, त्यांपैकीं मुख्य-मुख्य खालीं दिल्या आहेतः–

(१) सहज पचेल असें अन्न वेळचे वेळीं त्यांस द्यावें.

(२) कपडे उबदार असावेत.

(३) शरीराच्या प्रत्येक भागाला भरपूर व्यायाम मिळाला पाहिजे, पण तो सतत न देतां कांहीं वेळ व्यायाम व कांहीं वेळ वि-श्रांति असें झालें पाहिजे.

(४) त्यांचीं शरीरें, त्यांचे कपडे व त्यांचे आसपासच्या सर्व जिनसा अत्यंत स्वच्छ असाव्यात.

कांहीं लोकांचा समज असा आहे कीं, पहिलें दूध वाईट असतें आणि ह्मणून तें आरंभींच लहान मुलास पाजूं नये. परंतु ही चूक आहे. पहिलें दूध फार पौष्टिक असतें, आणि पोटांत गेल्यानें मुलाचा कोठा साफ होतो.

मुलांस पाजण्याकरितां दाई ठेवणें असल, तर ती एकापेक्षां अ-धिक मुलें पाजणारी ठेवूं नये. तिचे वय वीसपासून पस्तीस वर्षांपेक्षां जास्त असूं नये. ती पंडुरोगी, क्षयी, उपदंश झालेली, अंगावर खरूज वगैरे असलेली, अति कृश व विटाळशी होत नसलेली अशी न ठेव-ण्याविषयीं काळजी घ्यावी.

कांहीं आयांना असें वाटतें कीं, मुलांस कोंबून भरविलें ह्मणजे

तीं चांगलीं बळकट होतात. पण ही चूक आहे. तीं उलटी त्यानें अशक्त होतात; हगवण, अजीर्ण होतें, पोट मोठें होतें आणि कधीं कधीं यापासून अपघातही घडतात.

दुधाखेरीज इतर कोणत्याही अन्नाची मुलांना जरूर नसते. उलट इतर पदार्थ खाऊं घातल्यानें ते अपायकारक होतात. मुलांस तवकील, साबूदाणा किंवा मुलासाठीं तयार केलेले देशी व परदेशी पदार्थ तें आंग धरण्यासाठीं घालेतात पण त्यामुळें मुलांची प्रकृति कधींहि सुधारत नाहीं. पिठाचा अंश जास्त असतो असले पदार्थ मुलांस पचण्यास फार वेळ लागतो, ह्मणून तसले पदार्थ मुलांना मुळींच देऊं नयेत.

चांगल्या प्रकृतीच्या मुलांना दूध किती वेळानें पाजावें याविषयीं खालील नियम ध्यानांत ठेवण्यासारखें आहेत.

मूल[1] उपजल्यापासून तें तीन महिन्याचें होई पावेतों.—दिवसा दर दोन तासांनीं व रात्रीं दर तीन तासांनीं एकवार असें दूध पाजावें. अशा रीतीनें दूध पाजलें तरी पहिल्या महिन्यांत सरासरीच्या प्रमाणानें रोज अर्धा शेर, दुसऱ्या महिन्यांत रोज २॥ पाव व तिसऱ्या महिन्यांत ३ पाव किंवा पाऊण शेर दूध जातें व तेवढें मुलांना बस्स असतें. असें डॉक्टर लोकांचें ह्मणणें आहे.

पुढील[2] सहा किंवा आठ महिन्यांत दूध किती व कसें द्यावें.—दिवसा दर तीन तासांनीं एकवार व रात्रीं दर तासांनीं एकवार असें

---

१ लुकतुके यांचें 'प्रपंचशास्त्र' पृ. १८८ पहा.

२ लुकतुके यांचें 'प्रपंचशास्त्र,' पृ. १८९

कांहीं दिवस करून तासांचें अंतर हळुहळु वाढवीत जावें. दिवसरात्र मिळून मुलाच्या पोटांत पाऊण शेरापासून दीड शेरापर्यंत दुध देत जावें ह्मणजे पुरें होईल. एखादे वेळीं गाईचें किंवा बकरीचें दूध पाजणें भाग पडतें; गाईचें दूध इतर सर्व दुधांत उत्तम खरें, पण आईच्या दुधाची सर यासही यावयाची नाहीं.

गाईचें दुध मुलास पाजण्याचा प्रसंग आलाच तर तें नुसतें कधींही पाजूं नये. मूल एक महिन्यापेक्षां कमी वयाचें असेल, तर दोन भाग पाणी व एक भाग दूध मिसळून तें पाजावें; असें केल्यानें तें लहान मुलास चांगल्या रीतीनें पचतें. मूल जसजसें मोठें होईल तसतसें पाण्याचें प्रमाण कमी करीत जावें. गाईचें दूध मुलांनां पाजण्यापूर्वी चांगलें तापवावें, त्यामुळें तें सहज पचतें. मुलांनां दूध पाजण्याच्या बाटल्या स्वच्छ व कोरड्या असाव्यात. दूध पाजून झाल्याबरोबर दुधाची बाटली प्रत्येक खेपेस ऊन पाणी व पापडखार घालून धुऊन कोरडी करावी. तान्ह्या मुलास दूध पाजावयाचें तें तान्ह्या गाईचें असावें. नंतर निम्मे दूध व निम्मे पाणी किंवा दोन भाग दूध एक भाग पाणी घालून त्यांत वावडींग व बाळंतशोप घालून दूध तेवढें ठेवावें. मुलास शौचास होत नसल्यास त्या दुधांत एरंडमुळ घालावें.

लहानमुलांचे दांत.—दांत येइतोंपर्यंत मुलाला अन्न सहसा खावयास घालूं नये. दांत येत असतां मुलांस चावावेंसें वाटतें, तेव्हां त्याला कठीण पदार्थ देऊं नये. कठीण पदार्थांनें हिरड्या मठ होतात, ह्मणून अशा वेळीं रबराच्या चोखण्याचा उपयोग करावा. दांत येण्याचे सुमारास मुलाची लाळ पुष्कळ गळूं लागते, हिरड्या सुजतात आणि थोडथोडी किरकिर करूं लागतें.

मुलांचें चुंबन फार घेऊं नये, कारण त्यापासून एक प्रकारचा रोग उत्पन्न होऊन गालाची तेजी व सुंदरता नाश पावते. देवि टोंचविल्या नंतरचा उपचार:—

टोंचल्या जागीं कांहीं लागूं देऊं नये व त्यांस मूल खाजविणार नाहीं अशी तजवीज ठेवावी. असें केल्यास बहुतकरून इतर उपायांची जरूर पडणार नाहीं.

एरंडेल तेल देऊनं कोठा साफ करावा. हातास फार सूज आल्यास थंड पाण्यांत बुडविलेल्या मलमलीचा तुकडा तोडके काढलेल्या जागेवर सैल बांधावा. ती जागा भरून येण्यासाठीं त्यांत अबीर किंवा विभूत भरितात; परंतु याहीपेक्षां 'झिंक आइन्टमेन्ट' लाविल्यास बरें.

आंगच्या देवी येऊन गुरु होतात त्यास उपाय:—गेळीचें फूल किंवा फळ पाण्यांत उगाळून लावणें.

मुलांच्या गुटीच्या सामानाची याद:-मायफळ,जायफळ,कायफळ, कडुंगाठ, अतिविषाची कळी, फटकी, मुरुडशेंग, अक्कलकारा, वेखंड, बाळहरतकी, पिंपळी, आंबेहळद, चिंचोका, मस्कती डाळिंबाची साल, डिकेमाली, काळाबोळ, दालचिनी, रगतरोड्याची साल, काकडशिंग, कुचल्याची बी, अफू, बेहडा, सुरवारी हरडा, कडुकिराईत, सुंठ, कोळिंजण, कोष्ट कुड्याचें मूळ, जेष्टिमध.

मुलाला आंकडी येत असल्यास:—

१. 'लक्ष्मी नारायणा'ची एक पुडी ब्रह्मीच्या रसांत घालून त्यांत दूध व मध घालून सकाळीं व संध्याकाळीं अशा दोन पुड्या द्याव्या.

२. पंचामृत पर्पटीचे पांच वेढे दुधांत उगाळून त्याच दुधांत खारकीच्या बीचे पांच वेढे उगाळून बोंडलेंभर दुधांत सकाळीं द्यावें. दोन प्रहरीं एक वाजतां व रात्रीं नऊ वाजतां ब्रह्मादि अर्क देणें.

मुलाचें मलद्वार दुखत असल्यास शिसें तुपांत उगाळून गुदद्वारीं लावावें.

मुलास शौचास फार होत असेल तर आंगावरच्या दुधांत ढेंकूण चिरडून देणें.

मुलाचें पोट दुखत असल्यास डिकेमाली, रेवाचिनीचें लाकुड, पादेलोण, हिंग भाजून हीं सर्व औषधें दुधांत उगाळून बेंबीखेरीज करून पोटावर घालावें. व त्यावर वऱ्या किंवा कापूस लावावा.

मुलाचें पोट फुगलें असल्यास (१) रुइचे पानास एरंडेल तेल लावून शेकावें. (२) पळसाची फुलें आणून त्यावर थोडें पाणी शिंपून ऊन करून पुरचुंडीनें शेंकणें. (३) इंग्रजी गुळी ऊन पाण्यांत किंवा ब्रांडीत उगाळून लावणें.

लहान मुलाची छाती खोकल्यापासून दुखत असल्यास (१) आळशीचे पोटीसानें छाती व पोट शेकावें. (२) किंवा थोडें टरपेंटाईल लावावें.

मुलाचे छातीवर कफ दाटल्यास (१) ब्रांडीमध्यें वेखंड उगाळून छातीवर घालावें. (२) ब्रांडीमध्यें अक्कलकारा व जायफळ उगाळून घालावें.

मुलाचे पोटांत 'डबा' नांवाचा रोग होतो त्यास उपायः—

१ माका, वोंवा, दोन्ही मिळून अर्ध बोंडलें रस काढावा. त्यांत हळकुंड, कस्तुरीचे दोन वेढे व एक लवंग उगाळून देणें.

२ कोंबडीचे आंड्यांतील पिंवळा बलक वर्षातून, मार्गशीर्षमासीं, माघमासीं, वैशाखमासीं याप्रमाणें ब्रांडींतूत तीन वर्षे मुलास देणें.

३ कस्तुरी गाईचे दुधांत उगाळून देणें.

४ गणसुरीचें मूळ गाईचे गोमुत्रांत उगाळून पाजणें.

५ हेदींचे पानाचा रस समभाग तूप घालून देणें.

६ गोमुत्रांत साखर व मीठ समभाग घालून देणें.

७ खबुतराची किंवा पारव्याची विष्ठा मधांत चाटवावी.

८ कोहळ्याचा रस एक तोळापर्यंत पोटांत देणें.

डांग्या खोंकल्यास मखमलीचे पानाचा रस लहान मुलास आंगांवरील दुधांत व मोठ्यास गाईचे दुधांत देणें.

देवीच्या आजारानें डोळ्यांत फुल पडल्यासः—

१ गाढवाचा दांत उगाळून अंजन करावें.

२ मोंगली एरंडाचे चिकांत पांढरी गुंज उगाळून अंजन करावें.

नेत्रामध्यें देवी आल्या असतां कसईचें बी व जेष्ठीमध यांचे पाण्यानें नेत्र धुवावे.

## प्रकरण १२ वें.

# मुलांच्या आजारीपणांत लक्षांत धरावयाच्या गोष्टी.

आजारी मुलाची निजावयाची खोली होतां होई तों मोठी व उंच असावी. शहरांतील वस्ती असल्यास ही खोली घराच्या मागील बाजूस असल्यास बरी. आजारी मुलाच्या खोलींत गडबड अगदीं होऊं देउं नये. खोलींत हवा व प्रकाश भरपूर येण्याची सोय असावी. खोलींत अजारीं मुलाचा बिछाना अशा ठिकाणीं असावा कीं, तेथें वाऱ्याची झोत किंवा डोळ्यावर समोरें प्रकाश येत नसावा. प्रकाश आरोग्य देणारा व आयुष्य वृद्धि करणारा आहे. ह्मणन प्रकाश खोलींत येईल तितका बरा. खोलीचा आंतील भाग मनास आनंद देणारा असावा. तींत चोहोंकडे सुंदर चित्रें व फुलें लावून ठेवावीं. खोलींतील इतर माणसांची वर्तणूक आनंदी दिसावी. रोग्या-

च्या जवळ जाणाऱ्या मनुष्यांच्या चेहऱ्यांवर उदासीनता, खिन्न किंवा भीति दिसूं नये. खोली अगदीं स्वच्छ असावी. केर कचरा काढतांना थोडें पाणी शिंपल्यास हरकत नाहीं.

मूल आजारी असेल तेव्हां त्यास खाटेवर किंवा पाळण्यांत निजवून ठेवावें. सारा दिवस कडेवर घेऊं नये. त्यास स्वस्थ पडून राहूं द्यावें. दुखणेकरि मुलास पूर्ण विश्रांति पाहिजे ती त्यास कडेवर घेऊन नाचविल्यानें पाहिजे तितकी मिळत नाहीं.

खोलींत तस्ताचा उपयोग करणें भाग पडल्यास नेहमीं तें धुवून स्वच्छ ठेवावें.

दुखणेकऱ्याचे कपडे वारंवार बदलावे. निरोगी स्थितींत कपडे बदलण्याची जितकी जरूर असते त्यापेक्षां आजारीपणांत, व विशेषें करून तो आजार तापाचा असल्यास, ती फारच जास्त असते आंथरुणावरची चादर एक दिवसाआड बदलून नवी घालावी. मळीण कपडे रोग्याच्या खोलींत कधींही ठेवूं नयेत.

आजारीपणांत शरीर स्वच्छ ठेवणें फारच आवश्यक आहे ह्मणून वैद्यास विचारून हरकत नसेल तर मुलास दररोज आंघोळ घालावी. आंघोळ घालण्याचे पूर्वीं कोंबडीचे आंड्यांतील बलक आंगास लावावा. पाण्यांत कडुनिंब व निरगुडीचा पाला घालून पाणी तापवावें. आंघोळ निवाऱ्याच्या ठिकाणीं घालावी व ती घालण्यास फार वेळ लावूं नये. आंग धुऊन होतांच जाड्या खरखरीत कपड्यानें नीट पुसावें व लगेच आंगांत गरम कपडे घालावे. स्नान केल्यानंतर आंग उघडें राहिल्यास सर्दी होण्याची भीति असते.

मूल फार आजारी असेल तर वैद्य सांगेल त्याप्रमाणें पथ्य-बिनचुक ठेविलें पाहिजे. स्वतःची बुद्धि खर्च करून कोणतेंही कुपथ्य करूं नये. अन्न आजाऱ्याच्या खोलींत फार वेळ ठेऊं नये. कारण तेथील हवा थोडीबहुत तरी दूषित झालेली असते.

ऊन पाण्यानें किंवा पोटेशानें शेकावयाचें असल्यास नाजुक भागावर शेकण्यापूर्वी तें आपल्या हाताच्या मागील बाजूस लावून पहावें.

मुलाचे दांत स्वच्छ राखण्याकडे लक्ष पुरवावें. दांत दररोज स्वच्छ घांसावेत. हिरड्यांवर काळसर बुर चढला आणि जीभ अस्वच्छ झाली असली तर ‘ ग्लिसरीन ’ व लिंबाचा रस समभाग घेऊन दांतांवर व जिभेवर घांसून ती स्वच्छ करावी.

कितीएक प्रकारच्या आजारांत मुलें फार अशक्त झालेलीं असतात व त्यांच्या हृदयाचे व्यापार आनियमित व अशक्त होतात. अशा स्थितींत त्यास निजवूनच अन्न भरविणें जरूर असतें, तेव्हां अशावेळीं वैद्यानें मुलास निजले ठिकाणींच अन्न भरविण्यास सांगितलें असेल तर तिकडे दुर्लक्ष करूं नये.

मुलाची शुश्रुषा ममतेनें, दक्षतेनें, लक्ष देऊन सोशिकपणानें केली पाहिजे. त्रासतां किंवा भितां कामा नये.



## प्रकरण १३ वें.

# गोड शब्द.

**अप्रियस्यच पथ्यस्य । वक्ता श्रोताच दुर्लभः ।**

सृष्टिरचनेकडे अवलोकन केलें असतां—मग तें मनुष्यामध्यें असो, जनावरांमध्यें असो, किंवा अत्यंत नीच कीटकादि कोटिमध्यें असो, त्यांत सुद्धां असें आढळून येईल कीं, मादीपेक्षां नर बलानें, धैर्यानें, शौर्यानें श्रेष्ठ असतो. मानवकोटि मध्येंही आपण असेंच पाहतों. पुरुष जात्या शूर, धैर्यवान् व बळकट असा असतो, व स्त्रिया साधारणपणें भीरू, नाजुक, आणि कोमल मनाच्या असतात. पुरुषांनीं खटपट करून अन्नवस्त्रादि आवश्यक पदार्थ आणावे आणि स्त्रियांनीं आपल्या गोड शब्दांनीं व प्रीतियुक्त आचरणांनीं त्यांच्या दिवसाच्या साऱ्या श्रमाचा परिहार करावा; आणि ह्मणूनच जगत्पित्यानें सुख व आनंद देण्याकरितां सुकुमार व नेत्रचित्ततोषक अशी ही स्त्री जात निर्माण

केली आहे. जगन्नियंत्यानें जी स्वाभाविक कोमलता स्त्रियांच्या आंगीं ठेविली आहे, तिचा त्यांनीं सदुपयोग करावा. संध्याकाळीं पति दिवसाच्या साऱ्या श्रमामुळें दमून घरीं येतांच, स्त्रिच्या गोड शब्दांपेक्षां दुसरें मिष्टान्न नाहीं; तिच्या प्रीतिपेक्षां जगांत दुसरी कोणतीच आनंदकारक वस्तु नाहीं, तिच्या सद्गुणांपेक्षां दुसरें कांहींच प्रकाशित नाहीं असेंच त्यास वाटलें पाहिजे. आणि जेथें अशी स्थिति असेल तेंच खरें सौख्यालय. भगिनींनों! पति व्याधिष्ट. रोगी किंवा दरिद्री असला तरी त्याला तुह्मीं आपल्या स्वतःच्या प्राणाप्रमाणें जपा. पतीचा अपमान करूं नका. तो छांदिष्ट किंवा दुर्व्यसनी असेल तर त्यास स्वतःच्या कर्तबगारीनें, शहाणपणानें व एकनिष्ठ प्रेमानें कुमार्गापासून दूर करा. पुस्तकांतून व वयोवृद्धांचे तोंडून आपण पुष्कळ वेळां असें ऐकलें आहे कीं, कित्येक पतिव्रता स्त्रियांनीं, सर्वसंग परित्याग करून देशोधडी व्यसनांत पडलेल्या प्रवाशी पतीस संकटांतून व खडतर आकाबाईच्या फेऱ्यांतून आपल्या बुद्धिकौशल्यानें मुक्त केलें आहे. नवरा कितीही हूड, उल्लू, दुर्व्यसनी, बदख्याली व मूर्खशिरोमणी असला, तरी बायको जर शहाणी, सुशील, निरलस आणि शांत वृत्तीची असेल तर ती आपल्या पतीचा संसार उत्तम करील. इतकेंच नव्हें तर आपल्या गंभीर स्थभावानें तेज व वजन आपोआप त्याच्यावर पाडील. करितां तुह्मीं याप्रमाणें वागण्याचा निश्चय करा. परंतु त्याचा तिरस्कार करूं नका. तर “ ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें, चित्तीं असों द्यावें समाधान ” ह्या प्रोत्साहक चरणावर भरंवसा ठेवून त्याप्रमाणें वर्तनक्रम ठेवा. पति आणि पत्नी ह्या ईश्वरानियमित जन्माच्या गांठी आहेत, ह्मणून “ पदरीं पडलें आणि पवित्र झालें ” ही ह्मण लक्षांत घेऊन, त्याप्रमाणें

वागावें. गोड शब्दांनीं मनुष्याच्या मनावर उत्तम प्रकारचा ठसा उमटतो; आणि हा ठसा फारच मनोहर असतो. याच्या योगानें ऐकणाराचें शांतवन होऊन त्याची वृत्ति सकाळचे गुलाब पुष्पाप्रमाणें उल्हासित राहते. श्रोता निर्दय मनाचा असेल तर त्यास हे शब्द लाजवून सदय अंत:करणाचा करितात.

जोनाथन स्विप्त ह्मणतो:—"ज्या माणसाशीं संबंध येतो, त्या माणसांस संतुष्ट करणें हें सुशीलतेचें उत्तम लक्षण आहे. ज्याच्या सहवासानें कोणास इजा होत नाहीं, तोच सुशील मनुष्य होय."

"ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता" अशी भर्तृहरीची उक्ति आहे. लेडी मॉनटेग हिनें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं:— "सुजनता ही मोल देऊन विकत घेतां येत नाहीं. पण ती एक आंगीं असल्यानें कशाचीही उणीव पडत नाहीं." "द्रव्येण सर्वे वशा:" असें एक वचन आहे. परंतु द्रव्य खर्चूनही जें मिळण्याजोगें नसतें, तें गोड शब्दानें मिळतें. आपण समंजस व समजूतदार असलें पाहिजे. आपली मसलत कोणाला कळूं देतां कामा नये. आपली मसलत जर आपणासच सांभाळितां आली नाहीं, तर लोकांना ती कशी बरें सांभाळितां येईल? "द्विकर्णस्य तु मंत्रस्य ब्रह्माप्यंतं न गच्छति" हें वचन कांहीं खोटें नाहीं. शहाण्याची जीभ त्याच्या हृदयांत असते, पण मूर्खाचें हृदय त्याच्या जिभेवर असते. कारण त्याला जें कांहीं ठाऊक असतें, तें सर्व तो भडभड बोलून टाकितो. हरएक कामांत अकलेचा व बुद्धीचा विनियोग केला पाहिजे. अशानें सर्वच कामें म्हणजे बिनचूक होतात असें जरी नाहीं,

तरी कोणतेंही काम पूर्ण विचारपूर्वक केलें असतां, चुकी होण्याचा संभव तितका कमी असतो. पुष्कळ लोक जें कांहीं बोलतात, तें त्यांना कांहीं सांगावयाचें असतें ह्मणून नव्हे. तर, त्यांची जीभ वळवळ करिते ह्मणून. एरव्हीं त्यांत कांहीं अर्थ असतो असें नाहीं. वाचाळपणा म्हणजे वटवट करण्याची हांव? "बोलेल तो करील काय" अशी एक आपणांत ह्मण आहे. "नीचो वदति न कुरुते" ही ह्मण वरीलप्रमाणेंच संस्कृतांतही आहे. जिव्हेला स्वैरपणानें फिरूं दिल्यानें किती तरी अनर्थ ओढवतात. जगज्जननी जानकी इजवर जी अपरिमित दुःखपरंपरा लोटली, तिचें कारण तिनें आपल्याच मुखानें विदित केलें आहे तें असें:–"अशी सकळ अनर्था मूळ माझीच वाणी। अरे लक्ष्मणा धांव" 'ही असुराची कपट वाणी आहे, श्रीरामचंद्राची हांक नव्हे' असा सुमित्रीनें केलेला बुद्धिवाद सीता देवीनें मान्य करून नुसतेंच तोंडसुख घेतलें नसतें, तर रावणास तिचें हरण करण्याचा प्रसंग आला नसता. प्ल्युटार्क नांवाच्या ग्रंथकारानें डिमेस्टॅस विषयीं एक आख्यायिका सांगितली आहे ती अशी:–एकदां डिमेस्टस हा एका सभेंत बसला असतां दुसऱ्या एका गृहस्थानें त्यास विचारिलें कीं, कां हो! तुह्मी मूर्ख आहांत, अथवा काय बोलावें हेंच तुह्माला सुचत नाहीं. यावर त्या विद्वान पुरुषानें उत्तर दिलें:–मूर्खाला आपली जीभच सांभाळितां येत नाहीं. सालोमन नामक एक प्रख्यात परम चतुर पुरुष ग्रीस देशांत होऊन गेला, त्यानेंही असेंच ह्मटलें आहे. श्री समार्थांचीही अशीच उक्ती आहे–

बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौनची धरावें ।
अल्प चिन्हेंची समजावें । जगदांतर ? ॥

हें तूं, समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचें जिवीचें समजणें ।
मुख्य चातुर्याची लक्षणें । तीं हीं ऐशीं ॥ २ ॥

कोणालाही काय आपलें वर्चस्व दाखवूं नये. ' तूं कोण आहेस, तुला विचारतो कोण, ' इत्यादि तोऱ्याच्या गोष्टींनीं बोलूं नये. या पासून ऐकणाराला जसा खेद वाटतो. तसा दुसऱ्या थोड्याच गोष्टींनीं वाटतो. कोणत्याही गोष्टीचें विधान करितांना त्यांत दुराग्रह नसावा.

कांहीं स्त्रियांना थोड्याशा कारणांवरून, अगर थट्टामस्करीवरून रागावण्याची किंवा रुसण्याची खराब संवय जडलेली असते. परंतु भगिनींनों ! हा तुमचा केवळ वेडेपणा होय. या संबंधीं लॉर्ड चेस्टर फिल्ड यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं क्षणिक विनोदाकरितां स्नेहांत अंतर आणणें हा शुद्ध मूर्खपणा होय. याविषयीं भारती कवीची उक्तिही स्मरणीय आहेः—" सुकरस्तरुवत्सहिष्णुता रिपुरुन्मूलयितुं महानपि " होताहोईतों क्रोधावश होऊं नये. यदाकदाचित् क्रोधानलानें पेट घेतलाच तर जीभ स्वाधीन ठेऊन त्याची ज्योत करवेल तितकी अंधुक करावी. " क्रोध हा थोड्या वेळचा वेडेपणा आहे " अशी एक इंग्रजींत ह्मण आहे.

क्रोध तोचि अपस्मार । क्रोध तोचि भूतसंचार ।
कोधें कीजे पिशाच्च नर । परम चतुर विवेकीं ॥ १ ॥
शांति—पीयूष रसाचें पात्र । तुझे हृदयीं अति पवित्र ।
तेथें क्रोधश्वान अपवित्र । स्पर्शों नेदी सर्वथा ॥ २ ॥

मुक्तेश्वर.

अध्यात्म रामायणांत श्री रामचंद्रानें लक्ष्मणास सांगितलें आहे

कीं, काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे सहा शत्रू आहेत. परंतु त्यांत मोक्षाला विघ्न करण्याविषयीं एकटा क्रोधच पुरेसा आहे. कारण क्रोधाचा आवेश आल्यावर तो आपला पिता, भ्राता, मातुलादिक प्रिय असलेल्यांसही मारितो. मोरोपंत ह्मणतातः–

नसतो विवेक कांहीं, बा घडतो आत्मघात ही कुपिता ॥
सुपिताहि क्रोधाच्या, आवेशें करुनि होतसे कुपिता ॥ १ ॥

याकरितां प्रिय भगिनींनो ! वडिलांच्या बोलाचा राग धरूं नका. वडिल माणसें रागावतील, त्यावेळीं मूकवृत्ति धारण करा. व आपलें वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करा. कोणालाही काय, अरे पेक्षां ‘ अहो ’ ह्मटलें असतां संतोष होतो, हें नेहेमीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. “ अहो काहो अरे कांरे। जनीं ऐकिजे ती कीरें ” असे समर्थांचे उद्गार आहेत. तसेंच एका कवीनें ह्मटलें आहेः–

वंदन वस्तु न पावे । गुण पावे वंदना अनायासें ॥
हें तत्व अनुभवावें । पहावें साधुसंत सहवासें ॥ १ ॥
यास्तव संपादावें यत्न करुनि सद्गुणांस मनुजांहीं ।
त्या वांचुनि वंद्यत्व प्राप्तीचा मार्ग दूसरा नाहीं ॥ २ ॥
वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिसृताः ।
तां तु यस्तेनयेद्वाचं स सर्वस्तेय कृन्नरः ॥ २ ॥

मतितार्थः–सर्व व्यवहार उत्पन्न होण्यास कारण वाणी आहे. वाणीच्या योगानें सर्व व्यापार चालतात. अशा वाणीला जो चोरतो ( खोटें बोलतो ) तो सर्व वस्तु चोरणारा होय.

एका प्रसिद्ध गृहस्थानें तत्ववेत्ता आरिस्टाटल यास प्रश्न

केला कीं, ‘ जे लोक खोटें बोलतात त्यांना त्यापासून काय मिळतें? ’ त्यावर महात्म्या ‘ आरिस्टाटल ’ यानें उत्तर केलें:– “त्यांना त्यापासून कांहीं न मिळतां उलट ते जरी खरे बोलले असले तरी त्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं, हा मात्र त्यांना मोठा लाभ होतो. ” ह्मणून मनुष्यानें खोटें बोलूं नये, सदासर्वदा खरें बोलावें हें आपलें कर्तव्यकर्म होय. चौदावा लुई हा उद्धट भाषण कधीं करित नसे व आपल्या कुटुंबांतल्या माणसांसही करूं देत नसे. तो ह्मणे कीं:– ‘ उद्धट भाषण हें वज्रपाय आहे. ’

दुसऱ्याच्या मनाजोगतें होईल तितकें करण्याची खटपट करावी, तथापि प्रसंगीं “ नाहीं ” ह्मणण्यास डगमगूं नये. एके ठिकाणीं क्लिफोर्ड ह्मणतो कीं अशा कांहीं वेळा असतात कीं, तेव्हां ‘ नाहीं ’ ह्मणणें हेंच शहाणपण असतें.

‘ भीड भिकेची बहीण ’ अशी आपणांत एक ह्मण आहे व ही भीड न तुटल्यामुळें आणि ‘ नाहीं ’ ह्मणतां न आल्यानें किती तरी लोकांची दुर्दशा उडाली आहे. ‘ नाहीं ’ हा द्वयाक्षरी शब्द उच्चारतां न आल्यामुळें ‘ एशियामायनर ’ देशांतील लोकांना पराधीनत्व सेवावें लागलें. ह्मणून योग्य वेळीं “ नाहीं ” ह्मणण्यास शिकावें. उदाहरणार्थः अमुक एक जिन्नस विकत घेतली पाहिजे; खरें. पण जवळ पैसा नाहीं, तर ती घ्यावयाची नाहीं असें साफ ह्मणा. तुमच्या नवऱ्यावर कर्जाचा बोजा आहे. त्यांचें व्याज व मुद्दल यांच्या रूपानें तो फेड करीत आहे. तुमच्या किंवा त्याच्या मनांत आलें कीं, एक महिना हप्ता बंद करावयाचा, तर त्यास किंवा स्वतःच्या मनाला,

नाहीं बंद करावयाचा असें ह्मणा पोरंबाळें पाठीस लागली कीं आम्हांस अमुक पाहिजे, तमुक पाहिजे; परंतु तुमच्यापाशीं सध्यां ते जिन्नस घेऊन देण्याचें सामर्थ्य नाहीं; तर आज नको पुढें केव्हांतरी घेऊं असें ह्मणा. तसेंच प्रत्येक निष्कारण खर्च करण्याची संधी आली असतां नाहीं ह्मणून चटकन उत्तर द्यावें. पहिल्या पहिल्यानें असें 'असिधारा व्रत' पाळण्याचें अंमळ कठीण पडेल खरें, पण संवयीनें सर्व कांहीं साधतें. तेव्हां सांगावयाचें ह्मणून एवढेंच कीं, आत्मसंयमन करून विचारपूर्वक जें करणें तें करावें. मुलाबाळांची हौस पुरवूं नये, किंवा पोटास बंद बांधावा अशांतला मुळींच अर्थ नाहीं, हें मात्र विसरतां कामा नये. ज्यांच्याशीं आपणास व्यवहार ठेवावा लागतो, त्यांच्याबरोबर अशा धोरणानें वागावें कीं, आपणांशीं व्यवहार करण्यांत त्यांना उल्हास वाटावा; व आपल्याशीं वारंवार प्रसंग घडावा अशी त्यांना मनापासून इच्छा व्हावी. व्यवहारांत इतरांनीं आपल्याशीं ममतेनें, मर्यादेनें, प्रांजलपणानें व गोडीगुलाबीनें वागावें असें प्रत्येकास वाटतें. तेव्हां इतरांशींही आपण तसेंच वागलें पाहिजे. तुमच्या पतीनें तुमच्याशीं जसें वागावेंसें तुह्मांस वाटतें, तसें आधीं तुह्मीं त्याच्याशीं वागा ह्मणणे मग श्री गुरु समर्थांनीं ह्मटल्या प्रमाणें:-॥ आपण दुसऱ्यासी करावें। तेणें सवेंची उसणें घ्यावें ॥ या अन्योक्तिप्रमाणें तुमचा पतीही तुमच्याशीं वर्तन ठेवील. तसेंच एकेठिकाणीं समर्थ ह्मणतात:-॥हें आपणाकडेच येतें । राजी राखीजे समस्तातें ॥ कविराज श्रेष्ठ मोरोपंत याचीही उक्ति मोठी संस्मरणीय आहे:-॥ज्याचें आचरण जैसें, त्या तैसा फलद काळजी वाहो ॥ क्लिफोर्ड एके ठिकाणीं ह्मणतो:-'भाषण हें

मनुष्याच्या वर्तनाचें तात्पर्य असतें.' ह्मणून प्रत्येक मनुष्यानें जें बोलावयाचें तें विचारपूर्वक बोललें पाहिजे. नेहमीं आपला शब्द खरा केला पाहिजे. तरच लोकांचा भरंवसा आपल्यावर बसून आपण स्तुतीस पात्र होऊं. अंगीं बुद्धिमता व कार्यदक्षता नसतांही या जगांत कांहीं मनुष्यांनीं केवळ सदाचारानें, गोड भाषणानें व सुशील वर्तनानें कार्यसिद्धी व कृतार्थता संपादिली आहे. करितां मत्प्रिय भगिनींनो! 'सुखाचे मुखें बोलतां काय वेंचे' ही श्रीसमर्थोक्ति ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें वागावें.



## प्रकरण १९ वें.

# उद्योग.

उद्योगः खलु कर्तव्यः । फलं मार्जारवद्भवेत् ॥
जन्मप्रभृति गौर्नास्ति । पयः पिबति नित्यशः ॥

जगत्कर्त्या परमेश्वरानें पशुपक्ष्यांप्रमाणें स्वशरीरपोषणाची आणि रक्षणाची साधनें मानवी प्राण्यास मुळींच दिलीं नाहींत. तरी तो कांहीं नेहमीं उघडाबोडका किंवा उपाशी राहतो असें मुळींच नाहीं. त्या सर्वशक्तिमान जगच्चालकानें इतर प्राण्यांपेक्षां बुद्धिरूप अमूल्य रत्न मनुष्य प्राण्यावर विशेष मेहेर नजर करून त्यास बक्षीस दिलें आहे; व त्याचा योग्य सदुपयोग करून फळ उपभोगण्याकरितां, त्यास हात, पाय, नेत्रादि, इंद्रियें दिलीं आहेत. यावरून मनुष्य प्राण्यानें स्वकष्टानेंच स्वतःचा गुजारा करून घ्यावा असा त्या विश्वपालकाचा उद्देश असावा हें उघड दिसतें, जोंपर्यंत प्रत्येक मनुष्य ईश्वराकडून

प्राप्त झालेल्या देणग्यांचा सदुपयोग करितो, तोंपावेतों त्यांच्या संपूर्ण गरजा पुऱ्या पडून त्यास अनेक तऱ्हेचें थोडे किंवा फार सुख मिळतें. परंतु तो अमूल्य देणग्यांचा योग्य उपगोग करणार नाहीं, आळसामध्यें आपले दिवस घालवील तर खरोखर, त्याचे जनावरांहूनहीं जास्त हाल होतील. त्याला आपलें आयुष्य सदैव दारिद्र्यांत घालवावें लागेल, खावयास पोटभर मिळणार नाहीं, आणि तो जन्मभर दुःखार्णवांत गटंगळ्या खात राहील, मनुष्य कितीही कंगालावस्थेंत असो, पण जर तो निश्चयपूर्वक सतत उद्योग करील तर खात्रीनें तो आपलें जीवित सुखानें घालवील. "* ऐन वाढीच्या दिवसांत ह्मणजे वयाच्या पहिल्या पहिल्या अठरा वर्षांत ज्याच्या प्रत्येक शरीरभागास योग्य श्रम घडले नाहींत, त्याच्या शरीराचे भिन्न भाग भिन्न प्रमाणानें वाढतात; त्याची आकृति बेढब होते व उत्तर वयांत कित्येक कामांस तो अगदीं नालायक होतो. तो सर्वच अवयवांनीं क्षीण होतो. शरीराची वाढ खुंटून तो खुजा, व सडपातळ होतो व त्याच्या अन्नपचनादि शरीरव्यापारांस मांद्य येऊन मानसिक श्रमही त्याकडून होईनातसे होतात. तो स्वतः दुर्बळ व अल्पायुषी होतो, एवढेंच नव्हे तर संततीसही हे दोष संक्रमित करितो."

आपलीं गात्रें गृहकृत्यें करण्यास जोंपर्यंत समर्थ आहेत तोंपर्यंत आपण दुसऱ्यांवर अवलंबून राहूं नये. आजचें काम उद्यांवर टाकून हातपाय जोडून स्वस्थ बसणें म्हणजे आळसास व अवदशेस आवाहन

* गोळेकृत 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' [ पृ० ६५ ]

करण्यासारखें आहे. ‘मी थोरा मोठ्याची कामकाज कसें करावें’ ह्मणून स्वस्थ बसणाऱ्या हजारों स्त्रिया आज हातापायानें निर्बल होऊन बसल्या आहेत. ‘उद्योग’ या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. कोणताही धंदा करण्याचें नांव उद्योगच. ह्मणून मनुष्यानें जो उद्योग करावयाचा तो आपल्या फायद्याचा व नीतीस अनुसरून असावा. याविषयीं वामन कवि एके ठिकाणीं ह्मणतातः–उद्योग सब्दंधु तया न टाकी । त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं ” ॥ आनन ह्मणतातः–‘ सगळी देणगी उद्योगाची आहे. ” ‘ शेक्सपीयर ’ ह्मणतातः—“ हौसेनें उद्योग केल्याखेरीज बरकत येत नाहीं. ’

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः ॥

—भर्तृहरि.

भावार्थः–आळस हा मनुष्याच्या शरिरांत राहणारा त्याचा एक मोठा शत्रु होय.

ह्मणून जो उद्योग करावयाचा तो आपल्या थोरवीस साजेल असा करावा. क्षुल्लक गोष्टींच्या विचारांत आपलें आयुष्य बिलकूल दवडूं नये. ‘ स्त्रीबुद्धिः प्रळयकारणी ’ या वाक्यास आपल्या कर्तबगारीनें कलंक लावा. स्वकर्तव्यास विसरून हा सोन्यासारखा नरदेह व्यर्थ दवडूं नका. तुह्मांला समजूं लागल्या-पासून तुमचीं डोकीं किती क्षुद्र विचारांनीं भरून गेलेलीं असतात बरें! अंगावर डागदागिना घालणें, वाजवीपेक्षां फाजील नटणेंमुरडणें, नोकझोंक करणें, दुसऱ्याच्या नसत्या कुचाळ्या करणें; ह्यांत

तुमचा किती वेळ जातो बरें? तुमच्या ह्या कृत्यांवर मासिक पुस्तकांतून 'स्त्री पार्लमेंट' या मथळ्याखालीं टीकापर काव्येंही येऊं लागलीं. करितां प्रिय भगीनींनों, परमेश्वरानें तुह्मांला जी बुद्धि दिली आहे, ती या निरुपयोगी गोष्टींत व्यर्थ घालविण्याकरतां दिलेली नाहीं. तोच वेळ जर तुह्मी आपली कर्तव्यें समजावून घेण्यांत घालवाल तर किती बरें फायदेशीर होईल? कोणतेंही काम धांदलीनें किंवा गडबडीनें करूं नये. तर विचारपूर्वक नटिनेटकें करावें. या विषयीं श्रीसमर्थांची उक्ति ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.:—

पसेवरी वैरण घातलें। तांतडीनें जातें ओढिलें॥
तेणें पीठ बारीक आलें। हें तों घडेना॥ १॥

घांसा मागें घांस घेतला। अवकाश नाहीं चावायाला॥
अवघा बोकणा भरिला। पुढें कैसें?॥ २॥

यावरून ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, फार धांदल व गडबड केल्यानें कोणतेंही काम चांगलें व लवकर होत नाहीं. काम जलद करणें असेल तर तें धांदल न करितां आधींपासून तयारी ठेवून फार व्यवस्थित रीतीनें केलें पाहिजे. आयत्या वेळीं कामास लागलें ह्मणजे सर्वच धांदल उडून जाते. एके ठिकाणीं इंग्लंडांतील नामांकित योद्धा नेलसन म्हणतो:—मला जें एवढें यश प्राप्त झालें त्याचें मूळ बींज हेंच कीं, कोणत्याही कामांत माझी पाव तास आधीं तयारी असते.

'गेली वेळा येईल अशी गोष्ट कधिंहि न वदावी.' वेळेचा सदुपयोग कसा करावा, हें पुष्कळ स्त्रियांना ठाऊक नसतें. कोणी

आपला बहुतेक वेळ झोंपेमध्येंच घालवितात; कोणी काशिदा शिवण काम यांतच दिवसभर गढलेल्या असतात. कोणी आहार व निद्रात्याग करून सारा दिवस गोष्टींचीं पुस्तकें वाचण्यांतच घालवितात. कोणी कोणी तर यत्किंचितूही विश्रांति न घेतां, एकसारख्या रात्रंदिवस घरांतल्या कामांतच चूर झालेल्या असतात. परंतु यांपैकीं एकही चांगलें नाहीं. प्रत्येक काम आपल्या गृहकृत्याकडे लक्ष देऊन सारासार विचारानें करावें. एकसारखें एकच काम केलें, तर मनाला आनंद वाटत नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यापासून प्रकृति बिघडण्याचाही संभव असतो.

स्त्रियांना बरींच कामें करावयाचीं असतात ह्मणून प्रत्येक कामाला नियमित वेळ नेमलेला असावा. दिवस आणि रात्र मिळून चोवीस तास. या चोवीस तासांपैकीं आठ तास झोंपेसाठीं ठेवून बाकी राहिलेल्या वेळांत निरनिराळीं कामें करावींत. कांहीं वेळ घरांतील स्वयंपाकादि कामकाज करावें; कांहीं वेळ कशिदा काढणें, लोकरीचें विणकाम करणें इत्यादि शिवण कामांत घालवावा. कांहीं वेळ शिशूंना सुशिक्षण देण्यांत, स्वतः नवीन कांहीं शिकण्यांत, बोधप्रद पुस्तकें वाचण्यांत, व कांहीं वेळ घरांतील चीजवस्त व्यवस्थित ठेवण्यास खर्चावा; तसेंच कांहीं वेळ फुरसुतीचे अंतीं आपल्या बरोबरीच्या सुशील व कुलवान मैत्रीणींशी एखाद्या चांगल्या विषयावर वादविवाद करण्यांत खर्चावा; किंवा, निर्दोष गोष्टी बोलण्यांत दवडावा. इंग्लंड देशचा राजा सहावा जेम्स यानें एकदां थामिस हामिल्तन ह्याजला विचारिलें कीं, 'तुमच्याजवळ जी संपत्ति आहे, ती तुह्मीं कशी कशी संपादिली?' त्यावर त्यानें उ-

त्तर केलें 'महाराज जें काम आज करितां येईल अशी माझी खात्री आहे, तें मी कधीं उद्यांवर टाकीत नसतो; आणि जें मला स्वतः करितां येण्यासारखें आहे, तें मी दुसऱ्याला करण्यास सांगत नाहीं. हें मला संपत्ति प्राप्त होण्यास मुख्य साधन कारणीभूत झालें'.

योहि कालो व्यतिक्रामेत्पुरुषं काल कांक्षिणं ।
दुर्लभःसपुनस्तेन कालः कर्म चिकीर्षुणा ॥

—महाभारत.

भावार्थ.—" जो मनुष्य एखादें कार्य करण्याची उत्तम संधी इच्छित असून ती आली असतां दवडतो, त्याला पुनः तें कार्य करणें झाल्यास तशी संधी मिळत नाहीं. " इतर इच्छेच्या बळानें व उद्योगानें मनुष्याला सर्व कांहीं साध्य आहे. सारांश मनुष्यानें आळसामध्यें आपला अमूल्य वेळ खर्चूं नये. या विषयीं कामवेल एके ठिकाणीं ह्मणतो:—" देवानें वेळ दिला आहे तो उद्योग करावा. त्या नंतर विश्रांतीच आहे. " तेव्हां आपल्या अमुल्य वेळाचें महत्व लक्षांत आणून ज्या स्त्रिया त्याचा सदुपयोग करतील, त्यांचें स्वतःचें हित होईल इतकेंच नव्हे तर त्या आपल्या कुटुंबासही सुखी करतील.

## प्रकरण १५ वें.

# घरातील चाकरमाणसें.

सेवा धर्मः परम गहनो योगिनामप्यगम्यः ।

—भर्तृहरि.

जर आपण थोडें लोकस्थितिकडे पाहिलें, तर असें दिसून येईल कीं, बहुतेक चाकर थोडी-तरी आपल्या धन्यासंबंधानें कुरकुर करीत अस-तात. असा प्रकार कां असावा ? याचा विचार करूं लागलें असतां, ज्या अडचणी दूर होण्या-साठीं चाकराची योजना केली असते, त्या त्याज-कडून बरोबर भागल्या जात नसाव्यात; हें धुस-पुसीचें कारण सकृद्दर्शनीं मनांत येतें व तें सत्यही आहे. करितां धन्यानें चाकाराशीं कसें वागावें हें थोडक्यांत सांगतों. कित्येक लोकांची अशी रीत असते कीं, एखादा नवीन चाकर ठेवला कीं, लगेच त्याच्यावर सर्व प्रकारचा भरंवसा सोंपवावयाचा. चाकर प्रामाणिक

असल्यास असें करण्यापासून नुकसान होत नाहीं. पण तो तसा नसल्यास मात्र घरधन्याचें फार नुकसान होतें. चाकराच्या हांतून बेभरंवशाचा प्रकार झाल्याचा नजरेस येतो, तेव्हां त्याजकडून भरंवशाचीं कामें काढून घेणें भाग पडतें. अर्थात् बिनजोखीमाचीं कामें फक्त वरील प्रकारच्या नोकरावर ठेवावीं लागतात. परंतु अशानें त्या अज्ञानास खेद न वाटतां उलट त्याचें मन कलुषित होतें; आणि बाह्यात्कारीं तो पूर्वीपेक्षां आपलें वर्तन जरा सुधारलेलें दाखवितो, तरी मनांत कपट बाळगून प्रसंगीं अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष रीतीनें धन्याचें नुकसान करायला सोडीत नाहीं. हा भावी अनर्थ टाळण्यासाठीं नवीन चाकरावर भरंवशाचीं कामें धन्यानें एकदम सोंपवूं नयेत. तर कित्येक प्रसंगीं त्याच्या प्रामाणिकत्वाची बारकाईनें परीक्षा करून नंतर त्याजकडे हळू हळू भरंवशाचीं कामें देत जावीं. गुन्ह्याच्या मानानें चाकरांना शिक्षा केलीच पाहिजे. परंतु ह्यापूर्वीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, शिक्षेचा प्रसंग आणण्यापेक्षां गुन्ह्याचीं द्वारें बंद करणें फार चांगलें. आतां एखादा पक्का खोडकर किंवा हताळ चाकर असल्यास त्यापुढें ब्रह्मदेवाचें देखील कांहीं चालावयाचें नाहीं. तशा मनुष्यास धन्यानें काढूनच टाकलें पाहिजे. या साठीं तशा नोकरासंबंधीं या ठिकाणीं कांहींच लिहिणें नाहीं. पण त्या खेरीज इतर नव्या जुन्या चाकरांकडून सहसा गुन्हा होऊं नये, अशी थोडी व्यवस्था धन्याला करितां येण्यासारखी आहे. ती अशी:—धन्यानें अथवा ज्यांच्या हाताखालीं चाकरमाणसें वागतात, त्यानें हाताखालील नोकरांशीं असें वर्तन ठेवलें पाहिजे कीं, जेणेंकरून आपल्या धन्याला काडीमात्र अपराध सहन होत नाहीं व तोही स्वतः अन्यायानें कधींच वागत नाहीं असें चाकराला वाटावें. धन्यानें

चाकर माणसाशीं फार सभ्यतेनें वागलें पाहिजे. आपलें नातें विसरून त्यांच्यांशीं फार सलगीनें कधींही वागूं नये. सारांश धन्यानें चाकराजवळ न्यायानें, प्रामाणिकपणानें, ममतेनें व सभ्यतेनें वागावें. ह्मणजे धन्याचा बोज राहून चाकरालाही धन्याशीं त्या रीतीनेंच वागावें लागतें. धन्याचें अन्यायाचें वर्तन जर त्याच्या नजरेस येईल, तर तो धन्याची पर्वा न करितां हळू हळू त्याचें अनुकरण स्वतःच्या कृतींत वठवील. शिक्षा करण्याजोगा गुन्हा चाकराच्या हांतून घडल्यास त्यास गुन्ह्याच्या प्रमाणें शिक्षा करावी. क्षुल्लक बाबतींत थोडें दुर्लक्ष करावें. कांहीं चाकराचा गुन्हा कानांनीं ऐकतांच किंवा नजरेनें पाहतांच त्याजवर चौदाव्या रत्नाचा उपयोग करितात, पण होतां होईतों असें न करणें चांगलें. कारण पावलोंपावलीं शारीरिक दंड केल्यानें चाकर कोडगे बनतात. केव्हां केव्हां तर एखाद्या हलकट व उर्मट चाकराशीं गांठ पडल्यास तो धन्याची बाकी न ठेवतां उलट त्याला शारीरिक दंड देतो. चाकराच्या मनांत पूर्णपणें ठसेल अशा शब्दांनीं त्यास घडलेल्या अपराधाचें आणि त्यापासून झालेल्या किंवा होणाऱ्या नुकसानीचें स्वरूप त्यास समजावून द्यावें. या सांगण्यापासून सुधारणा न झाल्यास त्यास सांगावें कीं, 'तुझें वर्तन सुधारेपर्यंत तुझा रोजमुरा वाढवावयाचा नाहीं.' यानेंही ताळ्यावर न आल्यास त्याच्या रोजमुऱ्यांतून दंडा दाखल कांहीं रक्कम घेत जाऊन ती स्वतंत्र ठेवावी, आणि त्याचें वर्तन बरेंच सुधारलें असें वाटल्यावर काढून ठेविलेल्या रकमेपैकीं निम्मे भाग किंवा वाटल्यास सर्व भाग बक्षीस या रूपानें त्यास परत द्यावा. आमच्या भगिनीवर्गास आमचें इतकेंच सविनय सांगणें आहे कीं, भाग्यवशानें चाकर माणसें हाताखालीं वागविण्याचा

जर तुझाला सुयोग आला तर वर सांगितलेल्या सूचनांकडे पूर्ण लक्ष देऊन त्याप्रमाणें वर्तनक्रम ठेवावा. बाजारांतून सामानसुमान आणण्यांत चाकर लबाडी करितात. यास्तव कधीं कधीं वजन मापाचा मेळ पाहून लबाडी दिसल्यास त्यास ती सौम्य तऱ्हेनें दाखवून खजील करावा. त्यांस आपली धनीण दक्ष आहे असें प्रत्ययास आणून द्यावें. त्यांतही तोंडपुंजे चाकरांचा लुबरेपणा जो प्रसिद्ध आहे तिकडेही विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. कारण आपल्या शब्दजालानें स्त्रियांस मोहपाशांत गुंतविणारे कर्मचांडाळ, अशा मानभावी लोकांत केव्हां केव्हां आढळतात. यासाठीं कोणत्याही चाकराशीं तुह्मीं वाजवीपेक्षां फाजील सलगीनें वागूं नका. स्वयंपाक करणारे, पाणी भरणारे, इत्यादि हलकीं कामें करणारे बहुधा अशिक्षित असल्यामुळें अज्ञान असतात व दुर्व्यसनांचे कट्टे असतात. ह्मणून पगाराच्या रोजमुऱ्यावर त्यांचा प्रपंच नीटपणें भागत नाहीं. असें होऊं लागलें ह्मणजे ते प्रसंगीं धन्याच्या मालाची लांबवालांबवी करण्यास चुकत नाहींत. आमच्या प्रिय भागिनी वर्गास इतकेंच सांगणें आहे कीं, वरील निरूपण केलेल्या स्थितींतील लोक गरीब ह्मणून जशी त्यांजवर दया करावयाची, तसेंच त्यांच्या दुष्ट खोडीपासून व खराब वर्तणुकीपासून आपलें कोणत्याही तऱ्हेचें नुकसान न होऊं देण्याविषयीं जपलें पाहिजे. असो! आतां स्त्रियांचे हाताखालीं वागणारे घरगोती चाकर होईल तितकें करून स्त्रियाच असाव्यात. त्या स्त्रियाही शांत स्वभावाच्या व सुस्वभावाच्या अशा असाव्यात. पुरुषच ठेवणें असल्यास पोक्त, पोराबाळाचे धनी व मनाचे भित्रे असे असावेत.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५ | ३ | देवहती | देवहूती |
| ७ | ३ | ह्यांचे | त्यांचे |
| ,, | ५ | शारीरिक. | शारिरिक. |
| १३ | ८ | बहुश्रतपणा | बहुश्रुतपणा |
| १३ | १९ | यपवनीय | त्यपनीय |
| १५ | ८ | जाज्यं | जाड्यं |
| १६ | १४ | ह्मणूण | ह्मणून |
| १७ | ६ | जगला | जळला |
| ,, | १९ | कांजाचा | कांजींचा |
| ,, | २० | जार्डा | जोडी |
| ,, | ,, | नासता | नासती |
| ,, | ,, | काडा | कोडी |
| ,, | २१ | गाडी | गोडी |
| ,, | २२ | उमा | उष्मा |
| १९ | १३ | अवश्यकता | अवश्यकता नाहीं |
| २६ | १३ | प्राप्त | पात्र |
| ४२ | १० | लळणानें | लक्षणानें |
| ४४ | १९ | स्वीकारतात | स्विकारतात |
| ,, | ,, | भगिनानों | भगिनींनों |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | २ | हेतु नैसर्गिकः | हेतु नैंसर्गिकः |
| ,, | ,, | प्रीतेर्यद्विविवर्तते | प्रीतेर्यद्विनिवर्ततें |
| ४७ | ९ | नसते | असतें |
| ६२ | २ | कां ( अ ) | कां |
| ,, | १२ | के (आ) की | केकी |
| ,, | ,, | का (अ)-दंबिनास | कादंबिनींस |
| ६३ | ४ | करगें | करणें |
| ,, | १० | जर खरें परस्पर | परस्पर |
| ७१ | १८ | तुल | तुल्य |
| ,, | १८ | पुष्य गंध | पुण्य गंध |
| ,, | २० | जावले | ज्वाले |
| ७३ | २३ | रीती | रीतीनें |
| ७८ | १८ | वेश | वश्य |
| ८० | ५ | ह्मणून बांधून | ह्मणून घालून बांधून |
| १०४ | २५ | रार्खाजे | राखिजे |